4369

अ३ · २६७४८
आ.नों.
१८२०
३-१-६१
दा · क्र ४३६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

ज्ञानसंवर्धक-माला पुष्प २४ वें

# महाराष्ट्राच्या कर्तृत्त्वशालिनी

★

ठाणे, ... शाखा.
नों. त्रि ...
क्र. ४३६९
ग्रा.वा.

लेखिका
प्रा. लीला गणेश पांडे, एम्. ए.

BVBK-0404369

किंमत पंधरा आणे

प्रकाशक :

न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.

दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि.,

७७ शनवार पेठ, पुणें २ करितां

आवृत्ति पहिली : सप्टेंबर, १९५३

मुखपृष्ठ चित्रकार : श्री. दीनानाथ दलाल.

मुद्रक :

न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.

टीचर्स प्रिंटिंग प्रेस,

७७ शनवार पेठ, पुणें २.

# निवेदन

इंग्रजी राजवटीच्या प्रारंभाबरोबर समाजांत स्थित्यंतर घडून आलें. स्त्री-शिक्षण, प्रौढविवाह व पुनर्विवाह हे एकोणिसाव्या शतकांत ज्वलंत प्रश्न होऊन बसले होते. ते प्रश्न आज उरलेले नाहींत. परंतु आज जें स्त्रीशिक्षण सुलभ झालें आहे त्याचें खरेंखुरें मोल कळण्यासाठीं प्रतिकूल वातावरणाच्या पार्श्वभूमीवरील प्रथमशिक्षित स्त्रियांची कामगिरी वळून पाहणें जरूर आहे. त्यांची कामगिरी आजच्या मानानें एकदम नजरेंत भरत नसली तरी परिस्थितीला अनुकूल वळण लावण्याचें श्रेय त्यांनाच आहे.

महाराष्ट्रांतील नऊ मनस्विनी महिलांची ही धांवती रेखाचित्रें वाचकांच्या हातांत देतांना मला आनंद वाटत आहे. जुन्यानव्याच्या संगमावर उभी असलेली ही पिढी खात्रीनें अभ्यसनीय आहे. साधारणपणें इ. स. १८५० ते इ. स. १९२० पर्यंतचा कालखंड यांत येऊन गेला आहे. महाराष्ट्राच्या या स्फूर्तिदेवता वेगवेगळ्या क्षेत्रांत चमकल्या. त्यांना जें देवत्व प्राप्त झालें आहे, तें त्यांच्या झुंजार वृत्तीमुळें, त्यांच्या सहनशीलतेमुळें आणि त्यांच्या सौजन्यामुळें !

स्त्रीशिक्षणाचा आरंभ सावित्रीबाई फुले यांनीं केला. पुढें सेवासदनाच्या रूपानें रमाबाई रानडे यांनीं व इतर अनेक स्त्रियांनीं या कार्याला जोरदार गति दिली. दुर्दैवी विधवांच्या प्रश्नाला पंडिता रमाबाईंनीं हात घातला. तें कार्य पुढें कर्वे पतिपत्नींनीं चालविलें. डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या अकस्मात् निधनानंतर रोगग्रस्त स्त्रियांच्या साहाय्याला रेबेका सिमियन्स धांवून आल्या. अशा प्रकारची संगति त्यांच्या कार्यांत आहे.

अशा प्रकारचें पुस्तक लिहितांना माहितीच्या अभावीं लिहिणें जड जातें. त्यांतून कांहीं अज्ञात स्त्रियांचा अंतर्भाव करण्यांचें ठरविल्यावर तर पुष्कळ खटपट करून थोडी माहिती पदरांत पडली. सौ. सावित्रीबाई फुले यांचें छायाचित्रही मिळूं शकलें नाहीं. काशीबाई हेरलेकर यांची माहिती त्यांच्या कन्यका सौ. शांताबाई कशाळकर व सौ. शालिनीबाई रानडे यांनीं पुरविली. श्री. अनुबाई ऊर्फ वहिनीसाहेब घोरपडे यांना मी भेटूं शकले नाहीं. पण

त्यांनीं आपल्या मातोश्रींची–काशीताई कानिटकर यांचीं–टिपणें पाठविलीं आणि त्यांचा मला फार उपयोग झाला. आपलें. मातृऋण फेडतांना या सर्वांनीं माझ्यावर कृपा केली आहे, हें मी विसरूं शकत नाहीं; त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानतें. याशिवाय ज्या अनेकांनीं सदिच्छेनें मला प्रोत्साहन दिलें त्यांच्या आपुलकीचा फक्त उल्लेख करणें हेंच योग्य होईल.

सध्यांच्या परिस्थितींत हें पुस्तक प्रकाशांत आणल्याबद्दल "दी टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि." चे व्यवस्थापक श्री. रा. रा. न. शं. कुलकर्णी यांचें व पुस्तकाचें बहिरंग आकर्षक केल्याबद्दल ख्यातनाम चित्रकार श्री. दलाल यांचें आभार मानून हें निवेदन पुरें करतें.

विजयादशमी
१७ ऑक्टोबर १९५३.
श्रीराम निवास, दादर

लीला गणेश पांडे

---

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. सौ. सावित्रीबाई फुले | ... ... ... | १ ते ८ |
| २. पंडिता रमाबाई | ... ... ... | ९ ते १९ |
| ३. रमाबाई रानडे | ... ... ... | २० ते ३५ |
| ४. काशीबाई हेरलेकर | ... ... ... | ३६ ते ५२ |
| ५. डॉ. आनंदीबाई जोशी | ... ... ... | ५३ ते ६५ |
| ६. सौ. काशीताई कानिटकर | ... ... ... | ६६ ते ७६ |
| ७. सौ. आनंदीबाई कर्वे | ... ... ... | ७७ ते ८३ |
| ८. रेबेका सिमियन्स | ... ... ... | ८४ ते ९३ |
| ९. लक्ष्मीबाई टिळक | ... ... ... | ९४ ते १०४ |

संग्रहालय
अनुक्रम 28669
विभाग बा.वा.
क्रमांक 1920
नों. दि. 8/8/61

महाराष्ट्राची पहिली अध्यापिका

# सौ. सावित्रीबाई फुले

[ एकोणिसाव्या शतकांत स्त्रीशिक्षणाचा मूळारंभ करतांना समाजसुधारकांच्या मार्गांत अनेक आपत्तींचे डोंगर उभे होते. स्त्रीशिक्षणाचें महत्त्व सुशिक्षितांना पटलें असलें तरी समाजसुधारणेच्या कांटेरी वाटेवर प्रत्यक्ष पाऊल टाकण्याचें मनोधैर्य अजूनही समाजांत आले नव्हते. अशा त्या काळांत महाराष्ट्रीय स्त्रियांना पहिली धडाडीची अध्यापिका सौ. सावित्रीबाई फुले यांच्या रूपानें लाभली. ज्योतीबा फुले यांच्यासारख्या बेडर समाजसुधारकाचें अर्धांगीपद त्यांनीं भूषविलें, तसेंच ज्योतीबांच्या बहुविध सामाजिक चळवळीचा अर्धा वाटाही त्यांनीं आनंदानें उचलला होता. ह्या थोर स्त्रीला स्त्रीशिक्षणाचा वैभवशाली वृक्ष पाहाण्याचें भाग्य लाभलें नाहीं. पण त्या वृक्षाचें बीजारोपण करण्याचें महत्कार्य मात्र त्यांच्या हातूनच झालें. ]

ऐन दुपारची वेळ ! मध्यान्हीचा सूर्य कसा आगीचा वर्षाव करीत होता ! पावलांचा दाह होत असल्यानें रस्त्यानें जाणारीं माणसें झपाझप चालली होती. अशा वेळीं रस्त्याच्या एका बाजूला एक भिकारी भिक्षा म्हणून मिळालेलें धान्य फाटलेल्या जीर्ण वस्त्रांत बांधण्याचा प्रयत्न करीत होता. वस्त्र अगदीं जीर्ण झालेलें ! किती वर्षांपासून तो तें बाळगून होता — देव जाणे ! त्या चिंध्यांतून धान्य बाहेर सांडत होतें; आणि त्या एकेका कणाबरोबर त्या भिकाऱ्याचा जीव तिळतिळ तुटत होता. त्याच्या त्या केविलवाण्या स्थितीकडे कुणाचेंच लक्ष गेलें नाहीं. जो तो घरी जाण्याच्या घाईत. त्यांतून एखाद्याचें लक्ष गेलेंच असलें तरी त्याला तें दृश्य विशेष लक्ष देण्या-

---

सौ. सावित्रीबाई फुले यांचें छायाचित्र उपलब्ध नाहीं म्हणून तें येथें देतां आलें नाहीं.

इतकें महत्त्वपूर्ण वाटलें नाहीं; पण एका पांथस्थाची पावलें अडखळलीं. कुणाला दिसो वा न दिसो, त्याला तें हृदयास्पर्शी दृश्य दिसलें व असह्य झालें. कारण दया सहस्र नेत्रांनीं पाहात असते. त्या गृहस्थानें ताबडतोब आपल्या खांद्यांवरचें उपरणें त्या दुर्दैवी प्राण्याला देऊन टाकलें. रखरखीत उन्हांत मध्येंच जलवर्षाव होऊन शीतलता वाटावी, असा अनुभव त्या भिकाऱ्याला आला. आपल्या निस्तेज डोळ्यांत कृतज्ञता आणून तो विनम्रपणें म्हणाला, "देव भलं करील तुमचं! तुमच्यासारखी मायाळू माउली त्या पलिकडच्या वाड्यांत आहे. त्या आईनेंच दिलं बाबा हें पोटाला." त्या गृहस्थाच्या चेहऱ्यावरील गांभीर्य जाऊन तात्काळ तेथें स्मितहास्य विलसूं लागलें. अंतःकरणाचें समाधान द्विगुणित झालें. कारण त्या भिकाऱ्यानें उल्लेख केलेली माऊली ही त्या गृहस्थाचीच पत्नी होती. हे गृहस्थ म्हणजेच महाराष्ट्रांतील प्रख्यात समाजसुधारक ज्योतीबा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई हीच ती 'मायाळू माउली.'

महान् व्यक्तींचा संसार हा व्यक्तिगत कधींच नसतो. त्यांच्या संसाराची सरिता मंगळ अमंगळ सगळें घेऊन वेगानें पुढें जाते आणि आपल्या प्रेमजलानें मानवी जीवन समृद्ध करते. रंजल्या गांजल्यांचा उद्धारक आणि स्त्रीसमाजाचा सहृदय सहाय्यकर्ता म्हणून ज्योतीबा फुले यांचे नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत अजरामर झालें आहे. त्यांचें आयुष्य म्हणजे भोंवतालच्या समाजांतील अंधरूढ समजुतींशी केलेला घोर संग्रामच होय. या संग्रामांत त्यांच्याबरोबर त्यांच्या गृहिणीनेंही आपला वांटा मोठ्या उमेदीनें उचलला होता.

## एकंदर समाजपरिस्थिति :

शंभर वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. त्यावेळीं स्त्रीशिक्षण हा शब्द समाजांतील फारशा लोकांना समजण्यासारखा नव्हता. इंग्रजी अमदानीबरोबर नव्या सामाजिक कल्पना व जाणीवा जन्म घेत होत्या. समाजधुरीणांना या

नवयुगाच्या उषःकालांत प्रगतीची रम्य स्वप्नें पडत होतीं. पण एकंदर रूढीप्रिय बहुजनसमाजाला तो उषःकाल वाटण्याऐवजी अस्तसमय वाटत होता. जुनें सर्व सोनें जणूं काय लयाला जाऊन प्रलयाचा अंधार पसरणार अशी भीति सनातनी मनांना भेडसावीत होती. सामाजिक सुधारणा आवश्यक आहेत असें ज्यांना मनापासून वाटत होतें, त्यांच्याही ठिकाणीं जुनें संस्कार बलवत्तर होते. त्यामुळें 'कळतें पण वळत नाहीं' अशी त्यांची स्थिति होती. अशा काळांत ज्योतीबांनीं सामाजिक सुधारणेचें समरशिंग फुंकलें आणि आपल्या कार्याला स्वगृहापासूनच प्रारंभ केला.

## अध्ययन व अध्यापन :

ज्या क्षणीं सावित्रीबाईनीं श्रीगणेशाचा धडा घेतला तो क्षण स्त्रीशिक्षणाच्या इतिहासांतील मोठा भाग्याचा क्षण मानला पाहिजे. त्याकाळीं शिकलेल्या स्त्रिया पुढारलेल्या वर्गांतही दिसत नव्हत्या. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं चालविलेल्या शाळेंत जाण्याचें मनोधैर्य स्त्रियांच्यांत नव्हतें. स्त्रीपुरुष समाजांत फारसें मिसळत नसल्यानें पुरुषशिक्षकांबद्दल बाऊ केला जात असे. त्यामुळें स्त्रीशिक्षणाचें प्रश्नचिन्ह समाजसुधारकाना दिङमूढ करीत होतें. ज्योतीबांनीं 'आधीं केलें मग सांगितलें' या वचनाप्रमाणें स्वतःच्या पत्नीला शिकवून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या पत्नी सावित्रीबाई परंपरागत कल्पनेप्रमाणें आदर्श महिला होत्या. नम्र व शांत स्वभावामुळें ही साधीभोळी सून घरांत फार लाडकी झाली होती. पण शिक्षणाला प्रारंभ झाल्यावर घरांतील वातावरण एकदम बदललें. सावित्रीबाईनीं जुन्या कल्पना अगोदरच आत्मसात् केल्या होत्या. तरीही पतीच्या सहवासानें नव्या कल्पनांचे स्वागत करण्याइतकी संवेदनक्षमता त्यांच्या ठिकाणीं होती. तीन वर्षें हें घरांतील शिक्षण चालू होतें. त्याच सुमारास म्हणजे इ. स. १८५१ मध्यें ज्योतीबांनीं पुण्यांत बुधवार पेठेंतील चिपळूणकरांच्या वाड्यांत मुलींची स्थापन पहिली शाळा केली. या शाळेला

महाराष्ट्रीय अध्यापिका मिळणें दुरापास्तच होतें. तेव्हां स्वतः सावित्रीबाई मुलींना शिकवूं लागल्या.

## समाजाचा विरोध :

एका शतकापूर्वीं शाळेंत जाणारी मुलगी हा एक कुचेष्टेचा विषय होता. शाळेंत जाणारी मुलगी पाहाण्यासाठीं लोक खिडकींतून डोकावत असत. स्त्रियांनीं पायांत जोडा घालणें हें सुद्धां अविनयाचें लक्षण समजलें जाई. तेव्हां पुण्याच्या रस्त्यावरून जातांना सावित्रीबाईंना सनातन्यांची मुक्ताफळें ऐकावी लागत असत. कुचाळांचा स्वभावधर्म त्यांना कधींच सोडत नाहीं. त्यांतून समाजाच्या खालच्या थरांतून व अबला म्हणविल्या गेलेल्या परावलंबी स्त्री-वर्गांतून बहुजनसमाजाला न रुचणाऱ्या कार्यासाठीं पुढें आलेली स्त्री लोकांच्या थट्टेचा विषय झाली तर त्यांत नवल तें काय ? कांहीं समाजकंटकांनीं सावित्री-बाईंची निंद्य कुचेष्टा करण्याचा पुरुषार्थ साधला. या मंडळींची मजल बाईंना खडे मारण्यापर्यंत गेली· त्या शाळेंत जाऊं लागल्या कीं, प्रत्यक्ष सुधारणेचीच पावलें आपल्या रोखानें पडत आहेत असें सनातन्यांना वाटे. पण बाईंची कर्तव्यनिष्ठता कधींच ढळली नाहीं, डोक्यावर पदर, अधोमुख दृष्टि व चेहऱ्यावर चमकणारें करारी वृत्तीचें तेज, अशी ती सात्विकतेची मूर्ति रस्त्यावरील खड्यांना अगर शिव्याशापांना न जुमानतां पुढें जात असे.

## गृहत्याग :

भोंवतालच्या मंडळींचा हा त्रास एकवेळ मनुष्य सहन करील. पण घरांत त्याला स्वास्थ्य मिळावयास पाहिजे ना ? दिवसेंदिवस सावित्रीबाईंना तेंही मिळेनासें झालें: सून शिकायला लागल्यापासून तिच्याकडे पाहाण्याचा दृष्टि-कोनच बदलला. सावित्रीबाईंच्या माहेरी म्हणजे कवठी गांवांतील झगडे घराण्यांतही शिक्षणाला प्रतिकूलताच होती. त्यामुळें सासरमाहेरच्या सर्व वडील मंडळींची बोलणीं सावित्रीबाईंना सहन करावी लागत असत.

पण ज्या कार्याला त्यांनीं हात घातला होता त्याबद्दलची जाज्वल्य निष्ठा त्यांच्या ठिकाणीं होती. त्यामुळें या गोष्टींना तोंड देण्याचें सामर्थ्य त्यांना आपोआप आलें होतें. शेवटीं घरांतील ही कुरबुर फारच वाढली. गोष्टी निकरावर आल्या. "हे सुधारकी थेर बंद करा नाहींतर घराचा दरवाजा तुम्हांला बंद होईल." अशी धमकी ज्योतीबांना वडिलांकडून देण्यांत आली. त्यांनीं ताबडतोब घर सोडण्याचा निर्णय घेतला. रातोरात ते एका वस्त्रानिशीं घराबाहेर पडले. सावित्रीबाईंना काय निर्णय घ्यावयाचा याचा विचार करण्याची जरूरच नव्हती. राम वनवासाला निघाले तेव्हां सीतेच्या मनांत जे विचार आले तेच विचार त्यांच्या मनांत आले व त्यांनींही घर सोडलें.

## राजमान्यता :

ही मुलींची शाळा चांगल्याप्रकारें नांवरूपाला आली. या यशानें आत्मविश्वास निर्माण झाल्यानें ज्योतीबांनीं भोईवाड्यांत महारमांगांसाठीं दुसरी एक शाळा चालवली. समाजसुधारणेच्या नवनवीन कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यांचें त्यांचे प्रयत्न चालू होतें. ही तपश्चर्या सफल होऊं लागण्याची चिन्हें दिसूं लागली होती. इ. स. १८५२ मध्यें मुंबईचे गव्हर्नर अर्स्किन पेरी यांच्या हस्तें ज्योतीबांना दोनशें रुपये रोख व एक शालजोडी देण्यांत आली. लोकमान्यतेचा नसला तरी राजमान्यतेचा शिक्कामोर्तब त्यांच्या कार्यांवर झाला. या समारंभामुळें आप्तमंडळींना आपल्या विचारांतील एकांतिकता समजून आली. भिन्न मतप्रवाहानें विलग झालेलें हें कुटुंब पुन्हां रक्ताच्या ओढीनें एकत्र झालें.

## एक शल्य :

सावित्रीबाई केवळ स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कारामुळें घरांत अप्रिय झाल्या होत्या, असें नाहीं. त्यांना मूलबाळ झालें नाहीं, हेंही एक कारण होतें. ज्योतीबांनीं दुसरें लग्न करावें असा आग्रह धरण्यांत आला होता. त्याकाळीं

संततीसाठीं द्वितीय विवाह करणें गर्ह्य समजलें जात नव्हतें. पण ज्योतीबांनीं ही सूचना धुडकावून लावली. कारण जें बुद्धिप्रधान सहकार्य त्या काळच्या सुशिक्षितांना आपल्या पत्नीकडून मिळणें अशक्य होतें, तें ज्योतीबांना लाभलें होतें. त्यांच्या संस्थारूपी अपत्यांची काळजी सावित्रीबाईच वाहात नव्हत्या काय ? म्हणूनच त्यांच्या अंतःकरणांतील हें शल्य ज्योतीबा जाणूं शकत होते. त्यांनीं यशवंत नांवाच्या एका अनाथ मुलाला स्वपुत्र म्हणून दत्तक घेतलें.

## बालहत्याप्रतिबंधकगृह :

वर म्हटल्याप्रमाणें एकोणिसाव्या शतकांत समाजाचा स्त्रियांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन अत्यंत कठोर होता. बालविवाह रूढ असल्यानें स्त्रीशिक्षणाला अवसर नव्हता व समाजांत बाल विधवांचें प्रमाण अत्यंत वाढलें होतें. इ.स. १८६१ सालच्या हिंदुसमाजाच्या आंकडेवारीवरून त्या काळीं दहा हजार विधवा चार वर्षांखालील वयाच्या होत्या; एकावन्न हजार विधवा पांच ते नऊ वर्षांच्या दरम्यान होत्या; नऊ वर्षांच्या वरील विधवांची संख्या दोन कोटी तीस लाख होती, असें समजतें. या विधवांना ना समाजांत स्थान, ना शिक्षण ! नातेवाईकांच्या दयेवर जगायचे, काबाडकष्ट करूनही समाजाच्या निंदेचा व तिरस्काराचा विषय बनायचे, यांखेरीज कांहींहि भवितव्य या दुर्दैवी जिवांना नव्हतें. म्हणूनच पुनर्विवाह व विधवांचें शिक्षण हें ज्वलंत प्रश्न समाजधुरीणांनीं हातांत घेतले. स्वतः ज्योतीबांनीं इ.स. १८५४मध्यें समाजांतील पतित स्त्रियांना संरक्षण देण्यासाठीं ‘ बालहत्याप्रतिबंधकगृह ’ स्थापन केलें. तेथें येणाऱ्या विधवा स्त्रियांची करुण कहाणी ऐकून त्यांना संरक्षण देण्याचें व त्यांच्या निराश्रित अपत्यांचें संगोपन करण्याचें काम स्वतः सावित्रीबाई करीत असत. स्त्रियांचीं दुःखें स्त्रिया जास्त सहृदयपणें जाणूं शकत असल्यानें विधवा स्त्रिया आपल्या हृदयाला जाळणारी मनोव्यथा सावित्रीबाईंना सांगून मुक्त होत असत. सावित्रीबाई या खऱ्या अर्थानें या संस्थेच्या अधिष्ठात्री देवता होत्या.

## दुष्काळांतील अन्नपूर्णा :

नंतरचा इ. स. १८७६ सालचा भयंकर दुष्काळ ! महाराष्ट्रांत सगळीकडे हाहाःकार उडाला. ज्योतिबा आपलें सामाजिक कर्तव्य बजाविण्यांस विसरले नाहींत. त्यांनीं बारा वर्षांखालील मुलांसाठीं अन्नछत्र उघडलें. भुकेनें व्याकुळ झालेलीं, अन्नासाठीं वणवण फिरणारीं कोंवळीं अर्भकें या अन्नछत्रांत येऊन तृप्त होत असत, ज्योतीबांना धन्यवाद देत असत. हजारोंनीं मुलें येत होतीं—जात होतीं; पण तरीहि त्या अन्नछत्रांतील अन्नपूर्णा, सावित्रीबाई कधीं कंटाळल्या नाहींत कीं त्रासल्या नाहींत. प्रत्येक सामाजिक कार्यांत त्यांनीं पतीला छायेप्रमाणें साथ दिली. आपल्या व्यक्तित्वाचा स्वतंत्रपणें आविष्कार करण्याचें महत्त्वही त्यांना वाटलें नाहीं. त्यांनीं आपलें व्यक्तिमत्त्व ज्योतीबांच्या विशाल व्यक्तिमत्त्वांत व कार्यांत विलीन करून टाकलें आणि त्यांतच त्याचें साफल्य झालें.

" स्त्री ही पुरुषापेक्षां श्रेष्ठ ! कारण सात्विकता व निष्ठा हे सद्‌गुण तिच्यांत निसर्गतः अधिक प्रमाणांत असतात. " असे स्त्रीजातीबद्दल गौरव-पर उद्‌गार ज्योतीबांनीं एके ठिकाणीं काढले आहेत. ते उद्‌गार तोंडांतून बाहेर पडत असतांना ज्योतीबांच्या समोर त्यांच्या धर्मपत्नीचीच मूर्ति खास उभी राहिली असेल. या थोर स्त्रीचा अंत इ. स. १८९७ सालीं पुण्यांत प्लेगची साथ प्रथम आली त्यावेळीं झाला.

स्त्री शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाल्यावर तें कार्य त्यावेळीं किती बिकट होतें याची कल्पना एकदम येत नाहीं. पण समाजसुधारकांच्या विचारांचे आचारांत रुपांतर होण्यासाठीं ज्योतीबाप्रमाणें त्यांच्या पत्नींनी तन-मन-धन अर्पण केलें. आणि तेंही कोणतीच वैयक्तिक अपेक्षा न बाळगता. विस्मृतीच्या धुक्यांत व काळाच्या ओघांत त्यांचें नांव आज लोपून गेल्या-सारखं भासलं तरी त्यांनीं महाराष्ट्राच्या मनोभूमींत जीं विचारबीजें पेरलीं

तीं प्रगतीरूपानें सुफलित झालीं आहेत आणि तेंच त्यांचें चिरकाल टिकणारें स्मारक. म्हणूनच कुसुमाग्रजांच्या शब्दांत म्हणावेसें वाटतें कीं,

" नकोच नसलीं जरी प्रगट स्मारकांचीं दळें ।
असंख्य हृदयीं उभी असत आपुलीं देऊळें ॥ "

---

**अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :**

१. स्त्रीशिक्षणाचा प्रश्न बिकट होण्याची कारणें कोणती ?

२. सावित्रीबाईंच्या समाजसेवेचें वर्णन करा.

३. खालील वाक्यांचा स्वतःच्या शब्दांत विस्तार करा.

( अ ) दया सहस्र नेत्रांनीं पाहात असते.

( ब ) महान् व्यक्तींचा संसार हा व्यक्तिगत कधींच नसतो.

कविहृदयाची पंडिता

# पंडिता रमाबाई



( जन्म इ. स. १८५८; मृत्यु इ. स. १९२२ )

[ स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाबाबत समाजाची मनोभूमिका तयार झाली असली तरी एकंदर प्रगति मंदगतीनें होत होती. अशा वेळीं एक स्वयंप्रकाशी व्यक्तित्व विद्युल्लते प्रमाणें चमकून गेलें. महाराष्ट्रालाच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानला ललामभूत असें हें स्त्रीरत्न म्हणजे पंडिता रमाबाई. विद्वान पित्याकडून मिळालेला संस्कृत विद्येचा वारसा, तीव्र बुद्धिमत्तेनें सामाजिक परिस्थितीचें केलेलें अवलोकन आणि दयामय अंतःकरणानें अनाथअपंगांची व स्त्रीवर्गाची केलेली सेवा या तिन्ही विशेषांनीं त्यांचे व्यक्तिमत्त्व उजळून निघालें. सुधारकांना त्यांच्या रूपानें स्त्रीशिक्षणाचा आदर्श साकार झाल्यासारखा वाटला. 'आपण प्रत्यक्ष सरस्वती आहांत' या यथोचित शब्दांनीं त्यांचा गौरव करण्यांत आला. त्यांच्या अविरत समाजसेवेमुळें नव्या स्त्रीजीवनाची सुप्रभात पाहाण्याचें भाग्य नंतरच्या पिढीला लाभलें. ]

सभागृह श्रोत्यांनीं अगदीं फुलून गेलें होतें. प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर अतिशय औत्सुक्य दिसत होतें. त्याला तसेंच जबरदस्त कारण होतें. महाराष्ट्रांत नवीनच आलेली एक पंडिता स्त्रीशिक्षणासारख्या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावर बोलणार होती. त्यामुळें व्याख्यानाला खूप गर्दी झाली होती. व्याख्यानाची वेळ झाली. व्यासपीठावर एक वीसबावीस वर्षांची तरतरीत तरुणी येऊन उभी राहिली. 'हीच कां पंडिता' कांहींना प्रश्न पडला. त्या स्त्रीच्या चेहेऱ्यावरील गांभीर्य, तिचा पांढरा शुभ्र वेश व तिचे पाणीदार नेत्र यांचा श्रोतृवृंदावर अनुकूल परिणाम झाला. तिनें व्याख्यानाला आरंभ केला. पण तिचा नाजुक आवाज सर्वांच्या कानांपर्यंत पोहोंचेना. तिच्या तें लक्षांत आलें. लगेच शक्य तेवढ्या खणखणीत आवाजांत ती बोलली, "बांधवांनों, क्षमा करा. माझा आवाज आपल्यापर्यंत पोहोंचूं शकत नाहीं. पण त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. आज शतकानुशतकें स्त्रीचा आवाज आपल्या कानापर्यंत पोहोंचण्याइतका प्रबल होऊं देण्याची संधि त्यांना आपण कधींतरी दिली कां?" या प्रश्नानें सर्वांना निरुत्तर केलें आणि स्त्रीदास्यविमोचनाच्या व्याख्यानास अनुकूल वातावरण निर्माण झालें.

## आजन्म वनवासिनी :

हें स्फूर्तिदायी व्यक्तिमत्व अनेक आपत्तींच्या आगींतून तावूनसुलाखून निघाल्यानें त्याचें बावनकशी सोनें झालें. पंडिता रमाबाईंनीं स्वतःबद्दल एकेठिकाणीं म्हटलें आहे, "मी आजन्म वनवासिनी आहे." खरोखर जन्मापासून आयुष्यांतील महान् दुःखें त्यांच्या वांट्याला आलीं. दुर्दैवाशीं झगडत झगडत त्यांनीं आपली जीवनयात्रा पुरी केली. गजान्त लक्ष्मीचा अधिवास व दारिद्र्यानें झालेली अन्नान्नदशा, स्तुतिसुमनांचा वर्षाव व जन-निंदेचा वणवा ह्या जीवनांतल्या विरोधी अवस्था त्यांनीं अनुभवल्या; पण स्थितप्रज्ञता त्यांना कधींही सोडून गेली नाहीं. विद्वान् व पुरोगामी वृत्तीचा पिता, जिवाला जीव देणारा धीरोदात्त भाऊ आणि अत्यंत सुसंस्कृत व

९२२० ३-

प्राणापलीकडे प्रीति करणारा पति ही त्रिविध नोबी जिला लाभली ती स्त्री भाग्यशाली म्हटली पाहिजे. पण जीवनाच्या वाटचालींतले तिघेहि अल्प-काळाचे सोबती ठरले. तीर्थयात्रा करतांना भुकेच्या वेदनांनीं तडफडून झालेला वडिलांचा मृत्यु, त्यांच्यापाठोपाठ आई व वडिल बहिण यांचे निधन, आणि भाग्योदयाची चिन्हें दिसू लागतांच भावाला आलेलें मृत्यूचें आमंत्रण, या सर्व घटना रमाबाईंच्या हृदयावर कोरल्या गेल्या. बाविसाव्या वर्षीं विवाहबद्ध झाल्यावर त्यांनीं केवढ्या आशेनें भविष्यकालाकडे दृष्टि टाकली असेल ! पण संसाराचा ग्रंथ अवघ्या दीड वर्षांत आटोपला आणि ऐन पंचविशींत रमाबाई या जगांत एकट्या उरल्या. दुसरी कोणतीही स्त्री आपल्याच दुःखांत चूर होऊन त्याच परिस्थितींत पिचत पडली असती. पण रमाबाईंनीं हें आत्मक्लेशाचें कवच फोडून दुसऱ्याचें दुःख पाहाण्याचा व निवारण्याचा प्रयत्न केला.

**पूर्ववृत्त :**

पंडिता रमाबाईंचे वडिल अनंतशास्त्री डोंगरे हे ध्येयवादी पंडित होते. नुसती वेदविद्या आत्मसात् करून त्यांचे समाधान झालें नाहीं. प्राचीन ऋषीवर्यांप्रमाणें बुद्धिमान् विद्यार्थ्यांच्या परिवारासह विद्यानंदांत तल्लीन होऊन शांत तपोवनांत जीवन व्यतीत करावे असे त्यांचे रम्य स्वप्न होतें. स्वतः शिकत असतांना पेशवे घराण्यांतील स्त्रियांना संस्कृत शिकविण्याची संधि मिळाल्यानें स्त्रियांना विद्यादान केलें पाहिजे हा विचार त्यांच्या मनांत अंकुरित झाला. पुढें सरस्वतीनें कृपाकटाक्ष टाकल्यावर म्हैसूर संस्थानांत त्यांना सन्मान व संपत्ति लाभली. पण त्यांत न गुरफटतां त्यांनीं गंगामूळ येथें आश्रम उभारला. कितीतरी वर्षें हा आश्रम विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न करीत होता. त्या वातावरणांत अनंतशास्त्री यांची पत्नी लक्ष्मीबाई व तीन अपत्यें–कृष्णाबाई, श्रीनिवास व रमाबाई यांनींही संस्कृत ग्रंथाचें अध्ययन केलें. अनंतशास्त्री कामासाठीं बाहेरगांवीं गेले तर लक्ष्मीबाई विद्यार्थ्यांना

संथा देत असत. छोटी रमा अवघी अकरा वर्षांची असतांना भागवतांतील अठरा हजार श्लोक पाठ म्हणून दाखवीत असे.

## वनवासाला आरंभ :

रमाबाईंची मोठी बहीण कृष्णा हिचें लग्न झालें. नव्या जामातांच्या कर्जबाजारीपणामुळें गोकुळासारखा समृद्ध असलेला आश्रम मोडकळीस आला. सगळ्या कुटुंबाच्या मागें वनवास लागला तो लागलाच. रमाबाईंच्या आयुष्यांतील पहिली वीस वर्षे या वनवासांत व्यतीत झालीं.

इ. स. १८६८ च्या 'पायोनिअर' वृत्तपत्रांत खालील बातमी वाचावयास मिळते.

"अयोध्येमध्यें एक पंडित आला आहे तो आपली बायको, सोळा वर्षांचा मुलगा, अठरा व आठ वर्षांच्या दोन मुली यांसह सर्व प्रांतांत हिंडत असतो. त्याचा धंदा असा कीं महाभारत वगैरे मुखोद्गत म्हणून उदरनिर्वाह करावयाचा. त्याच्या कुटुंबांतील धाकट्या मुलीसुद्धां सर्वांस कित्येक ग्रंथ तोंड-पाठ आहेत. एका वेळीं त्यानें हजारों श्लोक पाठ म्हटले. धाकट्या मुलीनें-सुद्धां आपल्या बापासारखें स्पष्ट व सुंदर रीतीनें म्हटले."

इतक्या लहान वयांत पंडिता रमाबाईंना प्रथम प्रसिद्धि मिळाली. पण त्यावेळीं अशा प्रकारच्या प्रसिद्धीपेक्षां पोटभर अन्नाची त्यांना जास्त जरुरी होती. हें कुटुंब तीर्थयात्रा करीत करीत मद्रास प्रांतांत आलें. त्यावेळी तेथें दुष्काळाची भीषण छाया सर्वत्र पसरली होती. तहानभुकेनें व्याकुळ होऊन अनंतशास्त्र्यांनीं प्राण सोडला. लहान मुलांनींच त्यांना उचलून दोन मैल नेलें व अंत्यसंस्कार केला. परंतु त्यांची दया कुणालाच आली नाहीं. त्यांच्या पाठोपाठ रमाबाईंची आई व मोठी बहिण यांचाही अंत झाला. श्रीनिवास व रमाबाई ही बहिणभावंडें अनाथ झालीं.

## समाजाचें अवलोकन :

"केल्यानें देशाटन, पंडित मैत्री सभेंत संचार ।
शास्त्रग्रंथविलोकन मनुजा चातुर्य येतसें फार ॥"

असें सुभाषितकार सांगतात. पंडिता रमाबाईचे वाचन, विद्वान् घराण्यांतील संस्कार आणि बाळपणापासून देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत झालेली पायीं यात्रा या तिन्ही गोष्टींमुळें अल्पवयांतच रमाबाईचें व्यक्तित्व अत्यंत प्रभावीपणें विकासित झालें. या देशांत विद्वान् पण दरिद्री माणसाची होणारी अवहेलना, धर्माचे वास्तविक स्वरूप व धर्माच्या नांवाखालीं राजरोस चाललेली बुवाबाजी, स्त्रियांची परवशता व अज्ञान आणि सर्व देशाला एखाद्या रोगाप्रमाणें व्यापून टाकणारे दारिद्य यांचा रमाबाईच्या मनावर खोल परिणाम झाला. शेंकडों ग्रंथ वाचून जें जगाचें ज्ञान झालें नसतें तें या वनवासांतील दुःखद प्रसंगामुळें झालें.

## कीर्तीचा वरदहस्त :

इ. स. १८७८ सालीं हीं बहिणभावंडें कलकत्त्यास आलीं. दोन दिवसांत त्यांच्या विद्यावैभवाची कीर्ति साऱ्या कलकत्ता शहरांत पसरली. कलकत्ता विद्यापीठाचे प्रो. गो, प्रो. टॉनी व श्री. महेशचंद्र न्यायरत्न या नामवंत विद्वानांनीं त्यांचा सिनेटहाउसच्या गच्चीवर मोठा सत्कार केला. " आपल्या मागें पसरलेला गंगाप्रवाह जितका पवित्र आहे. तितकेंच आपलें दर्शन परम-मंगल होय. आपण मूर्तिमंत सरस्वती आहांत. " अशा आशयाची एक संस्कृत कविता रचून ' पंडिता ' या पदवीबरोबर त्यांना अर्पण करण्यांत आली. त्यावर पंडिता रमाबाईनीं तेथें एक उत्स्फूर्त कविता रचून या सत्काराला विनम्र उत्तर दिलें. त्यांत त्यांनीं म्हटलें होतें कीं, ' आपल्या-सारख्या विद्वानांच्या नगरींत मी आल्यानें माझ्या श्रमाचें सार्थक झालें आहे. मी पंडिता किंवा सरस्वती नसून सरस्वतीची केवळ नम्र उपासक आहे. " पुढें बंगालमध्यें त्यांचीं ठिकठिकाणीं व्याख्यानें झालीं.

प्रख्यात समाजसुधारक केशवचंद्र सेन यांची व बाईंची ओळख त्याच सुमारास झाली. केशवचंद्रांनीं त्यांना विचारलें, ' आपण वेदग्रंथ वाचले कां ? " या त्यांच्या प्रश्नाला स्वाभाविक ऋजुतेनें रमाबाईनीं उत्तर दिलें कीं,

"नाहीं. वेद वाचण्याचा अधिकार स्त्रियांना कुठें आहे?" त्यावर केशवचंद्रांनीं स्मितहास्य केलें आणि वैदिक ग्रंथ त्यांना भेट म्हणून पाठवून दिले.

### विवाह :

आशेचा किरण थोडाफार दिसूं लागला होता. पण एकाएकीं त्यांचा भाऊ श्रीनिवास हा मृत्युमुखीं पडला आणि पंडिता रमाबाईंच्या जीवनावर आणखी एक आघात झाला. अशा निराधार परिस्थितींत कांहीं समाज-सुधारकांच्या मध्यस्थीनें पंडिता रमाबाई यांचा विवाह बाबू बिपिनविहारी मेधावी या सुविद्य ब्राह्मणेतर तरुणाबरोबर झाला. पण सौख्य व रमाबाई एकत्र नांदणेंच अशक्य असें विधिलिखित होतें. अवघ्या दीड वर्षांतच आपली तरुण पत्नी व कन्या मनोरमा यांना सोडून बिपिनबाबूंनीं परलोकीं प्रयाण केलें. या घटनेनें पंडिता रमाबाई पूर्णपणें संन्यस्त बनल्या. स्त्रीजातीची सेवा हें आपलें जीवितध्येय त्यांनीं ठरविलें.

### महाराष्ट्रांत आगमन :

"गुणा कुर्वन्ति दूतत्वं दूरेऽपि वसतां सताम्" या उक्तीप्रमाणें त्यांची कीर्ति महाराष्ट्रांत येऊन पोहोचली. ठिकठिकाणीं व्याख्यानासाठीं त्यांना आमंत्रणें येऊं लागलीं. इ.स. १८८२ सालीं त्या पुण्याला आल्या. महाराष्ट्रां-तील सुधारकांना त्यांच्यांत नव्या स्त्रीजीवनाचा आदर्श दिसला. पुण्यांतील सुधारकांच्या स्त्रिया दर आठवड्यांस एकत्र जमून कांहीं वाचन व चर्चा करीत. पंडिता रमाबाई आल्यावर 'आर्यमहिलासमाज' या सस्थेंत या उपक्रमाचें रूपांतर झालें. रमाबाईंनीं स्त्रियांना जाचक असलेली समाजांतील विषमता सर्वांच्या नजरेस आणून दिली.

पंडिता रमाबाईंची राहाणी फार साधी होती. एक पांढरेशुभ्र पातळ व अंगांत मोठ्या बाह्यांचें पोलकें असा त्यांचा वेश असे. नेहमीं डोक्यावरून पदर घेऊन तो नंतर त्या डाव्या खांद्यावर टाकीत असत. वय तरुण असूनही चेहेऱ्यावर विरक्तता होती. परमेश्वरानें रूपसंपदा व बुद्धिवैभव अनंत हस्तानें

दिलें होते. त्यामुळें साध्या पोशाखांतही त्या अप्रतिम सौंदर्यशालिनी दिसत असत. बुद्धिमत्तेमुळें त्यांच्याबद्दल असीम आदर निर्माण होई. त्यांच्याबद्दल डॉ. आनंदीबाई जोशी यांनीं एके ठिकाणीं आपल्या पत्रांत म्हटलेंही आहे, कीं, "ही स्त्री फुलासारखी कोमल आहे. पण तिनें आपल्या धैर्यानें मोठमोठ्या योद्ध्यांनाही लाजविलें आहे."

## परदेशीं प्रयाण व धर्मांतर :

आर्यमहिलासमाजासारख्या लहानशा संस्थेंत त्यांनीं अनेक व्याख्यानें दिलीं. पण तेवढ्या कार्यांत रमण्यासारखा त्यांचा पिंड नव्हता. सामाजिक सुधारणा फारच मंदगतीनें होत होती. आर्थिक साहाय्याची वानवा व लोकमत यामुळें कोणतेंही कार्य हातांत घेतां येत नव्हते. अशा परिस्थितींत हुजूरपागेच्या मिस् हर्फर्ड व निमाया गोरे यांचा व पंडिता रमाबाईंचा परिचय झाला. मनाची संशयवादी स्थिति झाली होती. महाराष्ट्रांत कार्य करणें हें आपलें ध्येय त्यांनीं ठरविलें होतें. परंतु परदेशांत जाऊन तेथील परिस्थिति अवलोकन करावी, विद्या संपादन करावी या उद्देशानें इ. स. १८८३ मध्यें त्या विलायतेला गेल्या. तेथें त्यांनीं धर्मांतर केलें.

## धर्मांतराची प्रतिक्रिया :

पंडिता रमाबाईंनीं खिस्ती धर्माची दीक्षा घेतली, या बातमीनें महाराष्ट्रांत एकच खळबळ उडाली. या धर्मांतराची प्रतिक्रिया दोन प्रकारें दोन गटांत झाली. सुशिक्षित स्त्रीचे खरें स्वरूप उघडकीस आलें म्हणून सनातन्यांना आनंद झाला. पण नव्या स्त्रीत्वाच्या आदर्शाला तडा गेला असें वाटून समाजसुधारकांना सखेदाश्चर्य वाटलें. 'इंदुप्रकाश' चे संपादक श्री. विष्णुशास्त्री पंडित यांनीं एक करुण घटना या दृष्टीनें त्याकडे पाहून समतोल-बुद्धीनें लिहिले आणि रमाबाईंच्या कार्याला त्यांच्या धर्मांतरानें धक्का पोहोंचणार नाहीं अशी आशा व्यक्त केली. स्वतः पंडिता रमाबाईंनीं सांगितले कीं, "उदात्त तत्त्वें हिंदुधर्मांत होतीं. पण त्यांचें प्रत्यक्ष परिपालन

मला ख्रिश्चनधर्मांत आढळलें." पंडिता रमाबाई परदेशांत गेल्यावर तेथील मिशनरी सेवकांच्या निरपेक्ष समाजसेवेचा त्यांच्या मनावर फार अनुकूल परिणाम झाला. जीवनांत नवी श्रद्धा निर्माण झाल्यावर आपल्या स्वाभाविक प्रवृत्त्यनुसार त्यांनीं धर्मांतर केलें.

## शारदासदन :

इंग्लंड व अमेरिका या दोन्ही देशांतील समाजाचें निरीक्षण केल्यावर पंडिता रमाबाई परत आल्या व ११ मार्च १८८९ रोजीं अनाथ विधवांसाठीं 'शारदासदन' ही संस्था स्थापन केली. हा समारंभ सौ. काशीबाई कानिटकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. त्या संस्थेंत बालविधवा व परित्यक्ता स्त्रियांना आश्रय व शिक्षण दिलें जात असे. ज्या विधवांना घरांत व समाजांत साधी माणुसकीहि मिळणें कठीण होते त्यांना रमाबाईचें मातृप्रेम लाभलें. न्यायमूर्ति रानडे, भांडारकरप्रभृति मंडळी या संस्थेच्या सल्लागार मंडळावर होती.

असें सांगतात कीं, एकदां रमाबाई फिरावयास जात असतांना त्यांनीं एक करुण दृश्य पाहिलें. कसाईखान्यांतून सुटलेली एक गाय जीव घेऊन पळत होती आणि तिच्यामागें खाटिक सुरा घेऊन धावत होता. ती गाय पंडिता रमाबाईसमोर येऊन थांबली. त्या मुक्या जनावरालादेखील रमाबाईंच्या हृदयांतील अथांग सहानुभूति कळली म्हणावयाची. त्या गाईसारखीच दीनवाणी अवस्था हिंदु विधवांची होती.

## स्वप्न भंगलें !

शारदासदनांत सर्व स्त्रियांना उत्तम प्रकारें शिक्षण मिळत असे. परंतु पंडिता रमाबाईचें जें खाजगी जीवन होतें, त्याचा परिणाम कांहीं विद्यार्थिनींवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. रमाबाई भजन करीत असतांना त्या भक्तिभावनेच्या लाटेंत भोळी मनें वाहून जात असत. त्याचा परिणाम असा झाला कीं एकदम अकरा मुलींनीं ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याचें ठरविलें. ही गोष्ट गुप्त राहणें शक्यच नव्हते. समाजसेवेच्या नांवाखालीं रमाबाई ख्रिश्चन धर्माचा प्रसार

करते या अफवेचें दाट पीक सर्वत्र आलें. सर्व वजनदार समाजसुधारकांनीं संस्थेच्या सल्लागार मंडळाचे काम सोडून देण्याचा निर्णय घेतला आणि ही संस्था बंद करण्याची पाळी रमाबाईवर आली. समाजसुधारकांचे एक स्वप्न भंगले ! हिंदु विधवांची उन्नति व ख्रिश्चन धर्मावरील निष्ठा या दोन तलवारी शारदासदनासारख्या सामाजिक संस्थेच्या एका म्यानात राहाण्याजोग्या नव्हत्या. पंडिता रमाबाईंच्या दृष्टिआड ही गोष्ट झाल्यानें बुद्धिपुरःसर धर्मप्रचार करण्याचा आरोप त्यांना सहन करावा लागला.

## नमुनेदार समाजकार्य :

पंडिता रमाबाईंच्या शारदासदनाचा प्रथम आरंभ मुंबईस झाला. नंतर इमारत बांधून ती संस्था पुण्यास नेण्यांत आली. लोकक्षोभामुळें संस्था जवळजवळ बंद पडली. परंतु रमाबाईंनीं आपला जनसेवेचा मार्ग सोडला नाहीं. केडगांवला जाऊन नव्या दमानें कार्याला प्रारंभ केला. तेथें पाण्याचा त्रास होता, तर विहिरी खोदल्या. अमेरिकेंतून लक्षावधी रुपयांची मदत आणून अनाथअपंगांसाठीं 'मुक्तिसदन' उभें केलें. मुक्तिसदन, प्रीतिसदन व कृपासदन या केडगांवच्या रमाबाईंच्या संस्थांतून आजही नमुनेदार समाजकार्य केलें जात आहे. सदनांतील स्त्रियांना नुसता आश्रय न देतां त्यांना समाजाचे उपयुक्त घटक बनविण्याचा प्रयत्न रमाबाईंनीं केला. हातमाग चालविणें, सूपटोपल्या विणणें, रंग देणें इत्यादि कामें त्यांना शिकविण्यांत आलीं. तेथें एक छापखानाही चालविण्यांत आला. एकेकाळीं आपल्यावर आलेली अन्नान्नदशा रमाबाई कधींच विसरल्या नाहींत. ज्या ज्या वेळीं गुजराथेंत व मध्यप्रांतांत दुष्काळ पडला त्या त्या वेळीं त्या तेथें धांवत गेल्या आणि अनाथांना त्यांनीं सक्रीय मदत केली. ही कामें करतांना आर्थिक दुरवस्था त्यांना कधीच भासली नाहीं. त्यांच्या कर्तबगारीमुळें पैसा आपोआप हातांत येऊन पडत असे.

## वैचारिक कामगिरी :

इंग्लंडमध्यें संस्कृत भाषेची प्राध्यापिका म्हणून रमाबाईंनीं काम केलें. तेथें इंग्रजीबरोबर पदार्थविज्ञानशास्त्राचाही त्यांनीं अभ्यास केला. थोड्या अवधींत त्यांनीं इंग्रजीवर एवढे प्रभुत्व मिळविलें कीं 'उच्चवर्णीय हिंदु महिला' हा सुंदर भाषाशैलीनें नटलेला ग्रंथ त्यांनीं लिहिला. रमाबाई आमरण विद्यार्थिनी होत्या. इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली, कानडी व संस्कृत अशा सात भाषा त्यांना येत होत्या. हिब्रू भाषा शिकून तिचें व्याकरणहि त्यांनीं तयार केलें. "शतकानुशतकाच्या मूकतेला या ग्रंथानें प्रथमच वाचा फोडली." असे धन्योद्गार डॉ. बॉडले या अमेरिकन बाईंनीं 'उच्चवर्णीय हिंदु महिला' या ग्रंथाबद्दल काढले. त्यांत हिंदी स्त्रियांची परवशता वर्णिली असून स्वावलंबनाखेरीज तरणोपाय नाहीं हा विचार मांडला आहे. हंटर कमिशनपुढें साक्ष देतांनाही हीच गोष्ट त्यांनीं प्रतिपादन केली.

'स्त्रीबोधनीति' व 'युनायटेड स्टेट्सची लोकस्थिति व प्रवासवृत्त' हे दोन मराठी ग्रंथ व 'A Testimony' हा इंग्रजी ग्रंथ त्यांनीं लिहिला. आपला प्रवासाचा खर्च भागविण्यासाठीं त्यांनीं इंग्लंडहून सुंदर पत्रें पाठविलीं. त्यांत तेथील समाजरचना व लोकांचे आचारविचार यांचें सुरस वर्णन आहे. हीं पत्रें सुबोधपत्रिकेचें संपादक द्वा. गो. वैद्य यांनीं प्रसिद्ध केलीं. तीं पत्रें वाचतांना या पंडितेचें हृदय किती कोमल होतें व लेखणी किती काव्यमय होती याची साक्ष पटते. अशा या थोर स्त्रीचा अंत ५ एप्रिल १९२२ रोजीं झाला. त्यापूर्वीं एक वर्ष त्यांची प्रिय कन्या मनोरमा ही क्षयाच्या विकारानें त्यांना सोडून गेली होती.

## जीवनविषयक तत्त्वज्ञान :

समाजसेवकांबद्दल पंडिता रमाबाईंनीं काढलेले उद्गार त्यांनाच यथार्थपणें लागूं पडतात. त्या म्हणतात, "या जगांत कांहींएक स्वार्थ नसतांना लोकांवर ज्यांची प्रीति असते तेंच धन्य आणि तेच सुखी ! मनुष्यांमध्यें

कोठें जर देवजाती असली तर मी तसल्या मनुष्यासच देव मानते. तशा प्रेमिक मनुष्यांचा एक एक अश्रुबिंदु, ज्यास निर्मल प्रेमाची किंमत समजते असे मनुष्य स्वर्गसुखाच्या विनिमयानेंहि घेण्यास मागें सरणार नाहीं. कारण तीं रत्नें अमोलिक होत ! ”

त्यांच्या एका पत्रांत त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान प्रतिबिंबित झालें आहे. “ मी नेहमीं कुंतीप्रमाणें परमेश्वराची प्रार्थना करीत असते कीं, “ विपदः सन्तु नः शश्वत् तत्र तत्र जगत्पते। ” रत्नाकरांतून पहिल्यानें हालाहल विष निघून मग सर्व संजीवनकारी अमृत निघालें होतें अशी दंतकथा आहे. परंतु माझ्या आयुष्यांत पुष्कळ वेळां ही कथा मी प्रत्यक्ष पाहिली. तुम्हीहि हें ध्यानांत ठेवा कीं विषाच्या मागून अमृत येतें. ” खरोखर जगांतील महान् आपत्तीचें हालाहल त्यांनीं प्राशन केलें. पण हा दुःखाचा पेला ओठाला लावलेला असतांनाहि जगाला दिलें मात्र समाजसेवेचें अमृत! अशा या थोर स्त्रीच्या पवित्र स्मृतीपुढें आपलें मस्तक आदरानें नम्र होणार नाहीं काय ?

---

**अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :**

१. पंडिता रमाबाईचें व्यक्तिमत्त्व घडविण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या ?

२. “ हिंदु विधवांची उन्नति व ख्रिश्चन धर्माची निष्ठा या दोन तलवारी शारदासदनसारख्या सामाजिक संस्थेच्या एका म्यानांत राहण्याजोग्या नव्हत्या.” या वाक्याच्या अर्थ नीट समजावून द्या.

३. पंडिता रमाबाईच्या एकंदर आयुष्यक्रमावरून त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाबद्दल काय निष्कर्ष काढतां येईल ?

थोर समाजधुरंधरांच्या थोर सहचारिणी

## रमाबाई रानडे



( जन्म इ. स. १८६२; मृत्यु इ. स. १९२४ ).

[ एकोणिसाव्या शतकांत अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्वानें जे समाजसुधारक चमकले त्यांत न्यायमूर्ति रानडे यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांचें जीवन म्हणजे महाराष्ट्रांतील अनेक सामाजिक, राजकीय व औद्योगिक सुधारणांचा इतिहास आहे, ही जाणीव त्यांच्या चरित्राचें सिंहावलोकन करतांना कायम राहाते. मनाला आश्चर्यचकित करणाऱ्या कार्यव्याप्तीमुळें ते अनेक संस्थांचें आधारस्तंभ होते. ते स्वतः स्त्रीशिक्षणाचे कट्टे पुरस्कर्ते असल्यानें त्यांनीं आपल्या पत्नीला बाळबोध अक्षरें शिकविण्यापासून ते इंग्रजी उत्तम वाचण्याइतपत स्वतः तयार केलें. रमाबाईंनीं या विद्येचा समाजहितासाठीं सदुपयोग केला. नव्याजुन्याच्या सीमारेषेवरील रमाबाईंचें हें व्यक्तिचित्र सात्त्विक वृत्तीनें परिपूर्ण असल्यानें अत्यंत मनोरम झालेलें आहे. ]

"अण्णांचें पत्र आलें···पत्र आलें!" एवढा शब्द ऐकतांच अंगणांत खेळत असलेली सर्व बालगोपालमंडळी जमा झाली. घरांतल्या बायकांनीं हातांतलें काम क्षणभर बाजूला ठेवलें. दाजीनें ऐटींत पत्र वाचायला आरंभ केला. दाजीजवळ त्याची छोटी बहिण उभी होती. तिचे डोळे आनंदानें लुकलुकत होते. "मी लवकरच तेथें येतों" असं अण्णांनीं लिहिलं होतं. तेंच तिच्या आनंदाचं कारण! गांवाला जातांना तिनें अण्णांच्या कानांत एक जम्मत सांगितली होती. तिचें तें गुपित फक्त घरांतल्या देवाला—गणपतीला माहीत होतें. कारण देवबाप्पाला सारंच कळतं मुळी! आतां अण्णा आले कीं त्यांनीं आणलेली गंमत दाखवून सर्वांना चकित करायचं अशा गोड विचारांत ती असतांनाच दाजीनें म्हटलें, "अग लबाडे, अण्णासाहेबांना काय आणायला सांगितलं तें कळलं आम्हाला." "सांग तर काय तें?" तिनें भाबडेपणें विचारलें. "हात्तिच्या! त्यांत काय—? त्यांनीं पत्रांत लिहिलेंच आहे मुळी, कीं बाळीसाठीं मोत्याच्या बाहुल्या आणि साडी अगदीं न विसरतां आणतों म्हणून!" आपलें गुपित फुटलें म्हणून त्या बालिकेनें गाल फुगवले आणि विचारलें, "पण तुला कसं कळलं?" "पत्रांत लिहिलं आहे ना!" दाजी उत्तरला. पण तिचें समाधान होईना.

"अण्णांनीं लिहिलं, पण तुला कसं कळलं?" हा तिचा प्रश्न शिल्लकच राहिला. दाजीला तें समजावून सांगतां येईना. शेवटीं तो चिडला. बहिणीच्या एक श्रीमुखांत देऊन त्यानें वडील भावाचा हक्क बजावला. पण त्यामुळें तिच्या मनांतला गोंधळ मुळींच कमी झाला नाहीं. भावासारखं आपल्याला वाचतां आलं तर काय मजा होईल हा विचार मनांत येतांच तिनें आईला विचारलं, "मी शिकूं वाचायला?" त्यावर आईनें म्हटलें, "छे! काय करायचं बायकांनीं शिकून? त्यांना काय चाकरी करायची आहे थोडीच!" खरंच कीं! भोंवतालच्या कुणींच बायका लिहितवाचत नव्हत्या. बरोबरीच्या मैत्रीणीसुद्धां छप्पापाणी, 'कारसकाऱ्या, काय बोलतो नाऱ्या'चा खेळ, गजगे, बाहुल्या आणि भातुकली यांतच रमलेल्या होत्या.

मग शिकण्याचा विचार आई म्हणते तसा वेडेपणाचाच तर···पुन्हां म्हणून शिक्षणाचा विचार त्या चिमुकल्या डोक्यांत कधीं आला नाहीं.

तिच्या कोंवळ्या मनावर परिणाम करणारी दुसरी एक गोष्ट तिनें ऐकली. तिच्या आत्याबाई लिहायलावाचायला शिकल्या होत्या आणि एकदोन वर्षांतच त्यांना वैधव्य आलें होतें. बायका लिहायलावाचायला शिकल्या कीं असा परमेश्वरी कोप होतो, असा सर्वांचा समज झाला होता. अशा वातावरणांत ‘ नकोच तें शिक्षण ’ अशी त्या मुलीची भावना झाली असल्यास नवल ते काय ! पण परमेश्वरी योजना फार वेगळी होती. याच मुलीकडून महाराष्ट्रांत सेवासदनासारखे महान् शैक्षणिक कार्य व्हावयाचें होतें.

**बालपण :**

श्री. रमाबाई रानडे यांचा जन्म कुर्लेकर या सरदार घराण्यांत इ. स. १८६२ सालीं झाला. हें कुटुंब देवराष्ट्रे या गांवीं राहात असे. रमाबाईंचा जन्म झाला त्या सुमारास हें घराणें सांपत्तिक दृष्ट्या डबघाईस आलेलें होतें; तरीही पूर्वजांची कीर्ति मागें असल्यानें अत्यंत प्रतिष्ठित घराण्यांत त्याची गणना होत असे. रमाबाईंची आई ही एक दक्ष व धर्मपरायण गृहिणी होती. विलक्षण सासुरवास सोसल्यानें त्यांची सहनशीलता कसाला लागलेली होती. मिरजेचे राजवैद्य राघोपंत करमरकर हे रमाबाईंचे आजोबा म्हणजे आईचे वडील. वैद्यघराण्यांत जन्माला आल्यानें रमाबाईंच्या मातोश्रींनीं वैद्यकविद्या आत्मसात् केली होती. पुढें तिचा उपयोग त्यांनांच नव्हे तर अनेक गोरगरिबांना झाला. संसार सांभाळून गरीब रोग्यांना विनामूल्य औषध देण्याचें काम त्या करीत. कधीं कधीं या रोग्यांना घरांत ठेऊन घेऊन त्यांची शुश्रूषा करणें हें समाजकार्यही त्या करीत असत. अर्थात समाजकार्य एवढा मोठा शब्द त्या कामाला लावत नसत. ‘ पडावें दुसऱ्याच्या उपयोगी ’ एवढाच त्याचा अर्थ होता. सांपत्तिक परिस्थिति असमाधानकारक असूनही रमाबाईंच्या वडिलांनीं औषधपाण्याच्या खर्चाला कधींहि नापसंती दर्शविली

नाहीं. उलट प्रोत्साहनच दिलें. अशा प्रकारें परोपकाराचा धडा रमाबाईना आपल्या बालपणीं मिळाला होता.

## विवाह :

वडील बहिणीच्या मानानें जरा उशीरा म्हणजे अकराव्या वर्षी रमाबाईचा विवाह न्यायमूर्ति रानडे यांच्याशीं झाला. त्यावेळीं न्यायमूर्तींचें वय बत्तीस वर्षांचें होतें. वय व विद्वत्ता या दोन्हीं दृष्टींनीं हा विषमविवाह होता. विषम-विवाह सुखाचे होत नाहींत, असा सर्वसामान्य समज आहे. पण हा विवाह मात्र या नियमाला अपवाद ठरला. त्याला कारण म्हणजे न्यायमूर्ति रानडे यांचा शांत व प्रेमळ स्वभाव आणि त्यामुळें रमाबाईंच्या मनांत निर्माण झालेली अपार भक्ति. त्या काळांत अशा प्रकारचे अनेक विवाह होत असल्यानें हें वयाचें अंतर कुणालाच गैर वाटलें नाहीं. महाराष्ट्रांतील पुरुष इंग्रजी शिक्षण घेऊं लागल्यानें साहजिकच विवाहप्रसंगीं त्यांची वयोमर्यादा पुढें सरकत असे आणि मुलींचीं लग्नें मात्र बारा वर्षांच्या आंत होत असत. स्वतः न्यायमूर्ति रानडे यांच्या दृष्टीनें मात्र हा विवाह म्हणजे त्यांनीं दीर्घ-काळ बाळगलेल्या ध्येयांचा चक्काचूर होता. पुनर्विवाहाच्या पक्षाकडे त्यांचा ओढा होता. प्रथम पत्नी मृत्यु पावल्यावर अल्पवयी मुलीबरोबर संसार करण्यापेक्षां विवाहच करूं नये किंवा केल्यास पुनर्विवाह करावा असें त्यांना वाटत होतें. परंतु पित्याच्या इच्छेमुळें आजवर वाचनानें व अवलोकनानें जे विचार व ज्या निष्ठा दृढ झाल्या होत्या त्यांवर तिलांजली देण्याचा प्रसंग न्यायमूर्तींवर आला. मित्रमंडळींकडून कमकुवतपणाचा आरोप त्यांच्यावर करण्यांत आला. सर्व समाजसुधारकांचा त्यांच्यावर रोष झाला. पण पित्याचा संबंध तोडणें आणि पर्यायानें आपल्या सर्व एकत्र कुटुंबावर आघात करणें हें न्यायमूर्तींच्या स्वभावधर्माच्या विरुद्ध होतें. जुन्या-नव्याचा समन्वय करण्याची त्यांची मनोवृत्ति होती. प्रथम पत्नी दिवंगत झाल्यावर तें दुःख विसरण्याचा अवसरही वडिल मंडळींनीं त्यांना दिला नाहीं. कारण न्यायमूर्ति स्वमतानुसार

पुनर्विवाह करतील अशी भीति त्यांना वाटत होती. शेवटीं घर सोडून जाण्याची धमकी वडिलांकडून मिळाल्यावर न्यायमूर्ति अस्वस्थ झाले. त्यांची पितृभक्ति पणाला लागली होती. एकीकडे पितृभक्ति व दुसरीकडे जीवन-निष्ठा अशी रस्सीखेंच सुरू झाली. त्यांत पितृभक्तीचा विजय झाला. जुन्या संस्कारांत वाढलेलें त्यांचें मन कुटुंबसंस्थेचें बंधन तोडूं शकलें नाहीं. एकोणिसाव्या शतकांतील कुटुंबसंस्थेंत व्यक्तिस्वातंत्र्याला वाव नव्हता. कुटुंब-प्रमुखाला कुटुंबांतील इतर घटकांनीं विरोध करणें ही गोष्ट नवीन होती. कुटुंबसंस्थेची आजवरची घडी, तिचीं मूल्यें व नवशिक्षण घेणाऱ्या तरुण मनाच्या सामाजिक प्रेरणा या प्रवृत्ति विरुद्ध दिशेनें जात होत्या. अशा एकंदर परिस्थितींत न्यायमूर्ति रानडे वडिलांसमोर एक तासभर कांहीं एक न बोलतां खालीं मान घालून उभे राहिले व शेवटीं वडिलांची आज्ञा शिरसामान्य केली, या घटनेचा उलगडा होऊ शकतो. पण त्यानंतर रानडे यांचा मनस्ताप कमी न होतां अधिकच वाढला. मृतपत्नीचा शोक, स्व-मतावर पाणी सोडल्यानें असह्य होणारा मनस्ताप, अशा अवस्थेंत न्यायमूर्ति असतांनाच इ. स. १८६७ सालीं रमाबाईनीं रानड्यांच्या घरांत गृहिणी म्हणून प्रवेश केला. माहेरच्या बाळबोध वळणामुळें या दहाजणांच्या घरांत मिसळायला त्यांना वेळ लागला नाहीं. खुद्द न्यायमूर्तींनींही आपल्या मन-स्तापाची झळ आपल्या अल्पवयी पत्नीला लागूं दिली नाहीं. उलट अतिशय समंजसपणें वागून खराखुरा आदर रमाबाईंच्या मनांत निर्माण केला. ‘पति हेंच आपलें दैवत’ ही भावना परंपरेनें त्यांच्या ठिकाणीं जागृत होतीच. पण नितांत निष्ठा कुणाच्याही मनांत उत्पन्न व्हावी. एवढी प्रभावी गुणसंपदा न्यायमूर्तींना परमेश्वरानें बहाल केली होती.

## शिक्षणास आरंभ :

या काळांत सुशिक्षित पुरुषाला सुशिक्षित स्त्री पत्नी म्हणून लाभणें दुरापास्त होतें. आपल्या कल्पनेंतील प्रतिमूर्ति सत्यसृष्टींत दिसणेंही अशक्य

असल्यानें न्यायमूर्तींनीं रमाबाईंना शिकविण्यास सुरुवात केली. रमाबाईंना अकरावें वर्ष असल्यानें विद्या संपादन करणें सुलभ होतें, परंतु त्या काळांत लहान वयाची सासुरवासिनी हीसुद्धां प्रौढ समजली जाई व तिच्यावर सर्वांची सक्त नजर असे. अशा पंगु व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रियांना कोणतीही गोष्ट स्वतंत्रपणें करतां येत नसे. न्यायमूर्तींनीं रोज रात्रीं दोन तास शिकवून चांगलें मराठी वाचन करण्याइतपत त्यांची प्रगति करवून घेतली.

रानड्यांच्या घरांतील कांहीं प्रौढ स्त्रियांना सही करण्यापुरतें लिहिणें, पोथी वाचण्याइतपत वाचणें येत होतें. तरीही रमाबाई शिकूं लागल्यावर त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला तो झालाच. " जाऊं दे ग ! शिक्षणा-वांचून काय अडलं आहे ? पुरुषांचं थोड ऐकावं आणि थोडं सोडून द्यावं ! " या नणंदेच्या म्हणण्याला दुसरी एकादी स्त्री बळी पडली असती. पण पती-बद्दल वाटणारी अपार भक्ति या विचारांना थारा देत नसे. सासुरवासिनी असल्यानें त्या सर्व बोलणीं ऐकून घेत असत. पण न्यायमूर्तींना ज्या गोष्टींनीं संतोष होईल तीच गोष्ट करण्यांत त्यांना धन्यता वाटे. स्वतः न्यायमूर्ति कधींहि मनाचा तोल जाऊं देत नसत. शांतपणें चुका समजावून सांगण्याचा त्यांचा स्वभाव. पण ते जर एकदांच कठोर शब्द बोलले तरी रमाबाईंच्या अंतःकरणाचें पुरतें पाणी पाणी होऊन जाई. रमाबाईंच्या मनाची ही घडण समजली कीं, वाटूं लागतें कीं, घरांतील वडिलधाऱ्या स्त्रियांचे शब्दांचे घाव सोसूनही त्या शिकल्या ते केवळ एका निष्ठेच्या जोरावर !

## शिक्षणाच्या परिणामाची भीति :

घरांतील ताई-सासूबाई किंवा दुर्गावन्स रमाबाईंच्या शिक्षणानें संतापत असत. त्याचें कारण म्हणजे शिक्षणाच्या परिणामाची भीति. " बायकांना शिकविलें कीं, त्या उद्धट होतील; त्यांचे सद्‌गुण लयाला जाऊन त्या स्वैराचारी बनतील. " असा जो समाज सनातनी माणसांच्या ठिकाणीं पसरला होता, त्यामुळेंच रमाबाईंना या प्रकारचा सासुरवास भोगावा लागला.

प्रथम प्रथम सामोपचारानें, कधीं कधीं धाकानें व निराशा झाल्यावर एकत्र कुटुंबांत बहिष्कृत रीतीनें वागवून सामदामदण्डभेद या मार्गांचा प्रयोग रमाबाईवर करण्यांत आला. रमाबाई स्वतः सुशील व सोशिक असल्यानें या स्त्रियांना फार आशा वाटे. पण पुन्हां 'येरे माझ्या मागल्या' हा प्रकार शिक्षणाच्या बाबतींत होऊं लागल्यावर त्यांचें मन रमाबाईबद्दल पुरतें कलुषित झालें.

जुन्या सामाजिक नाटकांतून प्रहसनांतून व इतर लिखाणांतूनही स्त्री-शिक्षणाबद्दल समाजाला वाटणारी भीति प्रतिबिंबित झाली आहे. उदाहरणार्थ 'कलकत्ता रिव्ह्यू' या वृत्तपत्राच्या विद्वान् संपादकांनीं पुढील उताऱ्यांत हींच भीति व्यक्त केली आहे.

"आपल्या स्त्रियांना हें पाश्चिमात्य शिक्षण द्यावें किंवा नाहीं हें अत्यंत गंभीरपणें ठरविण्याची वेळ आलेली आहे. हें शिक्षण पद्धतशीर सुरूं झाल्या-वर अढळ निष्ठा, अपार भक्ति, सहजसुंदर कोमलता, व अलौकिक धैर्य हें स्त्रीजातीस ललामभूत असलेले सद्‌गुण आमच्या स्त्रियांतून खास नाहींसे होतील. हे सद्‌गुण नष्ट करणारें परकीय शिक्षण स्त्रियांवर लादण्यांत आपल्या हातून चूकच होत नाहीं काय? या सद्‌गुणांऐवजीं पाश्चिमात्य संस्कृतीचा भपकेबाज लखलखाट आमच्या पदरीं पडणार. शिवाय अशा प्रकारच्या शिक्षणाचे जे थोडेफार फायदे आहेत त्याबद्दलही शंका घेण्यास बरीच जागा आहे."

## इंग्रजी शिक्षण :

मराठी शिक्षणांत उत्तम प्रगति झाल्यावर रमाबाईंना विद्येची गोडी लागली. केवळ न्यायमूर्तींच्या मनाला समाधान व्हावें म्हणून त्या तोंपर्यंत शिकत होत्या. नंतर मात्र स्वतःला विद्यानंद प्राप्त व्हावा म्हणून त्यांनीं इंग्रजी शिक्षण घेण्याबाबतचें मनोगत न्यायमूर्तींना बोलून दाखविलें. त्याच सुमारास म्हणजे इ.स. १८७५ सालीं रमाबाईंच्या जवळ त्यांचे धाकटे दीर आबा व बाबा हे येऊन राहिले होते. ते दोघे इंग्रजी शिकत असल्यानें रमाबाईंना

इंग्रजी शिकावेंसें वाटूं लागलें. रमाबाईंनीं स्वयंस्फूर्तीनें ही गोष्ट विचारावी याबद्दल न्यायमूर्तींना अत्यंत समाधान वाटलें. त्यांनीं इंग्रजी शिकविण्यास आरंभ केला. न्यायमूर्तींना फिरतीवर जावयाची वेळ आल्यावर हुजूरपागेच्या मुख्याध्यापिका मिस् हर्फर्ड या त्यांना इंग्रजी शिकवावयास येत असत. सुविख्यात समाजसुधारक पंडिता रमाबाई या विद्वान् स्त्रीच्या स्नेहशील सहवासानें रमाबाईंना समाजसेवेचें महत्त्व कळून आलें.

## इकडे आड आणि तिकडे विहीर :

एकत्र कुटुंबपद्धतीमुळें रमाबाईंना शिक्षण घेतांना किंवा थोडीफार समाजसेवा करतांना फार कष्ट पडले. न्यायमूर्तींच्या मनाचा कल व घरांतील वडिलधाऱ्या स्त्रियांच्या अपेक्षा या दोन गोष्टी परस्परविरुद्ध असल्यानें पुष्कळदां अडकित्त्यातील सुपारीसारखी त्यांची अवस्था होत असे. अशी परिस्थिति असतांना त्यांनीं अनुपम सोशिकता दाखविली. त्यांच्या मूळच्या संस्कारसंपन्न व्यक्तिमत्वाला शिक्षणानें अधिक तेजस्वी पैलू पडले.

इ.स. १८८०च्या सुमारास न्यायमूर्तींची नाशिकला बदली झाली. त्यावेळीं त्यांचा व प्रारंभीचे प्रख्यात समाजसुधारक लोकहितवादी यांचा परिचय झाला. प्रगतिप्रिय अशा या दोन्ही समाजधुरंधरांचे विचार, संभाषण व कृति यांचा सुपरिणाम होऊन रमाबाई, लोकहितवादींच्या गृहिणी व लेकीसुना यांनीं स्त्रियांना जागृत करण्यासाठीं हळदीकुंकवाच्या निमित्तानें सर्व वर्गाच्या स्त्रियांना बोलावून स्त्रीशिक्षणाचा प्रचार करण्यास सुरुवात केली.

## सार्वजनिक सभेंतील पहिलें भाषण :

नाशिकच्या कन्याशाळेचा बक्षिससमारंभ ठाण्याचे सेशनजज्ज मि. कागलन यांच्या पत्नीच्या हस्तें करण्याचें ठरलें. त्या प्रसंगीं आभारप्रदर्शन करून जमलेल्या स्त्रियांना दोन उत्तेजनपर शब्द सांगणें जरूर होतें. तें भाषण रमाबाईंनींच वाचून दाखविलें. हें भाषण झाल्यावर त्यांनीं व्यासपीठावरील सर्व स्त्रियांना पुष्पहार अर्पण केले व एक हार वगळून ठेवला. परक्या पुरुषाला

पुष्पहार घालणें हें मर्यादेला सोडून आहे, असें त्यांना मनःपूर्वक वाटत होतें. तो हार मग स्वतः लोकहितवादी यांनीं मि. कागलन यांच्या गळ्यांत घातला. रमाबाईच्या या विवेकयुक्त वागणुकीनें न्यायमूर्ति व इतर सर्व मंडळी संतोष पावली. केवळ भिडेला बळी पडून तो हार साहेबमजकुरांच्या गळ्यांत रमाबाईच्या हातानें पडला असता तर त्या काळांत त्याचा केवढा गहजब झाला असता, याची कल्पनाच केलेली बरी ! कारण शिकणेंसवरणें व सभेंत बोलणें हेंसुद्धां कुलवंतांच्या स्त्रियांना दूषणास्पद आहे, अशी विचारसरणी त्यावेळीं रूढ होती. तेव्हां जुन्यानव्याचा विवेक करून योग्य तऱ्हेनें वागण्याची जबाबदारी या प्रथमशिक्षित स्त्रियांवर होती. तासगांवला त्यांनीं मुलींसमोर जें स्वतंत्र भाषण केलें त्यांत प्रामुख्यानें हीच गोष्ट सांगितली.

"मुलींनों, मनुष्यानें उद्धट व्हावें हा सुशिक्षणाचा परिणाम खचित नव्हे. केळीचें वैभव म्हणजे तिला मोठा लंगर येणें. पण असें वैभव प्राप्त झालें असतां ती कधीं ताठत नाहीं उलट अधिक नम्र व विनयशील दिसते त्यामुळेंच ती अतिशय शोभते. याकरितां मुलींनों, तुम्ही शिकलेल्या मुलींनीं तर या आक्षेपाला जागाच देतां कामा नये."

## सार्वजनिक कार्यांत पदार्पण :

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक सभा, नेटिव्ह जनरल लायब्ररी, औद्योगिक परिषद् , वसंतव्याख्यानमाला, फिमेल हायस्कूल, प्रार्थनासमाज, सार्वजनिक सभा इत्यादि तत्कालिन अनेक संस्थांच्या कार्योशीं न्यायमूर्ति रानडे यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता. पुण्या-मुंबईतील सुधारणाप्रिय विद्वान् मंडळींचा सहवास या ना त्या कारणानें न्यायमूर्तींना होत असे. म्हणूनच 'स्त्रीविचारवती सभा' आणि पंडिता रमाबाईचा 'आर्य महिला समाज' या संस्थांतील कार्यक्रमांना हजर राहून त्यांत भाग घ्यावा असें रमाबाईंना मनापासून वाटूं लागलें. त्याप्रमाणें त्या प्रत्यक्ष वागूं लागल्यावर घरांतल्या स्त्रियांनीं त्यांच्यावर बहिष्कार टाकला. मिस् हर्फर्ड शिकवून गेल्यावर रमाबाईंना विहिरीच्या थंडगार पाण्यानें स्नान करावें लागे. केर काढतांना एखाद्या

कागदावरची दोन अक्षरें वाचली तरच लगेच ताकीद मिळे. “ माडीवर काय नाचायचं ते नाचत जा. आमच्या समोर आमची अशी अमर्यादा केलेली आम्हांला खपणार नाहीं. ” त्या दिवसांचें वर्णन करतांना रमाबाईंनीं “ आठ महिन्याचा उन्हाळा व एक दिवसाचा पावसाळा ” असें समर्पक शब्द वापरले आहेत. कारण न्यायमूर्ति घरांत असतील तेवढाच वेळ घरांत शांतता असे. अशी सतत धुसफुस चालली असतांना एका शब्दानेंही उलट उत्तर न देतां धीमेपणानें स्वतःचें काम करण्यांत रमाबाई खरोखर न्यायमूर्तींच्या अर्धांगी शोभत होत्या.

एकदां एक विद्वान् संस्कृतज्ञ बाई अनसूयाबाई यांचें पुराण विष्णु-मंदिरांत असतांना सभामंडपांतील सर्व जागा व्यापून टाकून सुधारक स्त्रियांना पुरुषांत बसविण्याचा बेत सनातनी स्त्रियांनीं केला. या बहिष्कारानें रमाबाई फार गोंधळल्या. पुरुषांच्यांत पांचच मिनिटें बसून डोकें दुखत असल्याचें निमित्त दाखवून त्या घरीं निघून आल्या. सर्व प्रकार घरांतील वडिलधाऱ्या स्त्रियांना सांगतांच त्यांना फार समाधान वाटलें. रमाबाईंना शाबासकी देत ताईसासूबाई म्हणाल्या, “पाहिलेंस, हा असाच तर्क ठेवला म्हणजे लौकिकांत बरें दिसतें. लोक नांवें ठेवीत नाहींत. या नव्या शिकलेल्या पुरुषांना व्यवहार नसतो. त्यांना राग आला तर जाईल दोन दिवसांत.” न्यायमूर्ति घरांत आल्यावर त्यांनीं प्रथम रमाबाईंच्या प्रकृतीची चौकशी केली. केवळ मनस्तापानें त्या घरीं निघून आल्या हें कळल्यावर त्यांना न्यायमूर्तींनीं अबोल्याची शिक्षा दिली. बिचाऱ्या रमाबाई ! सर्व माणसांना एका वेळीं सुख देणें त्यांना शक्यच नव्हतें !

## इंग्रजींतून भाषण :

इ. स. १८८३ मध्यें पुण्याच्या हिराबागेंत स्त्रीपुरुषांच्या संमिश्र सभेंत मुलींच्या हायस्कूलची मागणी करण्यांत आली. त्या प्रसंगीं रमाबाईंनीं इंग्रजींतून भाषण केलें. या घटनेनें पुण्यांत खूप खळबळ उडाली. घरांत तर साऱ्याच गोष्टींचा कळस झाला. ताईसासूबाई म्हणत होत्या,

"शर्थ झाली बाई! मला ऐकल्यापासून नवलच वाटतं आहे. घरांत इतकी गरीब दिसते आणि बाहेर कसा एवढा धीटपणा येतो तो?" न्यायमूर्तींनीं घरांत पाउल टाकल्यावर ताईसासूबाईंनीं त्यांना एकदम खोंचक सवाल केला, "काय रे, तुझी बायको एवढ्या पुरुषांच्या समोर भर सभेंत बोलली तर तुझी पगडी कशी डोक्यावर राहील? आतांच्या या मुली बोट दिलें तर हात गिळावयाला येतात. त्यांना बेतानें वागांवेलें नाहीं तर घडगत नाही." घरांतील हें वादळ नंतर शमलें. 'अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति।' या वचनाप्रमाणें रमाबाईंच्या शांत स्वभावामुळें चहाच्या पेल्यांतील वादळें थोड्या वेळांत शमत असत.

## सुखी गृहजीवनास प्रारंभ :

नंतरच्या एकदोन वर्षांत पुष्कळ गोष्टींना नवीन कलाटणी मिळाली. न्यायमूर्ति रानडे यांचें वास्तव्य मुंबईस झाल्यावर रमाबाई या घरांतल्या कर्त्यासवरत्या गृहिणी झाल्या. समाज परिस्थिती झपाट्यानें बदलत होती. लक्ष्मीचा वरदहस्त असूनही जी मनःशांति आजपर्यंत रमाबाईंना लाभली नव्हती ती या स्वतंत्र वातावरणांत लाभली. घरांतील वडिलधाऱ्या स्त्रियांनींही संन्यस्त वृत्ति स्वीकारून गृहराज्याची सर्व सूत्रें रमाबाईंच्या हातांत दिली. दहा माणसांच्या घरांत त्यांच्यावर स्वयंपाकाची वेळ कधींच येत नसे. त्यामुळें न्यायमूर्तींबरोबर फिरस्तीवर गेल्यावर रमाबाईंचा स्वयंपाक बिघडे. तेव्हां नाशिकला असतांना न्यायमूर्तींनीं रमाबाईंना सूपशास्त्राचें पुस्तक आणून दिलें व त्यांच्या बेचव स्वयंपाकाकडे तें इतर चुकांप्रमाणें विनोदी वृत्तीनें पाहूं लागले. रमाबाईंच्या 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' या आत्मवृत्तांत प्रत्येक पानापानावर जी भक्ति व कृतज्ञता लेखिकेनें व्यक्त केली आहे, त्याचें रहस्य न्यायमूर्तींच्या उदारशील स्वभावांत आहे हें निश्चित्! मुंबईंत आल्यावर रमाबाईंनीं पुनश्च समाजसेवेला आरंभ केला. 'हिंदु लेडीज सोशल क्लब' या संस्थेची त्यांनीं स्थापना केली. मुंबईंतील सर्व जमातीच्या स्त्रियांच्या हस्त-कौशल्याचें एक प्रदर्शन या संस्थेतर्फे भरविण्यांत आलेलें होतें.

## आश्रितांबद्दल वात्सल्य :

रमाबाईंना अपत्यसुख लाभलें नाहीं. त्या दृष्टीनें संसारांतील एका मोठ्या सुखाला त्या पारख्या झाल्या होत्या. पण सतत आश्रयाला असलेल्या गरीब विद्यार्थ्यांवर व घरांतील इतर मुलांवर आपपरभाव न दाखवितां त्या वात्सल्य बाळगीत असत.

आश्रित विद्यार्थ्यांना संपन्न घराण्यांतून जरा कमी प्रतीनें वागविण्याची पद्धत कांहीं ठिकाणीं होती. स्वतः रमाबाईंना ते मुळींच आवडत नसे. एका लहानशा प्रसंगानें रमाबाईंच्या स्वभावाची बाजू दिसून येते.

साधाच प्रसंग : जेवावयास उशीर झाल्यानें सर्वांना खूप भूक लागली होती. आक्कांनीं—रमाबाईंच्या वडिल नणंदेनें-एका विद्यार्थ्याला माडीवरून डेऱ्यांतून गूळ काढून आणण्यास सांगितलें. त्यानें स्वयंपाकघरात गूळ देऊन आणखी थोडा गूळ काढून आणला आणि तो सर्वांना वाटला. घरांतल्या बायकांच्या परवानगीशिवाय आश्रित मंडळींनीं असें वागावें याचा वडिल, धाऱ्या बायकांना फार राग आला. पण रमाबाईंचें अंत:करण स्वभावतः कनवाळू असल्यानें त्यांनीं विद्यार्थ्यांची बाजू घेतली. त्या म्हणाल्या, " बिचारी मुलं ! भूक लागली नी थोडं खाल्लं तर काय बिघडलं ? आपल्या घराबद्दल त्यांना परकेपणा वाटत नाहीं हीच गोष्ट यावरून उघड होते. " अर्थात् त्यांचें म्हणणें कुणाला पटलें अशांतला भाग नाहीं. पण रमाबाईंचा उदार दृष्टिकोन यावरून प्रतीत होतो.

एकदां रमाबाईंची भावजय त्यांना कशावरून तरी टोंचून बोलली, " वन्सं, तुम्हांला ना मूल ना बाळ. मुलांच्या खस्ता काय खाव्या लागतात त्याचं सुखदु:ख तुम्हाला काय माहीत असणार ! " त्यावर रमाबाई म्हणाल्या, " बरं तर मग, तुझं हें मूल मला दे. मग मी पाहीन मला मूल खरोखरच सांभाळतां येतं कीं नाहीं तें ! " आणि म्हटल्याप्रमाणें भावजयीच्या सखूला त्यांनींच लहानपणापसून वाढवली. याखेरीज पुतण्या नानू

व पुतणी शांता त्यांच्याचकडे असे. रमाबाईंनीं आपल्या आत्मचरित्रांत या सर्व मुलांच्या व्यक्तिरेखा लिहिल्या असून तें आत्मचरित्र आपल्या प्रिय कन्येला—सौ. सखू विद्वांस हिला अर्पण केलें आहे. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे मनाला विरंगुळा वाटण्यासाठीं जिच्या सूचनेवरून त्यांनीं या आठवणी लिहिल्या ती त्यांची प्रिय कन्या सखू तें पुस्तक प्रकाशित होण्याचा आंतच दिवंगत झाली.

## मृत्यूच्या छायेंत :

इ. स. १८९१ च्या सुमारास न्यायमूर्तींना कॉलऱ्याची बाधा झाली. दोन दिवसांत त्यांची प्रकृति विलक्षण झपाट्यानें खालावत गेली. तिसऱ्या दिवशीं वाचा बंद झाली. त्यावेळीं रमाबाईंना धीर द्यावयाला कुणींच नव्हतें. करमाळ्याहून पुण्याला तारा करण्यांत आल्या. प्रवासांत असल्यानें शुश्रूषेसाठीं लागणाऱ्या वस्तूंचाही संग्रह जवळ नव्हता. रमाबाईंची अवस्था अतिशय करुणास्पद झाली. त्या अवस्थेंत त्यांना एक स्वप्न पडलें. तें असें कीं, " कृष्णाकांठचा एक विशाल वटवृक्ष पुढें पुढें वाकूं लागला. त्याच्या आश्रयास उभ्या असलेल्या रमाबाईंनीं त्याला सांवरण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. त्यांच्या आक्रोशानें हजारों मंडळी जमली आणि त्यांनीं आपापल्या परीनें प्रयत्न केल्यावर तो वटवृक्ष अधिक न वाकतां तसाच कललेला राहिला. " या सूचक स्वप्नाप्रमाणें या जिवावरच्या या दुखण्यांतून न्यायमूर्ति वांचले, तरी त्यांची प्रकृति मात्र दिवसेंदिवस क्षीण होऊं लागली. आणखी एकदोन जिवावरची गंडांतरें येऊन गेलीं. इ. स. १८९७ च्या प्लेगनें जिवलग मित्र व नोकरमाणसें मृत्युमुखीं पडल्यावर न्यायमूर्तींना अन्नद्वेष झाला. इ. स. १८९९ च्या सुमारास 'सनस्ट्रोक 'च्या दुखण्यांतून त्यांचा जीव बचावला. परंतु आपण हळूहळू थकत चाललों ही जाणीव निर्माण झाल्यानें ते सगळी निरवानिरव करूं लागले. त्यांचा 'ऍझम'चा विकार बळावला. त्यामुळें लाहोर कॉंग्रेसला जाण्याचा बेत त्यांनीं रद्द केला. विश्रांतीसाठीं महाबळेश्वरला जाण्याचें ठरलें. पण न्यायमूर्तींच्या प्रकृतीचें मान जास्तच असमाधानकारक दिसूं लागलें.

विभाग बा.वा. क्रमांक १९२० नों. दि.

रमाबाईंचें मन आशानिराशेच्या लाटांवर हेलकावे खात होतें. परमेश्वराला शरण जाण्याखेरीज त्या काय करणार ! त्यांनीं परोपरीनें परमेश्वराला आळविलें, “ नारायणा, मला समजूं लागल्यापासून माझ्या सर्व सुखांचा व आनंदाचा ठेवा काय तें एवढेंच ठिकाण आहे, हें तूं जाणत आहेस. तें तूंच साभाळ. यापेक्षां अधिक मोठें सुख मी कशांतच मानिलें नाहीं. संसारांत मला मुलेंबाळें नाहींत, ही उणीवसुद्धां मला कधीं भासली नाहीं, इतकी मी या सहवासांत संतुष्ट आहे. राजेरजवाडे, संस्थानिक, जहागिरदार यांच्या बायका संतति-संपत्तीनें व अधिकार-वैभवानें कितीही थोर असल्या तरी माझ्यापेक्षां त्यांचें सुख अधिक खास नसेल. स्वतःची जोड मिळाल्यामुळें मला आज जी धन्यता व जें समाधान होत आहे त्याला उपमा नाहीं. देवा, हें सारें देणारा तूं व रक्षण करणाराही तूंच आहेस. ” पण प्रार्थनेनें मनाला सांवरीत असतांनाही ‘ भुंग्यानें पोखरलेल्या पण वरून अगदीं शाबूत दिसणाऱ्या तुळईसारखी अवस्था ’ झालेली होती. त्या आपल्या आत्मचरित्रांत या घटनेचें हृदयस्पर्शी वर्णन करतांना लिहितात, “ अजूनही हें दुखणें बरें होईल अशा आशेच्या नादांत मी कित्येक तास काढी व तेवढाच वेळ मला सुखाचा वाटे. पण ईश्वरी इच्छा निराळीच होती ! तिची कल्पनाही मला नव्हती ! म्हणून अंतःकरण करपून टाकणाऱ्या काळजींतहि ज्या स्थितीला मी सुख म्हणून मानीत होतें तें सुख पुढें पुरतें चोवीस ताससुद्धां टिकलें नाहीं ! ज्या दैदीप्यमान् तेजोमय सौभाग्य सूर्याच्या प्रकाशांत मी मोठ्या भूषणांनें व खऱ्या आनंदानें एकसारखी सत्तावीस वर्षें वागत होतें तें प्रत्यक्ष सेवा घेणारे दिव्य सूर्यरूपी पाय मला अंतरल्यामुळें अत्यंत दुःखरूप निबिड अंधारांत चांचपडत राहाण्याचा प्रसंग येऊन ठेपला. ”

## बकुळीची माळ :

इ. स. १९०१ मध्यें न्यायमूर्तींनीं इहलोकीची यात्रा संपविली. त्यानंतर जवळ जवळ चार वर्षें रमाबाई दुःखाच्या आवर्तांत बुडून गेल्या होत्या. पण

ज्या लोकाग्रणीनें महाराष्ट्राला नवचैतन्य दिलें त्याच्या आपण गृहिणी आहोंत या जाणिवेनें त्यांनीं पुन्हां एकदां सामाजिक क्षेत्रांत पाऊल टाकलें. इ. स. १९०४ मध्यें पहिल्या महिला परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलतांना त्या म्हणाल्या, " ज्या श्रेष्ठ, प्रेमळ व पवित्र सहवासांत माझी सत्तावीस वर्षें सार्थकी लागलीं त्याचा परिणाम म्हणजे मी माझ्या मनाच्या स्थितीला कुरवाळीत बसूं नये हा आहे. पण माझ्यांत तेवढें सामर्थ्य नाहीं. आपण मला आज जें अध्यक्षस्थान दिलें तें मी कांहीं शिकलीसवरलेली बाई म्हणून दिलें आहे, असें मला वाटत नाहीं. देवाच्या पायांवर जी बकुळीच्या फुलांची माळ वाहिलेली असते, तिच्या निर्माल्य स्थितींतही एक प्रकारचा आदर आपणांस वाटत असतो व अशा बुद्धीनेंच आज जो आपण मान दिला त्याचें विशेष भूषण वाटतें. व त्याबद्दल मी आपली फार आभारी आहे. "

## सेवासदन :

इ. स. १९०८ मध्यें मलबारी शेटजींनीं मुंबईस ' सेवासदन ' ही गरीब स्त्रियांसाठीं संस्था काढली. या संस्थेचें अध्यक्षस्थान रमाबाईंनीं स्वीकारावें असा आग्रह धरण्यांत आला. त्याप्रमाणें त्यांनीं ही जबाबदारी स्वीकारली इतकेंच नव्हे तर इ. स. १९०९ मध्यें पुण्यालाही या संस्थेची शाखा उघडण्यांत पुढाकार घेतला. या संस्थेचें काम त्यांनीं अनेक वर्षें केलें. ' सेवासदन ' या संस्थेचें शैक्षणिक कार्य महाराष्ट्राला विदित आहेच. गुन्हेगार स्त्रियांना भेटून त्यांच्या अडचणी निवारण्याचा व वेळोवेळीं त्यांना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न त्या करीत असत.

सेवासदनसारख्या संस्थेमुळें महाराष्ट्रीय अनाथ स्त्रियांना दयेची सांवली मिळाली. न्यायमूर्तींनीं ज्याप्रमाणें कुणालाही न दुखवितां दहाजणांचें घर चालविलें त्याचप्रमाणें त्यांच्या पश्चात् रमाबाईंनीं आपल्या सर्व आप्तमंडळींची सेवा मोठ्या आनंदानें केली. कोणत्याहि लोकोपयोगी कार्याला मदत करण्या-साठीं तनमनधन खर्चून त्या पुढें आल्या नाहींत, असें झालें नाहीं. अशा

प्रकारें अत्यंत परोपकारी वृत्तीनें उर्वरित आयुष्य घालवून इ. स. १९२४ च्या एप्रिलमध्यें त्यांनीं या जगाचा निरोप घेतला.

## शीतल चंद्रिका :

न्यायमूर्तींची जोड मिळाल्यानें रमाबाईंचें जीवन तत्कालीन स्त्रियांच्यापेक्षां फार वेगळ्या तऱ्हेनें गेलें. त्यांच्याबद्दल लिहितांना केसरीकारांनीं एक मार्मिक उपमा दिली आहे. ते म्हणतात,–" कै. रावसाहेब रानडे यांच्या हयातींतच वहिनीसाहेबांची योग्यता समाजास कळून आली होती. तथापि ज्याप्रमाणें सूर्याच्या सान्निध्यानें चंद्राचा प्रकाश दुणावत नसून उणावतो त्याप्रमाणें न्यायमूर्तींच्या व्यापक तेजांत रमाबाईंचें तेज वेगळें भासमान होत नव्हतें. परंतु सूर्यास्तानंतर जसा चंद्राचा शीतल प्रकाश प्राणिमात्रास आल्हाद देतो त्याप्रमाणें गेली तेवीस वर्षें श्रीमती रमाबाईंनीं आपल्या परोपकार बुद्धीनें, स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्तृत्वानें, आणि मातृवात्सल्यानें महाराष्ट्रीय समाजास ऋणी करून ठेविलें आहे."

अत्यंत सनातनी वातावरणांत जन्म घेऊन व तशाच वातावरणांत सतत वावरत असतांना काळाची पावलें अचूक ओळखून नव्या जगातील नव्या कल्पनांचें स्वागत रमाबाईंनीं केलें, यांतच त्यांच्या श्रेष्ठ जीवनाचें रहस्य आहे.

---

## अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :

१. श्री. रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' हें आत्मवृत्त वाचा.

२. रमाबाईंच्या उदाहरणानें एकत्र कुटुंबपद्धतींतील कोणते दोष तुमच्या ध्यानांत येतात?

३. रमाबाईंच्या चरित्रावरून त्यांच्या कोणत्या गुणांची तुम्हांस ओळख पटते?

४. 'बकुळीची माळ' आणि 'शीतल चंद्रिका' या दोन्ही उपमा रमाबाईंना कां शोभून दिसतात, तें सांगा.

सौजन्याची साक्षात् मूर्ति

# काशीबाई हेरलेकर



[ जन्म इ. स. १८७४; मृत्यु इ. स. १९३६ ]

[ सुशिक्षित स्त्रीबद्दल सर्व समाजांत एक प्रकारची साशंकता व तिरस्काराची भावना स्पष्टपणें दिसत होती. अशा प्रकारची साशंकता वाटण्याचें कारण पाहूं गेल्यास इंग्रजी शिक्षणानें स्वैराचारी बनलेली पहिली अर्धशिक्षित मंडळी या प्रतिकूल मताला कारणीभूत झाली होती, असें खेदानें म्हणावे लागेल. नवें शिक्षण घेऊनही जुन्या पिढीचा आदर संपादन करणें अशक्य नसलें तरी बरेंच कठीण होतें. पण अशा बिकट काळांतही शिक्षणानें गौरव संपादन करून जुन्या काळांतील उत्कृष्ट आदर्शांचे परिपालन करणारा स्त्रियांचा तो वर्ग होता त्याच्या अग्रेसर प्रतिनिधि काशीबाई हेरलेकर या होत. जुन्या मंडळींना नवीन दृष्टिकोन पटवून देणें आणि नवशिक्षितांना त्यांच्या जबाबदारीचें स्मरण करून देणें ही दुहेरी कामगिरी काशीबाईंनीं केली. त्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या कार्याला वाहून घेतलें होतें या-शिवाय सामाजिक सुधारणेचें कार्य त्यांनीं सतत लेखन व व्याख्यानद्वारां केलें सुशिक्षित स्त्रीबद्दल आदर निर्माण करण्याचें सामर्थ्य त्यांच्या शांत व गंभीर व्यक्तिमत्वांत होतें हें निश्चित ! ]

दुपारची शांत वेळ! पुरुषमंडळी आपापल्या कामाला गेलेली. मुलें शाळेंत अडकलेलीं. गांवदेवी भागांतल्या त्या चाळींतील गृहिणी घरकाम आटोपून विश्रांति घेत होत्या. पण कुतुहूल त्यांना स्वस्थ बसूं देईना. हळूंहळूं सर्वजणी जमल्या. पंधरा नंबरच्या खोलींत नवीन गृहिणी राहायला आलेली होती. ती म्हणे पुण्याला इंग्रजी शाळेंत शिकत होती. एवढी शिकलेली मुलगी आपल्याशी कशी काय बोलते याबद्दल सर्वांनाच जरा शंका होती. तरीही पण एकदां संघटित रीत्या प्रयत्न करायचें ठरलें. पांचसातजणींचा तांडा खोलीबाहेर जाऊन उभा राहिला. त्यापैकीं एकीनें खिडकींतून डोकावत विचारलें, " अहो, येऊं का आंत ? " " या–ना " स्मितहास्य करीत घरमालकीणीनें उत्तर दिलें. लगेच सर्वजणी आंत शिरल्या आणि काकदृष्टीनें त्यांनीं संसाराची पाहाणी केली. सदोष असें कांहीं न दिसल्यानें त्यांची जरा निराशा झाली. नांव-गांव, सासर-माहेर, बहिणभाऊ, नणंदा-जावा सगळी मामुली चौकशी संपल्यावर त्यांची भीड बरीच चेपली. घरमालकिण पंधरा वर्षांची अननुभवी गृहिणी होती. शिकलेल्या मुलींच्या ठिकाणीं अपेक्षिली जाणारी आढ्यता हिच्या ठिकाणीं दिसत नव्हती. उलट ती सर्वांशीं अकृत्रिम स्नेहभावानें बोलत होती. बोलतबोलत तिचें गहूं दळण्याचें काम चाललें होतें. तेवढ्यांत एकीनें जात्यावरचें पीठ हाताच्या चिमटींत घेऊन पाहिलें. " बाई बाई ! किती जाड पीठ हें ! " ती उद्गारली. त्याबरोबर सर्वजणींनी पिठांत हात घातला. " तुम्हाला अगदींच दळतां येत नाहीं हो ! " एकीनें शेरा मारला. " माहेरचं वळण नाहीं दुसरं काय–! " दुसरीनें ठसक्यांत म्हटलं; तिसरी नाकाचा शेंडा उडवीत बोलली, " आम्हा कोकणस्थांत नाहीं ग बाई असं दिसायचं. या देशावरच्या बायकांत सुग्रणपणा कसा तो नाहींच मुळीं ! " त्याबरोबर एक देशस्थीण उसळून म्हणते, पुरणपोळ्या आणि शेवया करणाऱ्या आम्हां बायकांना तुमच्या सुग्रणपणाची नका ऐट दाखवूं. अहो, हें शिक्षण बरं. नवं शिक्षण ! " शिक्षणाचें नांव घेतल्यावर कोंकणस्थ-देशस्थ सर्व एक झाल्या. " खरंच ग बाई, या शिक-

लेल्या नायकांचं, असंच असणार ! पुरुषांच्या खुर्चीला खुर्ची लावून बसायचं, यस फ्यस करायचं आणि घरांत हा असा अंधार ! आपलाच संसार बरा म्हणायचा" असें बोलत बोलत त्या घरीं गेल्या. या प्रौढ स्त्रियांनीं स्वतःच्या संसारज्ञानाचें प्रदर्शन करतांना आपल्या नव्या शेजारणीला किती दुखविलें याची त्यांना कल्पनाही नव्हती. ती नवी गृहिणी काशी मात्र मुंबईतील जीवनाच्या या पहिल्या कटु अनुभवानें फार कष्टी झाली. "आपल्याला दळतां आलें नाहीं म्हणूनच हा प्रसंग घडला ना ?" असा समतोल मनानें विचार करून तिनें दररोज दळण्याचा परिपाठ ठेवला. तिला लहानपणीं ऐकलेली ओवी आठवली–

"गरतीचा गरतवा, अग कशांत ओळखावा
बहिण सोनूबाई, तिच्या पिठांत बारकावा."

या सुग्रण गृहिणीच्या कसोटीला उतरण्याचें काशीनें ठरविलें. हुजूरपागेसारख्या नामांकित शाळेंत पहिला नंबर पटकावणाऱ्या काशीला तें अशक्य नव्हतेंच मुळी ! तिनें जी गोष्ट मनावर घेतली त्यांत पारंगतता नेहमींच मिळवली. तिच्या करारी व्यक्तिमत्त्वाचा तो एक पैलू होता.

## जन्म व बालपण :

काशीबाईंचे माहेरचे मूळ आडनांव नवाथे. त्यांचें मूळ गांव राजापूराजवळ असलेले 'भूं' हें गांव. त्यांचे एक पूर्वज विठ्ठलपंत यांनीं एकदां वाघाच्या पायांतला कांटा काढला. म्हणून लोक त्यांना विठ्ठलदेव असें संबोधूं लागले. त्यानंतर देवनवाथे असें आडनांव रूढ झालें. कालांतरानें देव हे सुटसुटीत उपनांव प्रचारांत आलें. याच घराण्यांतील नारायण विष्णु देव यांच्या कन्या काशीबाई होत. नारायणराव वडिलोपार्जित शेतीचें काम करीत. वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत त्यांना विद्या नव्हती. एकदां एका पाहुण्यानें म्हटलें, "अरे नारायण, एवढा मोठा झालास तरी विद्या नाहीं ? छे ! छे ! हें ब्राह्मणास अगदीं शोभत नाहीं." या उद्‌गाराचा त्याच्यावर फार परिणाम होऊन त्यानें एका वस्त्रानिशीं घर सोडलें. जवळ प्रवास खर्चाला पैही नव्हती.

तो खाडींतून पोहून किनाऱ्यास आला. पुढें पायीं प्रवास करून त्यानें देश गांठला. मराठी सहावी इयत्तेपर्यंत शिकून त्यानें शाळामास्तरची नोकरीही मिळविली. प्रौढपणीं विद्या संपादन केल्यामुळें विद्येची विशेष किंमत त्यांना वाटूं लागली. गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतर पहिल्या दोन गृहिणी अकालीं निधन पावल्या. त्यांचा तिसरा विवाह वेणूबाई हर्डीकर यांच्याशीं झाला. वेणूबाई ऊर्फ सगुणाबाई देव यांनीं शिकावयास प्रारंभ केल्यावर त्यांच्या माहेरच्या माणसांनीं अजिबात संबंध तोडून टाकला. सगुणाबाईनीं मराठी सहा इयत्ता झाल्यावर ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यासक्रमही पुरा केला. अशा या विद्याव्यासंगी आईच्या पोटीं काशीबाईचा जन्म २९ मार्च १८७४ या सालीं झाला.

काशीला मोठा भाऊ असूनही वडिलांचा काशीकडे विशेष ओढा असे. सर्व मुलांमध्यें काशी जास्त प्रिय कां हें अपत्यप्रेमाचें गूढ उलगडणें कठीण नाहीं. तीव्र स्मरणशक्ति, समजुतदारपणा व लाघवी वृत्ति या गुणांनीं लहानगी काशी सर्वांनाच प्रिय होई. वडील भावाचें ऐकून ऐकून सर्व अंक, पाढे व श्लोक ती पाठ करी. याच सुमारास सगुणाबाईचे माहेरच्या माणसांशीं पुनर्मीलन झालें. आपल्या मुलीनें शिकलेलें जरी हर्डीकरांना आवडलें नाहीं तरी नातीनें घडाघड वाचून दाखवल्यावर त्यांना कौतुक वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

ही सर्व मंडळी पुण्याच्या शुक्रवार पेठेंत न्यायमूर्ति रानडे यांच्या वाड्यांत राहात असत. न्यायमूर्तींचें सान्निध्य व त्यांचे स्त्रीशिक्षणविषयक उदार विचार याचा त्यांच्यावर सुपरिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. सगुणाबाई, रमाबाई रानडे यांना शिकवीत आणि नारायणराव न्यायमूर्तींचे बंधु आबा व बाबा यांना शिकवीत असत. ही शिकवणी, शाळेंतील अध्यापन व घरकाम या तिन्ही गोष्टी सगुणाबाईनीं पार पाडल्या त्या केवळ सुदृढ प्रकृतीच्या जोरावर.

**शिक्षण :**

पांचव्या वर्षीं काशी कोणतेंही मराठी पुस्तक अस्खलित वाची व उत्तम अक्षर काढी. इ. स. १८७९ सालीं सगुणाबाईची बडोद्याच्या राणी-

साहेबांची अध्यापिका म्हणून योजना करण्यांत आली. त्या काळात साठ रुपये पगार, रहायला घर व मानमरातब व या दृष्टीनें ही नोकरी मोठी सुखाची होती. नारायणरावही बडोद्यासच अध्यापन करूं लागले. काशीचें प्राथमिक शिक्षण तेथेंच झालें. पुढल्या आयुष्यांतही या बडोदें शहराला त्यांच्या सेवेचा अधिक लाभ मिळाला. प्राथमिक शाळेंत शिकत असतांना गंगूबाई धुमाळ या बाईंना काशीच्या उत्तम अक्षरानें दाट संशय येऊन 'कुणाकडून लिहून आणलेस–बोल' असें त्यांनीं तिला विचारलें. त्यांची संशयनिवृत्ति न झाल्यानें त्यांनीं तिला छडीनें यथास्थित चोप दिला. पुढें बडोदें संस्थानांतून शिष्यवृत्ति मिळून इ. स. १८८४ मध्यें काशीची हुजूरपागेंत रवानगी झाली. करारी व शिस्तप्रिय अशा मिस् हर्फर्ड या त्यावेळीं मुख्याध्यापिकेच्या जागेवर होत्या. तेथील वसतिगृहांत फक्त सहा मुली होत्या. त्यावेळीं मुलीच्या आईला किंवा मावशीला तेथें राहाण्याची परवानगी असे. काशीचें वय अवघे दहा वर्षांचें होतें. तानीबाई जाधव ही तिची बडोद्याची मैत्रीण व तिची आई काशीबरोबर होत्या. हुजूरपागा हायस्कूल त्यावेळीं किबे यांच्या वाड्यांत होतें. शिक्षकवर्गात मिस् मेरी सोराबजी, मिस् मेरी भोर आणि हरिशास्त्री भाटवडेकर ही मंडळी होती. शाळेंत थोड्या मुली होत्या. भिडे, नूलकर, भांडारकर व रानडे यांच्या लेकीसुना शाळेंत येत असत. काशी नम्र, हुशार व मेहेनती असल्यानें गुरुजनांची कृपा तिनें संपादन केली. मिशनरी अध्यापिकांच्या निकट सहवासानें काशीलाही कर्तव्यतत्परता व उद्योगी वृत्ति या सद्‌गुणांची जोड आयुष्यभर मिळाली. मिस् हर्फर्ड यांच्या करारी स्वभावाची काशीवर फार छाप पडली. आईपासून लांब असलेल्या छोट्या पाडसांवर त्या ममतेचा वर्षाव करीत. त्यांच्या घोड्याच्या गाडींतून लांब लांब फिरायला जाणें मुलींना फार आवडे. रात्रीं झोंपण्यापूर्वी त्या सर्वांचा प्रेमपूर्वक निरोप घेत. सर्वांच्या तक्रारी, भांडणें ऐकून घेत. आजारी मुलींची योग्य शुश्रूषा करीत. पण शिस्तीच्या बाहेर कुणाचें पाऊल पडलेलें त्यांना बिलकूल खपत नसे. रात्रीं जेवण झाल्यावर त्या सर्वजणींना आपल्याबरोबर

फळें खावयाला बोलवत व वेगवेगळ्या मनोरंजक गोष्टी सांगून तसेंच कधीं कधीं आकाशांतील ताऱ्यांची माहिती देऊन त्यांचें मन रिझवीत. काशी-बाईंनीं त्यांच्याबद्दल म्हटलेंच आहे कीं, "धन्य त्या मिस हर्फर्ड ! सत्ता आणि ममता यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या ठिकाणीं पहावयास सांपडला. एरव्हीं असें कोठें आढळत नाहीं."

**विवाह :**

काशी तेरा वर्षांची झाल्यावर त्या काळाच्या मानानें आपली मुलगी मोठी झाली असें आईवडिलांना वाटू लागलें. परंतु लग्नानंतरही मुलीचें शिक्षण चालू रहावें व भावी जांवई सुशिक्षित असावा अशी त्यांची अपेक्षा होती. मुलीचें शिक्षण चालू ठेवण्याची अट दुसऱ्या पक्षाला संमत होण्यासारखी नसल्यानें विवाहयोग्य वर दृष्टिपथांत येईना. पण शेवटीं एक तरुण तयार झाला. लग्न सहा महिन्यांनीं करावयाचें ठरलें. सहा महिन्यानंतर त्यानें हुंडा म्हणून जास्त रकम मागितल्यानें हें लग्न मोडलें. ह्या मार्गशीर्षांत काशीचें लग्न झालेंच पाहिजे असें तिच्या वडिलांना वाटल्यानें अत्यंत गडबडींत काशीचें लग्न दुसऱ्या ठिकाणीं जमवून ताबडतोब करण्यांत आलें. हेरलेकर आडनांवाचे दोघे भाऊ होते. त्यांतला धाकटा भाऊ नारायणराव पसंत होता. पण वडील भावाचें लग्न झाल्याशिवाय त्याचें होऊं शकत नव्हतें. तेव्हां नाईलाजानें नारायणरावांनीं आपली मुलगी थोरल्या भावाला दिली. काशी त्यावेळीं इंग्रजी पांचवींत होती. तिचें मन अभ्यासांत गुंतलेलें असल्यानें या संस्काराचा आनंद तिला झाला नाहीं. काशीची लग्नगांठ ज्याच्याशीं बांधली गेली ते गृहस्थ बुद्धीनें बेताचें व वयानें काशीपेक्षां चौदा वर्षांनीं मोठे होते. या लग्नानंतर काशी वडिलांबरोबर तानीबाई जाधव यांच्या घरीं गेली असतां तिची आई नारायणरावांना म्हणालीही, "काय हो, घाईनें लग्न केलें ! पोरगी आठ दिवसांत सुकून गेली."

नारायणराव यांनीं जांवयाला मेडिकल कॉलेजमध्यें घातलें. पण वय मोठें, अभ्यासाची संवय मोडलेली व संसाराची प्रबळ आवड यामुळें त्या बाबतींत

त्यांचें पाऊल पुढें पडलें नाहीं. त्यांना शिकलेली पत्नी हवी होती. पण तिच्या शिक्षणांत व्यत्यय येऊं नये हें तत्त्व त्यांच्या हातून अंमलांत आणलें गेलें नाहीं. काशीला विद्येची गोडी असल्यानें सासरचें चार-आठ दिवसांनीं बोलावणें आलें कीं, तिच्या मनाची शांति ढळत असे.

## संसाराचा प्रारंभ :

काशी इंग्रजी सहावी पहिल्या नंबरानें पास झाली. नवीं पुस्तकें आणायला जायचें म्हणून ती फार उत्साहांत होती. पण तिच्या आनंदावर विरजण पडलें. शामराव हेरलेकर अत्यंत संतप्त अशा अवस्थेंत काशीला न्यावयास आले. घरीं गेल्यावर त्यांनीं तिला विचारलें, "बोल, तूं कधीं कुणाला पत्रें लिहिलींस ?" "छे ! मुळींच नाहीं, फक्त आपल्यालाचं मी मुंबईला पत्र लिहीत असे" हें काशीनें उत्तर दिलें. पण शामरावांची संशयनिवृत्ति होईना. हातांत चाकू घेऊन पुन्हां त्यांनीं तोच प्रश्न विचारला व ते म्हणाले, "पहा, खोटं बोललीस तर तुझा जीव घेईन व माझाही देईन." ती रात्र काशीनें विलक्षण अवस्थेंत घालवली. हुंड्यामुळें जें लग्न मोडलें होतें त्या तरुणाचा हा सर्व उपद्व्याप होता. ती शाळेंत जातांना तो रोज वाटेवर उभा राही व नेत्रसुखाचा अनुभव घेई. लग्न मोडल्यावर केवळ सुडानें त्यानें ही आग पेटवून दिली व काशीच्या शीलाविषयीं तिच्या पतीच्या मनांत गैरसमज निर्माण केला. 'मी तिचीं पत्रें दाखवीन' असेंही त्यानें शामरावांना सांगितलें, परंतु तीं पत्रें बनावट आहेत असें सिद्ध झाले आणि काशी म्हणजे सत्याची प्रतिमा अशी ग्वाही तिच्या गुरुजनांनीं दिली. या सर्व प्रकारानें शामरावांच्या स्वभावाची जी बाजू काशीला दिसली त्याचा परिणाम तिच्या कोंवळ्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. तेव्हांपासून सामोरे आलेलें दुःख गिळून टाकायचे ही तिनें मनाला संवय लावून घेतली. आयुष्यभर या दुःखांनीं तिचा पाठपुरावा केला; तरीही दुःखांनीं पिचून न जातां त्यांवर विजय मिळवून काशीबाई देवत्वाला पोंचल्या हें त्यांच्या चारित्रांतील मर्म होय.

## शाळेला रामराम :

इ. स. १८८९ मध्यें व्हिक्टोरिया राणीचे नातू प्रिन्स व्हिक्टर हे हिंदुस्थानांत आले. गांवोगांव त्यांचा सत्कार करण्यांत आला. पुण्याला बुधवारांत हुजूरपागेतर्फे त्यांना हार अर्पण केला. द्वारकाबाई केळवकर या विद्यार्थिनीनें हार व तुरा समर्पण केला. काशीबाईनीं फक्त हातांत तबक धरलें होतें. वर्तमानपत्रांत ही हकीकत दोन्ही मुलींच्या नांवानिशी छापून आली. तें वाचून शामरावांना फार राग आला. त्यानीं काशीबाईंना शाळेंतून काढायचें ठरविलें. हार समर्पण न करतां त्यांनीं फक्त तबक हातांत धरलें होतें. ही वस्तुस्थिति शामरावांच्या निदर्शनास आणून दिली. पुन्हां असा प्रकार होणार नाहीं असें लेखी आश्वासन देण्यांत आलें. परंतु शामरावांनीं आपला हट्ट मुळींच सोडला नाहीं. मॅट्रिकच्या वर्गांत असतांनाच काशीबाईंना शिक्षणाला रामराम ठोकावा लागला. ओठाशीं नेलेला विद्यामृताचा पेला एकदम कुणीतरी ओढून न्यावा, असें त्यांना झालें. त्या काळच्या विवाहपद्धतीमुळें एक निराशा तेराव्या वर्षींच वांट्याला आली. आणि आत्यंतिक निराशेचा हा दुसरा जबर फटका त्यांना नंतर सोसावा लागला. हुजूरपागा सोडतांना काशीबाईंची स्थिति कण्वाच्या शकुंतलेप्रमाणेंच झाली. “ पुन्हां कधीं बरे हें तपोवन मी पाहीन ? ” असेंच विचारतरंग त्यांच्या हृदयांत उद्भवत होते. मुंबईतल्या गांवदेवी भागांतल्या चाळींत संसाराला आरंभ झाला. दळण येत नसल्यानें त्यांची सर्वांनीं कशी कुचेष्टा केली हें आरभीं आलेंच आहे. इतरांची संसारमग्नतेची राहाणी, त्यांचे बोलण्याचे निराळे विषय व विद्येमुळें काशीबाईंवर झालेले भिन्न संस्कार, यामुळें त्या तेथें फारशा रमल्या नाहींत. ”

## शिक्षणव्यवसायांत पदार्पण :

इ. स. १८९० मध्यें त्यांनीं कांहीं महिने बडोद्यास व नंतर स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीच्या कन्याशाळेंत नोकरी केली. याच

सुमारास त्यांची पहिली मुलगी शांता हिचा जन्म झाला. लहान मूल संभाळून नोकरी करणें कठीणच होतें. पण काशीबाईंनीं कष्टप्रद जीवनाची खंत कधींच बाळगली नाहीं. सुंदर अध्यापनाची कला त्यांनीं याच काळांत आत्मसात् केली. नंतरच्या वर्षीं बडोद्यास प्राथमिक शाळेंतील हेडमिस्ट्रेसची जागा रिकामी झाली. त्या जागेसाठीं गुजराथी व मराठी येणारी अध्यापिका असणें जरूर होतें. काशीबाई बडोद्याच्या शिष्यवृत्ति घेणाऱ्या माजी विद्यार्थिनी असल्यानें त्यांची या ठिकाणीं नेमणूक करण्यांत आली. त्या काळांत त्यांना साठ रुपये हें उत्तम गणलें जाणारें वेतन मिळूं लागलें. या सुखदायी घटनेनें काशीबाईंच्या जीवनाला अनपेक्षितपणें नवीन वळण लागलें. बडोद्यासच माहेर असल्यानें व हाताखालील शिक्षक उत्तम असल्यानें हा व्यवसाय फार सुखाचा झाला. स्वतः काशीबाईंनीं त्याबद्दल एके ठिकाणीं म्हटलें कीं, "उन्हांतून सावलींत यावें म्हणजे जसें शांत वाटते, तसें मला वाटलें. शिक्षणाला लहानपणीं मदत केली त्यांच्याच राज्यांत विद्यादानाचें काम प्रयत्न न करतां मिळालें. जणूं काय विद्यादेवीनें हात धरून आणून प्रसन्न होऊन सेवा सोपविली. यामुळें अंतःकरण आनंदी, तृप्त व शांत झालें. दारिद्र्य लयाला गेलें असें वाटतें आणि आयुष्याला आनंद व सन्मानदायक असा कायमचा उद्योग मिळाला."

## पुनश्च हुजूरपागा :

मॅट्रिकचें वर्ष वाया गेल्यामुळें काशीबाईंना फारच रुखरुख वाटत होती. दुसरी मॅट्रिक पास स्त्री मिळाल्यास नोकरीची शाश्वती नव्हती. इ.स. १८९४ मध्यें काशीबाईंची प्रकृति बिघडली असल्यानें वैद्यकीय सल्ल्यानुसार त्यांना विश्रांती घेणें भाग पडलें. तेव्हां त्या पुनश्च हुजूरपागेंत येऊन दाखल झाल्या आणि इ. स. १८९५ मध्यें 'युनिव्हर्सिटी स्कूल फायनल' म्हणजे मॅट्रिकची परीक्षा उत्तम प्रकारें उत्तीर्ण झाल्या. संसार व नोकरी यांमुळें मध्यंतरी शिक्षणांस खंड पडला असूनही केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनीं हें यश मिळविलें. मिस् सोराबजी व मिस् हर्फर्ड यांनीं त्यांच्यासाठीं विशेष मेहनत

घेतली. हुजूरपागेची शाळा बरीच नांवारूपाला चढली होती. वसतिगृहांत पुष्कळ मुली होत्या. त्या सर्वजणींवर काशीबाईंनीं एक सुंदर कविता केली होती. त्यांत त्या प्रत्येकीच्या आडनांवावर कोटी करून तिचें स्वभाववैशिष्ट्य वर्णन केलें होतें. विनोदी तऱ्हेनें प्रत्येकीची एकेक लकब वर्णिलेली असल्यानें त्या कवनांत विलक्षण मार्मिकता आलेली आहे. काशीबाईंनीं मॅट्रिकच्या परीक्षेंत मराठीचा इतका उत्तम पेपर लिहिला कीं सुधारकाग्रणी आगरकर यांनीं त्यांचें अभिनंदन केलें. सुप्रसिद्ध कादंबरीकार हरि नारायण आपटे यांच्या 'करमणूक' साप्ताहिकांत 'नणंद-भावजया' हा निबंध चढाओढीच्या वेळीं पाठविला असतां त्यांना पहिलें बक्षिस म्हणून चांदीचा करंडा मिळाला. या परीक्षेनंतर त्यांना रु. १० पगारवाढ मिळाली. त्यावेळीं हरगोविंददास काटवाला यांनीं काशीबाईंना इंग्लंडला पाठविण्याची सूचना केली. परंतु सरकारनें त्याऐवजीं इंग्लंडहून शिकून आलेली स्त्री इन्स्पेक्ट्रेस म्हणून नेमावयाचें ठरविलें. त्या प्रमाणें मिस् कॉर्नेलिया सोराबजी यांची नेमणूक झाली.काशीबाईंच्या कर्तव्यतत्परतेमुळें त्यांवर सोराबजीबाईंचा बराच लोभ जडला. इ.स. १९०० च्या सुमारास मिस् सोराबजी निवृत्त झाल्या, त्यावेळीं त्यांना मानपत्र देण्यांत काशीबाईंचा पुढाकार होता.

## वाङ्मयसेवा :

शिक्षणव्यवसायांत असतांना त्यांनीं हौसेनें वाङ्मयसेवा केली. प्रासंगिक कविता व लहान मुलांसाठीं नाटिका लिहिण्यांत त्यांना आनंद वाटे. अशा कविता व नाटिका किती लिहिल्या त्याची गणतीच नाहीं. 'मनोरंजन' या त्या काळच्या लोकप्रिय मासिकांत 'सुवासिनी' या टोपण नांवाखाली त्यांनीं विविध प्रकारचें लेखन केलें. त्यांत स्त्रीशिक्षण, प्रौढ विवाह, जातिभेद या त्या वेळच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर विचारप्रवर्तक लेख आहेत. हृद्य अशा कविता आहेत. घरगुती पद्धतीची पण नवीन विचार मांडणारीं पत्रें आहेत. या शिवाय 'आनंद' मासिकांत त्यांनीं लहान मुलांसाठीं विपुल

लिखाण केलें. 'एक होता मुलगा, त्याला सांपडला हुलगा' तसेंच 'मनूताई, मनूताई, गेला होता कुठें, राजाच्या महालांत राणी होती तिथें' ही बाल मनाला रिझविणारी कवनें त्यांचीच होत. या खेरीज 'महाराष्ट्र-महिला' व 'संजीवनी' यांतही त्यांचें लेखन चमकलें होतें. इ.स. १९०८ च्या मनोरंजनच्या दिवाळी अंकांत सर्व नामांकित महिलांचीं छायाचित्रें आलीं होतीं, त्यांत काशीबाई यांचेंही होतें. त्या अंकांत त्यांनीं टोपण नांवानें एक पत्र लिहिलें होतें. परदेशी गेलेला भाऊ आपल्या गतधवा बहिणीस पत्र लिहितो असें कल्पून विधवा स्त्रियांकडे पाहाण्याचा नवा दृष्टिकोन त्यांत मांडलेला आहे. त्यांत भाऊ म्हणतो, "ताई, तुम्हां स्त्रियाचें आयुष्य खरोखर केवढें उदात्त आहे! लग्नापूर्वीची थोडी वर्षें सोडली तर तुमचा बाकीचा जन्म सर्वांच्या सेवेंतच जातो......स्वार्थत्याग व सहनशीलता या गुणांचा ओघ तुमच्या आयुष्यपात्रांतून अक्षय्य वाहात राहातो. त्यांतून इतर स्त्रियांच्या मानानें विधवा स्त्रिया तर खरोखर संन्यासिनी. हें वैधव्य अशुभ कां मानलें जावें तें कळत नाहीं. मी तर अशा स्त्रियांना पुण्यशील मानतों... ताई, दुःखाचें भय तरी कोठवर बाळगावें? जोंवर त्यानें गाठलें नाहीं तोंवरच. एकदां येऊन पडल्यावर त्याच्याशीं धैर्यानें झगडलें पाहिजे."

'आई' या कवितेंत त्यांनीं एक तात्विक विचार गुंफला आहे. "शाळा सुटल्यावर बालकें घरीं येऊन विचारतात–, "आई, कुठें आहे?" संध्याकाळ झाल्यावर गोवत्स 'हम्मा हम्मा' करूं लागतात. सूर्य अस्ता-चलाला गेल्यावर चिमणी पाखरं आईसाठीं चिवचिव करूं लागतात. प्रपंचाच्या दुःखरूपी खाईत जिवाची लाही होत असतांना असे कांहीं क्षण येतात, कीं जीव ब्रह्मांडाच्या माउलीला हांक मारूं लागतो."

सीताविलाप, सीतागीत, सीतेचा निरोप अशा अनेक कविता त्यांनीं सीतेवर केल्या. सीतेचें खडतर जीवन व आकष्टप्रद आयुष्य यांतील साधर्म्य पाहून त्या सीतेशीं तद्रूप झालेल्या दिसतात. 'निरोप माझा जाऊनि सांगा

स्वामिनी ' ही एक अत्यंत नादमधुर व करुणरम्य अशी कविता आहे. सीतेबद्दल त्यांनी जें म्हटलें आहे तें काशीबाईबद्दलही म्हणतां येईल.

" कुशब्द बोलुनी कलुषित केली नच त्वां जानकी वाणी।
बहु धैर्यानें काळ कंठला घोर अशा त्या रानीं ॥
सहनशीलता मूर्तिमंत ती वसली तव सुमनीं।
मधुरतर जसा सुवास राहे सुवर्णचंपक सुमनीं ॥ "

एका तरुण गतभर्तृकेवर केलेल्या कवितेंत तिचें वर्णन करतांना

" ती खालीं नजर सुचवित भूमातेला
घे पोटीं दीन दुहितेला "

अशी बहारीची कल्पना केलेली आहे. संस्कृतवर प्रभुत्व असल्यानें त्या कल्पनांचाही जागोजाग मार्मिकपणें उपयोग केलेला आढळून येतो.

इ. स. १९०७ मध्यें त्यांचा मोठा मुलगा एकाएकीं मृत्यु पावला. त्या मुलाला आपल्या आईचें नांव वृत्तपत्रांत येत असल्यानें स्वतःचे नांव छापून यावें असें फार वाटे. पण ईश्वरी योगायोग वेगळाच होता. त्यांचे नांव छापून आलें पण तें त्यानें हें जग सोडल्यावर! बालमनाची ही इच्छा अशा प्रकारें पुरी झालेली पाहून काशीबाईचें काळीज कोळपून गेलें. ' सुतवियोग ' ही कविता ' एक दुःखी माता ' या नांवानें मनोरंजनांत प्रसिद्ध झाली. त्यांतील कांहीं भाग करुणरसानें ओथंबलेला आहे.

" उगाच मन आस हें धरुनि राहिलें बापुडें ।
सुकीर्ति सुखसंपदा वरील पुत्र हा कीं पुढें ॥
परि मरण धावलें त्वरित त्याप्रतिं न्यावया ।
कुमारपण संपलें न पुरतें जयाच्या वया ।
मदीय मनमंदिरीं वस सुता सुखें तूं सदा ।
छळील तुज ना कुणीं नच तिथें शिवें आपदा ॥
मुला वृत्तपत्रीं तुझें नांव यावें ।
अशी हौस मोठी ! किती आठवावे ॥

तुझा हेतु तों मृत्युनें पूर्ण केला ।
तदा शोकयोगें जणूं जीव गेला ॥
जसें सुमन कोवळें प्रभुपदीं गळोनि पडे
तसें मरण हें मुला तुजसी नेई देवाकडे ॥
घेईन वाचें प्रभुनाम जेव्हां ।
तुझी स्मृति होईल जाण तेव्हां ॥
प्रार्थी प्रभूसी मज बोलवाया ।
नको मला आयु न बोल वाया ।
तुझ्यासवें हाची निरोप देतें ।
तो पोंचवी मागुनि मीही येतें ॥
सोडील कीं दैव ऋणांमधूनी ।
ही वाट पाहे बसलें सजूनी ॥ ”

आणि शेवटी परम कवयित्रीनें परमेश्वराजवळ प्रार्थना केली कीं,

“ एक्या करें त्वां हरिलें मुलासी ।
दुज्या करें घे मजला उराशीं ॥ ”

या स्फुट लेखनाखेरीज ‘ संसारांतील गोष्टी ’ हें त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. गृहव्यवस्था व स्वयंपाक यांवर लिहिलेलें हें पहिलेंच पुस्तक होतें. त्यावरून काशीबाई उत्तम गृहिणी होत्या, असें स्पष्टपणें दिसतें. त्यांच्या घरांत सतत गरीब विद्यार्थी जेवावयास असत. साधा व सुंदर स्वयंपाक हें काशीबाईचें एक वैशिष्ठ्य होतें. त्यांच्या हातच्या स्वयंपाकाची वाखाणणी अजूनही परिचित मंडळी करतांना आढळतात.

## मनोहारी वक्तृत्व :

त्या काळांत फारच थोड्या स्त्रिया लेखनानें किंवा वक्तृत्वानें चमकल्या. काशीबाईचें वक्तृत्व प्रसन्न व ओघवती वाणी व मंजुळ आवाज यांनीं आकर्षक होई. त्यांच्या वक्तृत्वांत “ विद्वत्तेची ऐट, व्यासंगाचा डौल व बहुश्रुतपणाची झांक असे. ” असें एका लेखकानें म्हटलें आहे. समतोलपणा

विनम्र वृत्ति व ध्येयवादी दृष्टिकोन यांचा त्रिवेणीसंगम त्यांच्या व्याख्यानांत होत असे. विसाव्या शतकाच्या पहिल्या दहा पंधरा वर्षांत त्यांची बरीच व्याख्यानें महाराष्ट्रांत झालीं. सामाजिक परिषद्, भारत महिलापरिषद्, मुंबईची हेमंत व्याख्यानमाला या ठिकाणीं झालेलीं त्यांचीं व्याख्यानें बरीच गाजलीं. स्त्रियांची बाजू पुरुषांसमोर मांडून त्यांना विचारप्रवृत्त करण्याची कामगिरी त्यांनीं फार यशस्वी रीत्या बजावली. बडोद्यांतील सह-विचारिणी सभेपुढें "स्त्री जातीच्या अंगच्या अनुकरणीय गोष्टी" या या विषयावर त्या बोलल्या. इ. स. १९०८ च्या हेमंत व्याख्यानमालेंतही 'स्त्रियांचे स्वाभाविक गुण' यावर बोलतांना त्यांनीं स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन श्रोत्यांपुढें मांडला. कर्तव्यतत्परता व सहनशीलता या स्त्रियांच्या सद्गुणांवर बोलल्यावर त्यांनीं आपल्यासमोरच्या पुरुषवर्गाला एकदम खडा सवाल केला, "बंधूनों, आपण शास्त्राच्या आज्ञेप्रमाणें 'स्त्रीचे देव' हें पद सार्थ केलें आहे काय? प्राचीन काळीं 'पुरुष' शब्द उच्चारतांच धैर्य, पराक्रम, संयम, इच्छाबळ इत्यादि सद्गुण चटकन् मनांत उभे राहात असत. आज किती पुरुषांबद्दल असें मानतां येईल?"

दुसऱ्या एका ठिकाणीं त्या म्हणतात "स्त्री ही पुरुषांची निव्वळ दासी होण्यासाठीं जन्मलेली नव्हे. ती त्याची स्फूर्तिदात्री व मैत्रीण आहे. जगांत स्त्रियांच्या वांट्याला दुःख हें यावयाचेंच. म्हणून सध्याची समाज-रचना बदलून स्त्रियांबद्दल आदर निर्माण होणें जरूर आहे. ज्या मानानें स्त्रियांची अवस्था करुणास्पद असेल त्या मानानें पुरुषांवर जास्त जबाबदारी येते········पिता, बंधु या नात्यानें पुरुष स्त्रियांचे रक्षक म्हणून ईश्वरानें योजिलें आहेत—भक्षक म्हणून नव्हें!" त्याबरोबर स्त्रियांनाही त्यांनीं सांगितलें कीं, "कोणत्याही प्रकारची लोकसेवा करतांना सुशिक्षित स्त्रियांना आपल्याविषयीं कोणालाहि अनादर न वाटावा ह्याकडे फारच लक्ष द्यावें

लागतें. आणि तसें त्यांनीं दिलें तरच स्त्रीशिक्षणाची गोड फळें आपणांस चाखतां येतील. ”

बडोद्यासारख्या प्रगतिप्रिय सयाजीमहाराजांच्या संस्थानांत वास्तव्य केल्यामुळें काशीबाईंना पुष्कळ कार्य करतां आलें. संस्थानांतील प्रतिनिधि म्हणून त्या अनेक संमेलनांना व परिषदांना हजर राहात. सयाजीराव गायकवाड व चिमणाबाई या उभयतांना काशीबाईबद्दल नितांत आदर वाटे. श्री गांगनाईक, श्री. गोलतकर, डॉ. कुकडे, रियासतकार सरदेसाई, न्यायमूर्ति रानडे यांचे रीडर श्री. जठार या सर्वांचें व काशीबाईंचे स्नेहसंबंध होते. या खेरीज बडोद्याचें माजी दिवाण टी माधवराव यांच्या सूनबाई कमळाबाई व मुधोळच्या राणीसाहेब यांनाही काशीबाईबद्दल स्नेहादर वाटे. महाराष्ट्रांत त्यांच्या व्याख्यानानें व लेखनानें सर्व सुशिक्षित लोक त्यांना ओळखूं लागले होते.

## समाजसेवा :

गरीब विद्यार्थ्यांना, अनाथ मुलींना व दुर्बळ वृद्धांना काशीबाईंच्या घराचें द्वार नेहमीं उघडें असे. माहेर नसलेल्या मुली विश्रांतीसाठीं काशीबाईकडे येत असत. हिंदु कायदा स्त्रियांना संरक्षक नसल्यानें दुर्दैवी स्त्रियांना त्या नेहमी संरक्षण देत असत. तानीबाई केकडे ही मुलगी त्यांनीं जवळजवळ सात वर्षें घरांत सांभाळली होती. तिचा सासरा व नवरा दोघेही तिचे फार हाल करीत असत. तिच्या आजोबांच्या संपत्तीवर त्या दोघांचा डोळा होता. काशीबाईंनीं तिचें संरक्षण करून कोर्टाकडे अर्ज केला व त्या दुःखद विवाहबंधनांतून तिची सुटका केली. आत्यंतिक भयामुळें त्या मुलीच्या मनावर भयंकर परिणाम झाला होता. नंतर प्रकृति सुधारल्यावर तिनें आपल्या पसंतीनुसार विवाह केला. आयुष्याला चांगलें वळण लागल्यानें ती काशीबाईंना देवाप्रमाणें भजत असे. याखेरीज अनेक आतेष्टांचे परि-

पालन त्यांच्या हातून झालें. अनाथांना संरक्षण हें त्यांचे व्रत त्यांच्या सुविद्य कन्यका सौ. शांताबाई कशाळकर यांनीं पुढें चालविलें.

इ. स. १९२८ सालीं बडोद्याला पाणी आलें, त्यावेळीं विद्यार्थ्यांना हाताशीं धरून काशीबाईंनीं खूप काम केलें. चिमणाबाई मॅटर्निटी फंडाचे काम त्या करीत असत. गोरगरीबांच्या झोपडींत जाऊन पैसे देण्याचें व चौकशी करण्याचें काम त्यांच्याकडे असे. कुठेंही विधवाविवाह झाला कीं खणानारळानें ओटी भरायला काशीबाई पुढें ! या सौजन्यशील स्वभावानें बडोद्यांतील नव्हे तर महाराष्ट्रांतील कित्येक व्यक्तींना त्यांच्याबद्दल आपुलकी वाटे. इ. स. १९२९ मध्यें त्या सेवानिवृत्त झाल्या. त्यावेळीं मोठा समारंभ घडवून आणून सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं त्यांना 'राजरत्न' ही बहुमानाची पदवी अर्पण केली. पुढें मुंबईला त्या आपल्या मुलीकडे राहात असतांना त्यांचा मधुमेहाचा विकार बळावला व १६ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनीं या जगाचा निरोप घेतला.

थोर पुरुषांच्या अर्धांगीपदाचें भाग्य लाभलेल्या स्त्रिया या सुंदर केशकलापावर विराजमान होणाऱ्या आल्हाददायक पुष्पमालिकेसारख्या भासतात. उलट काशीबाईंचे वैवाहिक जीवन कवि चंद्रशेखर यांनी वर्णिल्याप्रमाणें 'बाभळीच्या कांटेरी वृक्षावर सुकुमार वेल टाकलेली असावी' अशा प्रकारचें होतें. पण वैयक्तिक दुःख समाजाच्या वेशीवर न टांगतां त्यांनीं वाङ्मय व समाजसेवा यांतच सुख शोधलें. युगप्रवर्तक कवि केशवसुत यांनीं त्यांना एक कविता भाऊबीजेची ओवाळणी म्हणून पाठवली होती. माधव ज्यूलियन हे विद्यार्थीदशेंत असतांना काशीबाईंच्या सान्निध्यांत होते. त्यांच्यासारख्या श्रेष्ठ कवीनें काशीबाईंच्या मातृप्रेमाला श्रद्धांजलि वाहिली आहे. ते म्हणतात,

"नाहीं तुझ्या मी पोटचा गोळा परी ।
आई म्हणूनी हाक मारी वैखरी ॥

आश्चर्य कीं तूं दृक्पथीं येतां झणीं ।
निःशब्द पूजा मी तुझी चित्ती करी ॥

माझें तुझें नातें कधींचें कोठलें ।
ही काय माया योजना वा ईश्वरी ॥

माझी मला कांहीं कळेना पात्रता ।
तैशीच तूझ्या थोरवीची पायरी ॥ ”

---

**अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :**

१. काशीबाईंच्या जीवनांतील ठळक घटनांचे अवलोकन करा.

२. सांसारिक निराशेकडे त्यांनीं कोणत्या दृष्टीनें पाहिलें ?

३. त्यांच्या समाजसेवेची कोणती उदाहरणें तुम्हांला आढळतात ?

४. वाङ्मयक्षेत्रांतील त्यांच्या कामगिरीबद्दल दोन शब्द लिहा.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ८६३८९ नों. दि. ............
वि. काव्य ............

तेजस्वी महाराष्ट्रमहिला

# डॉ. आनंदीबाई जोशी



( जन्म इ. स. १८६५; मृत्यु इ. स. १८८७ )

[ स्त्रीशिक्षणाच्या इतिहासांतील एक सोनेरी पान डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या धडाडीनें विभूषित झालें आहे. आनंदीबाईनीं विद्याभ्यास करीत असतांनाच योगायोगानें परदेशी जाण्याची संधि आल्यावर तिचें स्वागत केलें. ज्या काळांत पुरुषसुद्धां परदेशीं जाणें हें साहस मानीत असत त्या काळांत आनंदीबाईनीं अत्यंत धैर्यानें पुढें पाऊल टाकून अमेरिकेंस उच्च वैद्यकीय शिक्षण घेतलें. हिंदुस्थानांतील अज्ञानी स्त्रीवर्गासाठीं कार्य करण्याचा त्यांचा संकल्प होता. पण संकल्प व सिद्धि यांत मृत्यु उभा राहिल्यानें त्यांची आकांक्षा अपुरी राहिली व त्यांच्या अकाली निधनानें महाराष्ट्राची अपेक्षा मातीमोल झाली. परंतु त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या स्फुलिंगानें अनेकांच्या हृदयांतील सुप्त चैतन्य प्रज्वलित झालें, ही गोष्ट निर्विवाद आहे. ]

" दांडोबा मेला ! कधीं अक्कल येणार आहे कुणास ठाऊक ! पोरीच्या जातीनं कसं गाईसारखं असावं ! पण या कार्टीचं लक्षण कांहीं ठीक दिसत

नाहीं. चागलं नांव काढील आईबापाचं! दुसरं काय ? " आईनें केलेली ही कानउघाडणी ऐकून छोटी यमुना अस्वस्थ झाली आणि तिच्या डोळ्यांत गंगायमुना येऊन उभ्या राहिल्या. लहानपणापासून तिला खेळण्याची फार आवड ! पण घरकाम नेहमीं खेळण्याच्या आड येई. त्यांतून आईचा स्वभाव फार तापट असल्यानें तिनें केलेल्या शिक्षाही भयंकर असत. कधीं कधीं काठीनें चोप मिळे तर कधीं आठवण राहाण्यासाठीं विस्तवानें हातावर खूण केली जाई; आणि लहानसाच अपराध असला तर धम्मकलाडू आणि चापटपोळ्या यांवर भागे. यमुनेचा सगळ्यांत मोठा दुर्गुण म्हणजे ती 'आडदांड' होती. तिला भातुकली व बाहुली या बैठ्या खेळापेक्षां मुलांबरोबर विटीदांडू खेळणें आवडे. उंचउंच झाडांवर चढण्यांत ती तरबेज होती. वडील मंडळी जिन्यावरून उतरत असतां ती पटकन् जिन्याच्या कठड्यावरून घसरत येऊन 'बघा, तुमच्या आधीं आलें' असें म्हणत हंसत उभी राही. स्वभावांत मिस्कीलपणा पुरेपूर असल्यानें ती सर्वांची बरोबर नक्कल करून मनोरंजन करीत असे. आठ वर्षांच्या मुलीला हें मुळींच शोभण्यासारखें नव्हतें असें तिच्या आईला वाटे. कारण त्या कालानुसार 'अष्टवर्षा भवेत् कन्या' या सर्वमान्य सामाजिक संकेताप्रमाणें तें वय विवाहयोग्य कन्येचें समजलें जाई. म्हणून मुलीनें गंभीरपणें वागावें असें आईला वाटत राही. उलट मनसोक्तपणें खेळूं कां नये हें कोडें यमुनेला उलगडत नसे. 'मुलीचा जन्म येणें म्हणजे एवढें भयंकर पाप असतें कीं काय ? आई-वडिलांच्या नांवाचा उद्धार होणें म्हणजे काय ? हंसणं-खेळणं टाकून गंभीर आजीबाईसारखं वागणं म्हणजेच चांगुलपणा कीं काय ?' या सर्व प्रश्नांनीं तिची बालबुद्धि गोंधळून जाई.

ती जन्माला आली तीच मुळीं मजबूत हाडापेराची. आजीनें खाण्यापिण्याचें विशेष लाड करून तिला सुदृढ बनविली. वयाच्या पांचसहा वर्षांपर्यंत तिच्या अवखळ स्वभावाचें कौतुक होत असे. एकदां तर मावशी आली असतांना यमुना आपल्या मावसभावाबरोबर कुस्ती खेळली होती. आणि

विभाग
क्रमांक ९८२०
नों. दि.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपल्या भावालाच तिनें सपशेल चीत केलें होतें. त्यावेळीं मावशीनें ' शाबास पठ्या ! ' म्हणून मोठ्या कौतुकानें शाबासकी दिली होती. पण नंतरच्या दोन तीन वर्षांत साराच रंग बदलला. प्रेमळ आई जास्त जास्त कठोर बोलूं लागली, ' या मुलीचें सासरीं कसें होईल ? ' या एकाच काळजीनें तिच्या हृदयांतील मातृप्रेमाचा ओलावा नष्ट होऊन ती प्रत्येक पावलापावलाला वळण लावण्याचा प्रयत्न करूं लागली. आत्यंतिक प्रेमाच्या पोटींच हा कठोरपणा निर्माण झाला होता. त्यांतून जहाल स्वभाव असल्यानें मागाहून मनाला वाईट वाटलें तरी संतापाच्या भरांत अनेक गोष्टी होऊन जात असत. ज्या मावशीनें शाबासकी दिली होती ती मावशी पुन्हां भेटल्यावर म्हणाली, ' अगबाई, केवढी दिसायला लागली ग यमू ! पण वागणं अजून बदललं नाहीं; आणि बायकांच्या जातीचा नाजुकपणा कसा तो नाहींच ! आतां भराभर धावणं नी उड्या मारणं बरं तरी दिसतं का ? ' सुदृढ प्रकृतीची व आनंदी वृत्तीची यमुना नाजुक व गंभीर नव्हती हाच तिचा दोष होता. कारण तिच्याकडे पाहाण्याचा वडील मंडळींचा दृष्टिकोन बदलला होता. पण आईची भीति खोटी ठरली. यमुनेनें खऱ्याखुऱ्या अर्थानें ' चांगलें नांव ' काढलें. तिनें त्रिखंड कीर्ति मिळविली. आपल्या सद्गुणांनीं अनेकांना आपलेसें केलें आणि आपल्या मृत्यूनें कित्येकांना रडविलेंही !

## जन्म व बालपण :

यमुनेचा जन्म पुणें येथें आपल्या आजोळीं ३१ मार्च १८६५ रोजीं झाला. पुण्याचें बाळशास्त्री भाटे हे तिचे मामा. तिचे वडील गणेश अमृतेश्वर जोशी हे कल्याणला नोकरी करीत असत. यमुनेच्या बालपणाची कल्पना वरील अनुभवांवरून स्पष्ट येते. त्या गोष्टींबद्दल मोठेपणीं यमुना म्हणालीही, " विस्तवानें डागल्याच्या खुणा व चाबकाचे वळ आतां शरीरावर दिसणें शक्य नाहीं; किंवा सुदैवानें त्या माराच्या सपाट्यांत मी लंगडी, लुळी किंवा कुबडी झालें नाहीं. परंतु हाय ! हाय ! त्या गोष्टीची आठवण झाली कीं, मनाला किती दुःख होते ! ज्या बालवयांत स्वच्छंदीपणें खेळणें हीच सुखाची

परमावधी असते त्या काळांत वडील मंडळींच्या कडकपणामुळें जें बालक या सुखास मुकलें तें खरोखर अत्यंत अभागी होय!" परंतु बालमनाचा विकास होण्यासाठीं बालमानसशास्त्राचें ज्ञान असण्याची आवश्यकता व मुलीं-कडे पाहाण्याचा उदार दृष्टिकोन या सर्व कल्पनांचा उद्भव नंतरच्या काळांत झाला असल्यानें यमुनेच्या आईला फारसा दोष देतां येत नाहीं.

## विवाह :

बाराव्या वर्षीं यमुनेचा विवाह श्री. गोपाळराव जोशी यांच्याशीं झाला. ते कुलाबा जिल्ह्यांत पोस्टमास्तर होते. त्यांना स्त्रीशिक्षणाची मनस्वी हौस होती. आपल्या पत्नीला सुशिक्षित करून दाखवावयाचें अशी त्यांची आकांक्षा होती; आणि तसें त्यांनीं श्वशुरांना सांगितलेंही. पण शिक्षण म्हणजे तरुणमंडळीची चार दिवसांची हौस. या पलीकडे त्या गोष्टीला कुणीच फारसें महत्त्व दिलें नाहीं. परंतु गोपाळरावांनीं मात्र आपल्या नूतन पत्नीचें—आनंदीचें—मन वळवून आपली कल्पना प्रत्यक्षांत आणण्यास प्रारंभ केला. यमुनेचें शिक्षण सुरू झालें. त्याबरोबर आप्तमंडळी व इतरेजन यांच्या टीकेलाही आरंभ झाला. एकदां गोपाळरावांना श्वशुरांकडून निरोप आला कीं, "बायकोला शिकवूं नका. शिक्षणाचे परिणाम चांगले होत नाहींत" त्या निरोपाला उत्तर म्हणून आपल्या विक्षिप्त स्वभावानुसार गोपाळरावांनीं सांगितलें, "शेवटीं जास्तींत जास्त काय होईल? बायको पळून जाईल, एवढेंच ना! मग बरंच झालं. मी आपला दुसऱ्या लग्नाला मोकळा होईन!"

यमुनेचें सासरचें नांव आनंदी ठेवण्यांत आलें. विवाहबंधनानें तिचा द्वाडपणा एकदम नाहींसा झाला. पूर्वापार संस्कारामुळें म्हणा किंवा सतत आईचे शब्द आठवल्यामुळें म्हणा ती नंतर खरोखरच गंभीर वृत्तीची होऊन अत्यंत जबाबदारीनें वागूं लागली.

## अमेरिकेंत जाण्याची खटपट :

गोपाळराव कोल्हापुरास असतांना त्यांची तेथील मिशनरी कार्यकर्ते

मि. गुहिन यांच्याशीं ओळख झाली. अमेरिकेला जाऊन स्वतःला व पत्नीला विद्यासंपन्न करण्याचा मनोदय गोपाळरावांनीं त्यांच्याजवळ व्यक्त केला आणि आर्थिक साहाय्य मिळण्याची कितपत शक्यता आहे अशी विचारणा केली. परंतु मि. गुहिन यांचा गैरसमज होऊन देशधर्माला विटलेल्या या दांपत्याला येशूच्या कळपांत ओढणें सुलभ आहे असें वाटूं लागलें. त्यांनीं गोपाळरावांचें एक पत्र अमेरिकेंतील न्यूजर्सी स्टेटमधील प्रिन्स्टन शहरीं मि. वाईल्डर यांना पाठविलें. मि. वाईल्डर यांनीं आपल्या पत्रोत्तरांत म्हटलें, "आपण आर्थिक साहाय्य कां अपेक्षावें तें कळत नाहीं. आपल्याजवळ लाख रुपये असले तरी अमेरिकेला येण्याची जरूरी नाहीं. हल्लीं आहांत तेथेंच रहा. मनोधैर्यानें वागून धर्मांतर करा. ख्रिस्ताशिवाय दुसरा कोणी तारणारा नाहीं अशी दृढश्रद्धा बाळगा." या पत्रोत्तरानें गोपाळरावांची फार निराशा झाली.

कोल्हापुरानंतर त्यांनीं आनंदीबाईच्या शिक्षणासाठीं मुंबईला बदली करून घेतली. मुंबईला प्रार्थनासमाजाजवळ असलेल्या मिशनरी संस्थेच्या शाळेंत आनंदीबाई जात असत. तेथें सर्व मुली पायमोजे व बूट घालून येत असत. म्हणून गोपाळरावांनीं आनंदीबाईनाही तसेंच करायला लाविलें. त्यामुळें आनंदीबाईना रस्त्यावरील लोकांचा भयंकर त्रास सोसावा लागला. खिडकींतून लोक टकमक पाहात राहून असभ्यपणें बोलत असत. घोडागाडींतून जाणारे लोक गाडी थांबवून आनंदीबाईकडे टवाळपणें पाहाण्यास चुकत नसत. त्यामुळें त्यांना मेल्याहून मेल्यासारखें होई.

## तें क्रांतिकारक पत्र :

मुंबईहून काठेवाडांत 'भूज' या गांवीं बदली झाल्यावर एक दिवस आनंदीबाईना अमेरिकेंतून एक पत्र आलें. परमेश्वरानें पाठविलेला अकल्पित असा कृपाप्रसाद होता तो! तें पत्र मिसेस कार्पेंटर या अमेरिकन स्त्रीचें होतें. त्या बाई दंतवैद्याकडे गेल्या असतां तेथें पलडेला 'अमेरिकन ख्रिश्चन रिव्ह्यू' चा अंक त्यांनीं सहज चाळला. त्यांत गोपाळरावांचें पत्र व त्याला

मिळालेलें उत्तर हीं दोन्हीं त्यांच्या वाचनांत आलीं. केवळ योगायोगानें वाचलेल्या या मजकुरानें मिसेस कार्पेंटर या बाईच्या मनांत कुतूहल उत्पन्न होऊन गोपाळरावांना व त्यांच्या पत्नीला त्यांनीं बोलाविण्याचें ठरविलें. तें पत्र हातीं येतांच आनंदीबाईंना आनंदाश्चर्यांचा गोड धक्का बसला. नंतर दोघींचा पत्रव्यवहार सुरू झाला. मिसेस कार्पेंटर यांना हिंदुस्थानबद्दल गूढ-रम्य आकर्षण वाटे. तसेंच आनंदीबाईंनाही अमेरिकेंतील स्त्रीजीवनाबद्दल विलक्षण कुतूहल होतें. त्या दोघींचा पत्रव्यवहार म्हणजे दोन देशांतील समाजपरिस्थिति, रीतीभाती याबद्दलच्या विचारांची देवाण-घेवाण होती. " हिंदुस्थानांतील असहाय्य विधवेचें दुःख जगांतील कोणत्याही दुःखाच्या तुलनेनें जास्त भरेल. " असें आनंदीबाईंनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे. पत्ररूपानें ज्या भेटी होत असत त्यांतूनच दोघींचा स्नेह वृद्धिंगत झाला व मावशी-भाचीचें नातें निर्माण झालें. अमेरिकेहून अगत्यपूर्वक आलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करावयाचें आनंदीबाईंनीं ठरविलें. आर्थिक परिस्थिती-मुळें व इतर कौटुंबिक जबाबदारीमुळें गोपाळरावांना त्यांच्याबरोबर जाणें शक्य नव्हतें.

त्या काळांत एकट्या स्त्रीनें परदेशांत जाण्याचा विचार करणें ही गोष्ट मोठी धाडसाची होती. तरीही आनंदीबाईंनीं निर्धार केला व गोपाळरावांनीही त्यांना खूप प्रोत्साहन दिलें. परदेशांत जाण्यापूर्वीं आनंदीबाईंनीं उत्तमोत्तम संस्कृत ग्रंथांचें अध्ययन केलें. जाण्याचा विचार ठरल्यावर अनेक अडचणी उपस्थित झाल्या. लोकनिंदेला ऊत आला होता. बऱ्यावाईट कंड्या पिकत होत्या. या साहसाला प्रवृत्त झाल्याबद्दल कांहींनीं त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला व तो निष्फळ ठरल्यावर त्या हितचिंतकांनीं व आप्तांनीं संबंध तोडले. आपली भूमिका स्पष्ट व्हावी म्हणून कलकत्त्याला आनंदीबाईंनीं एका व्याख्यानाद्वारें आपण अमेरिकेला कां जात आहोंत हें सविस्तरपणें सांगितलें. त्या व्याख्यानावरून त्यांची देशहिताची कळकळ, स्वतंत्र बुद्धिमत्ता आणि स्वतःच्या संस्कृतीचा अभिमान यांचें सम्यग्दर्शन होतें. त्यांच्या या

धाडसाबद्दल कौतुक वाटून पोस्टखात्याचे मुख्य अधिकारी मि. स्मिथ यांनीं त्यांना शंभर रुपये पाठविले.

**परदेशीं प्रयाण :**

'सिटी ऑफ कलकत्ता' या बोटीनें आनंदीबाई यांनीं ७ एप्रिल १८८३ रोजीं हिंदुस्थान सोडलें. नव्या जीवनाची नवी क्षितीजें पाहावयास निघालेली ही महाराष्ट्रमाहिला अवघी अठरा वर्षांची होती. त्यांच्या सत्त्वपरीक्षेला बोटींत बसल्यापासूनच आरंभ झाला. मिसेस जॉन्सन ही मिशनरी स्त्री त्यांची सहप्रवासिनी होती. तिच्या सोबतीच्या भरंवशावर त्या निघाल्या होत्या. गोगलगाईसारख्या सौम्य स्वभावाच्या दिसणाऱ्या या मिशनरी स्त्रीनें नंतर उग्र स्वरूप धारण करून आपला कपट हेतु व्यक्त केला. आनंदीबाईनीं धर्मांतर करावें म्हणून तिनें जंगजंग पछाडले. पण आनंदीबाई जरी एकट्या होत्या तरी त्यांच्या ठिकाणीं प्रबल तत्त्वनिष्ठा होती. त्यांनीं या बाईशीं वादविवाद करून तिला निरुत्तर केलें. शेवटीं प्रवास संपण्याच्या सुमारास पुन्हां ती गोडीगुलाबीनें वागूं लागली. या मिशनरी लोकांनीं अमेरिकेंतही त्यांचा सतत पाठपुरावा केला. इतकेंच नव्हे तर 'आनंदीबाई अशीच स्वदेशी गेली तर आपणांस तें लांच्छनास्पद आहे.' असें म्हणूनही दाखविलें. पण त्यांच्या सर्व प्रयत्नांना आनंदीबाईनीं दाद दिली नाहीं. ज्या ध्येयासाठीं त्यांनीं स्वजन व स्वदेश सोडला होता त्या ध्येयावर त्यांचें लक्ष केंद्रित झालें होतें. 'प्रत्येक पावलापावलाला माझें कर्तव्य काय?' हा प्रश्न मी स्वतःला विचारीत असते.' असें त्यांनीं आपल्या पत्रांत एके ठिकाणीं म्हटलें आहे.

**माय मरो आणि मावशी जगो :**

अमेरिकेंत पाऊल ठेवल्यावर त्यांना आतांपर्यंत केवळ पत्ररूपानें परिचित असलेली त्यांची मावशी मिसेस कार्पेंटर या बाई भेटल्या. दोघींचाही एकमेकींबद्दलचा स्नेहादर दृढ झाला. रॉशेल या शहरीं मावशींकडे आनंदी-

बाई चार महिने होत्या. हें त्यांचें दिवस अत्यंत सुखाचे गेले. " माझे पति व माझी मावशी हीं दोन अमोलिक रत्नें परमेश्वरानें मला दिलीं आहेत." या आनंदीबाईच्या उद्गारावरून त्यांची मावशीबद्दलची भावना कळून येते. आपल्या लोकांपासून हजारों योजनें दूर असलेल्या या अल्पवयी हिंदकन्येवर मावशींनीं खरोखर अपत्यनिर्विशेष प्रेम केलें. तसें पहायला गेलें तर मावशीभाचो भिन्न रंगाच्या, भिन्न धर्माच्या व भिन्न आचार विचाराच्या. पण अंतरंगाची ओळख पटल्यावर बाह्य रंगाची आठवण कुणालाच उरली नाहीं. भवभूतीनें म्हटल्याप्रमाणें ' नहि बहिरुपाधीन् प्रीतयः संश्रयन्ते ' असा प्रकार होता. आनंदीबाईनीं आपल्या गोड वागणुकीनें सर्वांना स्नेहांकित केले. पाश्चिमात्य संस्कृतीनें दिपून न जातां आपला वेश व विचार अविकृत ठेवले. पोशाखांत जो बदल केला तोही सोयीस्कर वाटला तेवढाच. पण अमेरिकन लोकांचे अंधानुकरण कधींच केलें नाहीं. अमेरिकन स्त्रियांनाही कटाक्षानें स्वदेशी वस्तु वापरणाऱ्या या हिंद महिलेबद्दल आदरभाव वाटला. ' हिंदी लोक अत्यंत रानटी व प्रत्येक बाबतींत मागासलेले ' असा जो गैरसमज अमेरिकेंत रूढ होता तो बराच चुकीचा आहे, हें आनंदीबाईनीं स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें. संस्कृत वाङ्मयांतील सौंदर्य विशद केलें; वेशभूषेंतील मनोरम वैशिष्ट्य त्यांच्या नजरेस आणून दिलें व महाराष्ट्रांतील रुचकर पदार्थांनीं पाहुणेमंडळींना तृप्त करून त्यांच्याकडून प्रशंसा मिळविली. आनंदीबाईच्या वागण्यांतील साधेपणा, व गोड बोलणें यानीं वातावरणांत एकदम प्रसन्नता येई; त्यामुळें ' आनंदाचा झरा ' असें सार्थ नामाभिधान आनंदीबाईना मिळालें.

### कॉलेजांत पदार्पण :

फिलाडेल्फिया कॉलेजांत आनंदीबाईनीं नांव नोंदविलें. तेथें तीन वर्षे वैद्यविद्या अभ्यासिली. त्याखेरीज वनस्पतिशास्त्र, जर्मन व फ्रेंच या विषयांचाही अभ्यास केला. स्त्रियांच्या कलाकुसरीच्या वस्तु दिसल्या कीं, त्या

गोष्टीही शिकण्याचा त्यांना मोह होई. त्यांच्या मावशी त्यांना म्हणत, ‘ आनंदी, तुझ्या डोक्यावर परमेश्वरी वरदहस्त आहे. ’ एतद्देशीय लोक परदेशांत गेले कीं त्याना स्वर्ग दोन बोटें उरे. आयुष्यांतील सर्व चैनी करण्याचा हाच काळ आहे असें ते समजत असत. अशा प्रकारचे लोक आपल्यावरून आनंदीबाईची पारख करीत व त्यांना नाटक सिनेमाला किंवा नृत्याला बोलावीत असत. पण आनंदीबाईनीं तो रस्ता आपला नव्हे ही पक्की खूणगांठ मनाशी बांधली होती. आपण शिक्षणासाठीं आणलेली पैन् पै आपल्या पतीनें रक्ताचें पाणी करून मिळविली आहे व हा मोलाचा पैसा अनाठायीं जाणें बरें नव्हें हें त्यांच्या विचारांचे एक कारण होतें. शिवाय दुसरें कारण म्हणजे प्रथमशिक्षित स्त्रियांवर उत्तम आदर्श निर्माण करण्याची जरूरी होती. ज्या गोष्टी सदभिरुचीच्या दृष्टीनें आपल्या देशांत गर्ह्य मानल्या जात होत्या, त्यांचे केवळ फॅशनच्या नांवाखालीं आचरण करणें आनंदीबाईना रुचलें नाहीं. आनंदीबाईच्या वयाच्या मानानें त्यांच्या बुद्धीचा विकास विशेष झाला असल्यानें त्या समतोलपणें वागूं शकल्या.

## पतिप्रेम व स्वदेशप्रेम :

अमेरिकेंत असतांना त्या जरी अभ्यासांत व्यग्र होत्या तरी त्यांचे डोळे रोजच्या डाकेकडे लागलेले असत. गोपाळरावांचीं पत्रें त्यांना प्राणवायुप्रमाणें संजीवक असल्यानें त्यावर त्यांचे हृदयस्पंदन चालत असे, असें म्हटलें तरी वावगें ठरणार नाहीं. नातेवाईकांची शंकाकुशंकांनीं भरलेलीं, कुत्सित शब्दांची आग पाखडणारीं पत्रें आली कीं त्यांच्या हृदयाला यातना होत असत. परंतु गोपाळरावांच्या पत्रांतील एकेका शब्दानें त्या स्वतःला धीर देऊन कार्यमग्न होत असत. परंतु कधीं कधीं गोपाळरावांचाही नूर पालटून जाई. ‘ आनंदीबाई कांहीं तुमच्या स्वाधीन आतां राहाणार नाहीं. ’ असें सर्वांनी म्हटलें व अभ्यासामुळें आनंदीबाईकडून पत्र पाठवावयास उशीर झाला कीं गोपाळरावांचा पुरुषसुलभ अहंकार जागृत होऊन ते पत्रांत आनंदीबाईना

दोष देत असत. पण आनंदीबाईंनीं आपली शांत वृत्ति मुळीच सोडली नाहीं. त्या पत्रांतून गोपाळरावांचा उतावीळ स्वभाव व आनंदीबाईंची प्रशांत वृत्ति हा विरोध तत्काळ दृग्गोचर होतो. घटसर्पासारखें दुखणें परदेशांत झालें असतांनाही सर्व मानसिक दुःखांप्रमाणेंच हें शारीरिक दुखणें सहन केलें. गोपाळरावांना त्यांच्या निष्ठेबद्दल संशयाचा किंतुही राहूं नये म्हणून त्या दक्ष असत. एका पत्रांत त्या म्हणतात, 'आपण माझे नेते, शास्ते, समाधान कर्ते व त्राते आहांत. केवळ आपणामुळेंच या उन्नत दशेप्रत मी पोहोचले आहे.' गोपाळराव अमेरिकेस येण्याचा सतत विचार करीत असूनही आर्थिक दुरवस्थेनें त्यांना येतां येईना. तेव्हां 'स्वतःजवळचे दागिने विकूं का' अशी पृच्छा आनंदीबाईंनीं केली. अखेर गोपाळराव अमेरिकेंत आले. ते आल्यावर आनंदीबाईंना साहजिकच फार हर्ष झाला. आपल्या धाकट्या दीराला लिहिलेल्या पत्रांत त्या म्हणतात, "ते येथें आल्यानें वसंत ऋतूंतील शोभा आणणारीं फुलें ज्याप्रमाणें हिंवाळ्यांतील उदासीनता नाहींशीं करून प्रत्येक प्राणिमात्रास आनंद देतात त्याप्रमाणें मला झालें आहे. आनंद व कृतज्ञता यांनीं माझें अंतःकरण उचंबळून आलें आहे!"

हीं पत्रें आनंदीबाईंची उत्कट देशभक्तीहि दर्शवितात. गोपाळरावांना हिंदुस्थानचा वीट आल्यानें अमेरिकेंत वास्तव्य करावें असें त्यांच्या मनानें घेतलें. पण आनंदीबाईंना तो विचार प्रशस्त वाटला नाहीं. "उत्तम जीवनाचा खरा कित्ता घालण्याची जागा अमेरिका नव्हे तर हिंदुस्थानच! मी बहिष्काराला मुळींच भीत नाहीं." असें त्यांनीं लिहिलें. देश व धर्म याबद्दल एक प्रकारचा व्यापक दृष्टिकोन त्यांना प्राप्त झाला होता. म्हणून कुणाबद्दलही पूर्वग्रहदूषित मनोवृत्तीनें केलेली टीका त्यांना आवडत नसे. एका पत्रांत त्या लिहितात, "सत्य हाच जर धर्म तर आपण इतर धर्मांचा व राष्ट्रांचा द्वेष कां बरें करावा? हा द्वेषच विस्तवाप्रमाणें राष्ट्रांचीं राष्ट्रें जाळून भस्म करतो. हा स्पर्शजन्य रोग हिंदुस्थानांत हल्लीं फारच पसरला आहे." तसेंच प्रगत अमेरिकेच्या तुलनेनें आपला मागासलेला देश कसा उन्नतीप्रत जाईल हा

विचार त्यांच्या मनांत नेहमीं उभा असे. "माझ्या दुर्दैवी हिंदुस्थानचा विचार मनांत आला कीं वाटतें केव्हां संपणार हें शिक्षण आणि केव्हां एकदां मी अनाथअपंगांच्या सेवेला लागेन."

## पदवीदान-समारंभ :

'कष्टा फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' या कालिदासोक्तीप्रमाणें अतिश्रमानें नाजुक शरीरप्रकृति झाली असूनही आनंदीबाई अधिक प्रसन्न दिसूं लागल्या. ११ मार्च १८८६ रोजीं त्यांना एम्. डी. ही अत्युच्च पदवी देण्याचा समारंभ झाला. त्याप्रसंगीं इंग्लंडहून पंडिता रमाबाईही आल्या होत्या. कॉलेजच्या प्रमुख मिसेस बॉडले यांनीं आनंदीबाईच्या सुजाणत्वाचें व निरलसत्वाचें खूप कौतुक केलें. त्यानंतर आनंदीबाई व गोपाळराव या उभयतांनीं अमेरिकेंतील प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. परंतु आनंदीबाईची प्रकृति खालावतच चालली होती. तेव्हां हिंदुस्थानांत गेल्यावर बरें वाटेल असें आनंदीबाई म्हणत असल्यानें अमेरिकन स्नेहीजनांचा निरोप घेऊन त्या दोघांनीं अमेरिका सोडली. कार्पेंटर कुटुंबाचा वियोग आनंदीबाईंना दुःसह झाला. पण पत्ररूपानें भेटण्याचें वचन देऊन त्यांनीं निरोप घेतला.

## अखेर :

आनंदीबाईचे डोळे जसे हिंदुस्थानकडे लागले होते तसेच हिंदवासियांचे डोळेही आनंदीबाईंना पहावयास उत्सुक झाले होते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर कोल्हापूरच्या रुग्णालयावर त्यांची नेमणूकही झाली होती. १६ नोव्हेंबर १८८६ रोजीं त्यांनीं मुंबई बंदरावर पाऊल ठेवलें त्यावेळीं सर्व जनतेला हर्षाचें भरतें आलें. या भावनेच्या भरतींत शंकाकुशंकांची कुसळें व प्रतिकूल मताचीं मुसळें पार वाहून गेलीं. सर्व वृत्तपत्रांनीं एकमतानें त्यांचें अभिनंदन केलें. त्यांच्या साध्या राहाणीचें व निगर्वी वृत्तीचें विशेष वर्णन या अभिनंदनांत आहे.

आनंदीबाई फार थकलेल्या दिसल्या त्या केवळ लांबच्या प्रवासामुळें अशी सर्वांची कल्पना झाली. परंतु आनंदीबाईची प्रकृति झपाट्यानें खालावत

चालली होती. हिंदी जनतेसाठीं कार्य करण्याची इच्छा व आवेश कायम होता. पण तीव्र इच्छाशक्ति व दुबळें शरीर यांच्यांतील झगड्यांत काय होईल याची भीति सर्वांना वाटत होती. पुण्याचे बापूसाहेब मेहेंदळे यांचें औषध घेतल्यास आपण बरें होऊं असा विश्वास आनंदीबाईंना असल्यानें त्यांच्याकडे त्या गेल्या. पण मेहेंदळे वैद्यांनीं, " ती बाई माझ्यापेक्षां जास्त शिकलेली आहे. तिला मी काय औषध देणार ? " असें म्हणून औषध देण्याचें नाकारलें. सर्वांची फार निराशा झाली. इतर अनेक औषधोपचार चालू होते. पण अतिश्रम, जेवणाची हयगय व दुखणें अंगावर काढण्याचा हिंदु स्त्रियांचा सोशिकपणा यामुळें प्रकृति सुधारण्याच्या आटोक्यांत राहिली नव्हती. कोणत्याही औषधोपचाराचा व सदिच्छांचा उपयोग न होतां आनंदीबाईनीं २६ फेब्रुवारी १८८७ रोजीं नश्वर देहाचा त्याग केला.

त्यांच्या मृत्यूनें हिंदी लोकांना धक्का बसला. सुधारकांची आशा समूळ नष्ट झाली. गोपाळरावांवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला. ते उद्गारले, " सर्व अडथळे व प्रतिबंध आम्ही जिंकलें; परंतु मृत्यूचा व दैवाचा घाला मात्र आम्हांला टाळतां आला नाहीं.

## अक्षय्य यशोनिधि :

आनंदीबाईंच्या जीवनाची शोकांतिका त्यावेळच्या अनेक लेखकांनीं व कवींनीं वर्णिली आहे. कविवर्य मोगरे यांनीं त्यांच्यावर लिहिलेल्या काव्यांत जे विचार व जी भावना व्यक्त केली आहे तीच त्यांच्या जीवनाचें सार आहे.

" जेव्हां प्रश्न परि करील मजला कोणी कधीं कीं यशा ।
गावें संतत ज्यांचिया कविवरीं व्यासादिकींही अशा ॥
आल्या कोण पतिव्रता सुचरिता जन्मास या भारतीं ।
आनंदी पहिली तुझीच मजला होईल तेव्हां स्मृति ॥ १ ॥
ज्या मार्गांत परंतु फार असतीं विघ्नें असें भावुनि ।
भेणें दूरची राहिलों पुरुषही आम्ही तयापासुनी ॥

नारीही तुजसारखी न मळतां निर्विघ्न त्या आक्रमी ।
हें त्वां दाखविलें स्तवीत म्हणुनी आहे तुला आज मी ॥ २ ॥

केलें साहस हें तुवां धरुनियां उद्देश जे जे मनीं ।
ते ते सिद्ध न होत तोंच जग हें गेलीस तूं सोडूनी ॥
झाली हानी खरी, पुढें न भरुनी येईल ती काढितां ।
तेणें लेश परि यशोनिधि तुझा झालाच नाहीं रिता ॥ ३ ॥

नारी त्वत्सम थोर आर्यभुवनीं जन्मोनिया यापरी ।
साराया झटतील दुःखद दशा स्वीय स्वसांची दुरी ॥
बाई घालुनिया परंतु पहिला आहे धडा त्वां दिला ।
आनंदें इतिहासकार म्हणुनी गातील आधी तुला ॥ ४ ॥

---

**अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :**

१. यमुनेचें बालपण ज्या परिस्थितींत गेलें ती परिस्थिति कोणती व त्याला जबाबदार कोण ?

२. परदेशीं गेल्यावर आनंदीबाईंचे कोणते गुण प्रकाशांत आले ?

३. मृत्यु अकस्मात् आला तरी यशोनिधि रिता झाला नाहीं, असें कवीनें कां म्हटलें आहे ?

साहित्यसरोवरांतील कमलिनी

# सौ. काशीताई कानिटकर



( जन्म इ. स. १८६१; मृत्यु इ. स. १९४८ )

[ कविवर्य गो. वा. कानिटकर यांच्या पत्नी काशीताई यांचें शालेय शिक्षण अजिबात होऊं शकलें नाहीं. परंतु वाङ्मयव्यासंगी रसिक पतीच्या सहवासानें त्यांनीं वाङ्मयीन संसाराला आरंभ केला. ख्यातनाम कादंबरीकार हरि नारायण आपटे यांच्यासारख्या प्रेमळ भावानें प्रोत्साहन दिल्यानें काशीताईंनीं त्या काळांत कादंबरी-लेखन व चारित्रलेखन या क्षेत्रांत नांव मिळविलें. दहाजणांच्या घरांतील सासु-रवासिनीचें कर्तव्य पार पाडीत असतांनाही त्यांचें व्यक्तित्व साहित्यसरोवरांत कमलिनीप्रमाणें फुललें व खुललें ! ]

हरि नारायण आपटे पुणें नगरपालिकेचें अध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर दुसऱ्याच दिवशीं काशीताई त्यांच्याकडे गेल्या होत्या. बहिण-भावंडांचें

अकृत्रिम प्रेम माहीत असल्यानें राधाकाकूंनीं कौतुकानें ती बातमी काशीताईंना सांगितली. त्या म्हणाल्या, " कळलं का बंधुराज कोण झाले ते ? " त्यावर हरिभाऊ एकदम गडबडीनें उद्गारले, " अग, त्यांना नको सांगू. त्यांना नाहीं तें आवडत." " होय, नाहींच मला आवडत. " काशीताईंनीं प्रांजलपणें मत व्यक्त केलें." हरिभाऊ, या स्थानिक गोष्टींत तुम्ही लक्ष घालण्यापेक्षां केवळ साहित्याला वाहून घ्यावं असं मला मनापासून वाटतं. " महत्त्वाकांक्षी भाऊ वेगवेगळ्या क्षेत्रांत कर्तृत्व दाखवीत असतांना त्याबद्दल आपलें खरेंखुरें मत व्यक्त करण्याचा अधिकार वडील बहिणीचाच नाहीं काय? तो अधिकार काशीताईंनीं उत्तम प्रकारें बजावला. हरिभाऊंना त्यांच्याबद्दल निस्सीम आदर असल्यानें त्यांनीं तो मान्य केला. मराठी साहित्याच्या या श्रेष्ठ मानकऱ्याची ही भगिनी समकालीन वाङ्मयसेवकांत आपल्या लेखन-कौशल्यानें मान्यता पावलेली होती.

## पूर्ववृत्त :

कृष्णाकांठीं असलेलें मेणवली गांव हें बापट घराण्याचें मूळ ठिकाण. त्या घराण्यांतील पूर्वज नारायणराव हे निवर्तल्यावर त्यांची पत्नी सती गेली. तिनें आपला तीन वर्षांचा मुलगा त्र्यंबक हा अश्वत्थाला अर्पण केला. हा बापट घराण्याचा अंकुर नाना फडणवीसांच्या कृपेनें योग्यतेला चढला व त्याचा वटवृक्ष होऊन अनेकांना त्यानें आश्रय दिला. त्यांच्या तीन मुलांपैकीं कृष्णराव हे आपल्या पित्याप्रमाणें कर्तबगार निघाले. इंग्रजी आमदानीच्या आरंभीच्या काळांत ते मामलेदार झाले. इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धा-नंतर सगळीकडे निराशाजनक परिस्थिति पसरली होती. कुणाचा कुणावर विश्वास उरला नव्हता. आर्थिक सुबत्ता लयाला जाऊन विपन्नावस्था आली होती. सरकारी नोकरांवर जनतेचा फार रोष होता. त्यांतून कृष्णरावांचा स्वभाव करारी असल्यानें आपलें कर्तव्य बजावीत असतांना परिणामाची फिकीर ते कधींच करीत नसत. पंढरपूरला ते मामलेदार असतांना विठोबाच्या

देवळांत गर्दी होऊन बारा माणसें ठार झाली. गाभाऱ्यांत गेल्यावर पुष्कळदां स्त्रियांच्या अंगावरचे दागिने गुप्त होत असत. कृष्णरावांनीं या प्रकाराचा तपास केल्यावर बडवेमंडळी खूप संतापली. देवालयाचे दरवाजे मोठे करण्याचें ठरवल्यावरही त्यांनीं खूप विरोध केला. पण या विरोधाला न जुमानतां या व इतर सुधारणा त्यांनीं पंढरपूरांत घडवून आणल्या. काशीताई या कृष्णरावांच्या कन्या. त्यांचा जन्म अष्टे येथें इ. स. १८६१ च्या जानेवारींत झाला.

## बालपण :

काशीताईंच्या बालपणाचा काल पंढरपूर येथें गेला. कृष्णरावांची पहिली पत्नी रमाबाई प्रकृतीनें अशक्त असल्यानें त्यांनीं दुसरें लग्न केलें होतें. रमाबाई व लक्ष्मीबाई या सवती-सवती मोठ्या स्नेहभावानें वागत असत. घरांत सात आठ सख्खीसावत्र भावंडें होतीं. मुलांना धर्मशिक्षण दिल्यानें खेळ खेळतांनाही छोटेसें देऊळ बांधून पूजा करण्याचा खेळ त्यांना रमवीत असे. मुलांच्या मानानें मुलींना हलकेपणानें वागविण्याची पद्धत असल्यानें काशीताईंना वैषम्य वाटून आपण कमनशिबी आहोंत असें वाटत राही. लहान सहान दुखण्यांनीं नेहमीं आजारी असलेल्या काशीताई पित्याच्या लाडक्या होत्या. ते मुलीला ' काशाबापू ' म्हणून हांक मारीत असत. तेवढेंच काशीबाईंना बरें वाटत असे. कारण सर्वजण मुलींबद्दल बोलताना वैतागाचे उद्गार काढून त्या अल्लड मुलींना गंभीर बनवीत असत. काशीताईंना शाळेंत घालावयाची वेळ आल्यावर आईनें म्हटलें कीं, " ही अगोदरच दांडग्या स्वभावाची आहे. ती मुलांच्या शाळेंत गेल्यानें जास्त दांडगी होईल. " त्यामुळें काशीताईंचे शालेय शिक्षण झालें नाहीं. धाकट्या भावाला शिकवावयास येणाऱ्या पंतोजींपुढें बसल्यानें त्यांना फक्त अक्षर ओळख झाली भावंडांबरोबर त्या घोड्यावर बसायलाही शिकल्या. त्या काळाच्या पद्धतीप्रमाणें घरांतील लहान सहान कामें, देवार्चन व पोथ्या वाचून दाखविणें यांत त्यांचें बालपण व्यतीत झालें.

## विवाह :

काशीताईंना नववें वर्ष लागतांच त्यांचा विवाह श्री. गो. वा. कानिटकर यांच्याशीं झाला. त्यांच्यासारख्या कलावंत पतीचा सहवास हा काशीताईंच्या दृष्टीनें भाग्ययोगच ठरला. स्वतः कानिटकरांना बालपणापासून ललितकलांची आवड होती. काव्यरचना, वाद्यवादन व वाङ्मयविहार यांत त्यांनीं विद्यार्थी-दशेचा व नंतरचाही काळ घालविला. मोठी माणसें मुद्दाम खोचून विचारीत, ' काय रे, दिलरुबा परीक्षेला येणार आहे वाटते ? ' त्यावर ते म्हणत असत, ' दिलरुबा वाजवून कां पास होता येऊं नये ? ' कॉलेजमध्यें असतांना इंग्रजी वाङ्मयाच्या वाचनानें त्यांचे विचार उदार झाले. मिल्लच्या ' सब्जेक्शन ऑफ वुईमेन ' चे ' स्त्रियांची परवशता ' हा अनुवाद त्यांनीं प्रसिद्ध केला. जुन्या दोन पिढ्यांचीं माणसे घरांत असतांना स्त्रियांबद्दलचे हे विचार कृतींत आणण्याची शक्यता नव्हती. परंतु वैयक्तिक प्रयत्नानें आपल्या अर्धांगीला सुसंस्कृत करण्याचा त्यांनीं विचार केला. त्यांच्या सहवासांत काशीताईंचें संस्कारक्षम वय गेल्यानें त्यांना वाङ्मयाचा रसास्वाद घेतां आला. त्यांच्याच शब्दांत सांगायचें तर, ' कानिकरांच्या घरांत मी आलें तेव्हां ग्रॅज्युएट पतीची खेडवळ बायको होतें. बायकांनीं शुद्ध बोललेलेंसुद्धां लोकांना आवडत नसे. मग शिक्षणाची गोष्ट दूरच राहिली. माझ्या शिक्षणाची आणि प्रगतीची वाट कांटेरी निवडुंगांतून होती. तरी मी त्या वाटेतून रावसाहेब कानिटकर यांचे हिंमतीनें बाहेर पडलें. '

## मृदुंगाची स्थिति :

दहाजणांच्या घरांत चोरून शिक्षण घेणें ही मोठी अवघड गोष्ट होती. काशीताई पाटावर तांदूळ घेऊन निवडीत असत. तेव्हां पाटाखालीं इंग्रजी स्पेलिंगचा कागद असे. निवांतपणें दोन्हीही कामें व्हावी म्हणून त्यांनीं कोठीच्या खोलीचा आश्रय घेतला कीं दीर-नणदांनीं पाळत ठेवून खिडकींतून डोकावून पहावयाचे. मग जेवतांना कधीं दांताखालीं खडा आला कीं

म्हणावयाचे, 'वहिनींचें लक्ष कामांत असतेंच कुठें ? इंग्रजी शब्द करतात पाठ आणि लोटतात तांदूळ सुपांत' असें भर पंगतींत बोलणें ऐकलें कीं मातीचें ढेकूळ पाण्यांत विरघळावें तशी त्यांची स्थिति होई. वडील मंडळींच्या कडक शिस्तींत आयुष्यांतील उमेदीचीं वीस वीस वर्षें घालवून अखंड विद्याव्यासंग करणाऱ्या सासुरवासिनीचें कर्तृत्व आज आपण कोणत्या मापानें मोजणार आहोंत ? दहाजणांचें घर असल्यानें हेवेदावे, मत्सर यालाही भरपूर क्षेत्र होतें. गोविंदराव कानिटकर स्वतः हुषार व कर्तबगार निघाल्यानें काशीताईचा सर्वांना मत्सर वाटत असे. एकत्र कुटुंबपद्धतींत नवऱ्याच्या कर्तृत्वावर बायकोचें मोल मोजलें जात असल्यानें इतर बायका आपला मत्सर करतात हें काशीताई जाणून होत्या. काशीताई तिकडे दुर्लक्ष करून म्हणत असत, 'त्या सर्वजणी रूपानें चांगल्या आहेत. मी आणि माझें नशिब चांगलें आहे, त्याला काय करणार ?'

## आर्यमहिलासमाजाच्या चिटणीस :

पंडिता रमाबाईनीं स्थापन केलेल्या आर्यमहिलासमाजांत काशीताईनीं जावें अशी गोविंदरावांची इच्छा होती पण त्याप्रमाणें वागतांना काशीताईंना किती व्यवधानें सांभाळावी लागत. अंगावर घ्यावयाची शाल व जोडा तबेल्यांत गुपचूप लपवून ठेवावयाची. दुपारी सर्वजण झोंपली कीं मागल्या दारानें शालजोडी घेऊन जोडा घालून निघावयाचें. हातांत तांदूळ, फूल व हळदकुंकवाची कोयरी······कुणी ओळखीचें भेटल्यास देवाला जाण्याचें नाटक करतां यावें म्हणून. या सर्व असत्याचा आश्रय घेण्याचें कारण एकच. वडील मंडळींना न दुखवितां आपलें कार्य पुढें चालविण्याचा प्रयत्न. ही गोष्ट घरीं कळली कीं घरांत चोरासारखें वावरण्याचा प्रसंग येत असे. त्यांचा उत्साह पाहून पंडिता रमाबाईनीं त्यांना आर्यमहिलासमाजाच्या चिटणीसपदाची जबाबदारी घ्यावयास लावली. त्यावेळीं या समाजांत सर्व स्त्रिया एकत्र जमून प्राथमिक स्वरूपाचें लेखनवाचनाचें कार्य करीत असत.

आळीपाळीनें छोटेछोटे निबंध लिहावें, अशी एक कल्पना होती. त्याप्रमाणें एकदां काशीताईंनीं 'पूर्वींच्या स्त्रिया व आतांच्या स्त्रिया' हा निबंध लिहिला. तो सर्वांना आवडल्यानें हा निबंध सभेंत कुणीतरी सांगितला. सातआठ दिवसांनीं सुबोधपत्रिकेच्या अंकांत तो छापला गेला. कांहीं कामासाठीं म्हणून काशीताई ओटीवर आल्या. रविवारच्या सुबोधपत्रिकेवर पहिल्या पानावर ठळकपणें चमकणारें आपलें नांव पाहून अभिमान वाटण्याऐवजी त्यांना भीति वाटूं लागली. हातपाय थरथर कापूं लागले व घशाला कोरड पडली. परंतु त्या लेखामुळें घरांतील शांतता ढळली नाहीं. फक्त थोडीशी नापसंती व्यक्त करण्यांत आली.

## पहिली कादंबरी व हरिभाऊ :

इ. स. १८८६ मध्यें 'मनोरंजन व निबंधचंद्रिका' या मासिकांत टोपण नांवानें 'रंगराव' ही कादंबरी येऊं लागली. ती पुढें पूर्ण व्हावयाला बारा वर्षें लागलीं आणि इ. स. १९०३ मध्यें स्वतंत्रपणें प्रकाशित झाली. ही कादंबरी पूर्ण व्हावयाला जो अवकाश लागला त्याचें कारण लेखिकेच्या ठिकाणीं असणारा आत्मविश्वासाचा अभाव. त्यावेळीं हरिभाऊ आपटे यांनीं 'मधली स्थिती' 'गणपतराव' या कादंबऱ्या लिहिल्या. इतकें सरस आपणांस लिहितां येत नाहीं म्हणून काशीताईंनीं 'रंगराव' ही कादंबरी अपूर्ण ठेवली. कानिटकर व हरिभाऊ यांचा स्नेह निर्माण झाल्यावर हरिभाऊंनीं मुद्दाम काशीताईंना पत्र लिहिलें व कादंबरीलेखनास प्रोत्साहन दिलें. ते म्हणतात, ' स्त्रियांना पत्र लिहिण्याचा पाहिलाच प्रसंग आणि त्यांतही आपल्यासारख्या सुशिक्षितास...... मी तर भांबावून गेलों आहे. अविनयाचा दोष पत्करला पण अकृतज्ञेचा उपयोगी नाहीं." पुढील पत्रांतही त्यांनीं काशीताईंना जेन ऑस्टेनच्या अव्याजमनोहर लेखनशैलीचें अनुकरण करण्याची शिफारस केली. त्या काळांतील स्त्रीशिक्षणाच्या अडचणींची कल्पना हरिभाऊंना होती. ते एका पत्रांत लिहितात, " ज्या आम्हांस लेखन

वाचनावाचून कांहीं करावयाचे नसते कामाची भीति किंवा लाज नसते त्या आमच्या हातून दोन तास अभ्यास होण्याची मारामार पडते. आणि तुमचा उष्ट्याखरकट्याखालीं व केरपोतेऱ्याखालीं मानेचा कांटा मोडून जातो. तुम्हाला क्षणभर वाचायला बसायचें असलें तर ते तरी किती चोरून ! पुरुषांना प्रगतीसाठीं शिक्षण हवें मग स्त्रियांना कां नको ? एकाला जें अन्न तें दुसऱ्याला विष कसें होईल ? ”

एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत हरिभाऊंनीं काशीताईबद्दल वाटणारा आदर व्यक्त केला आहे ते लिहितात, “ मित्रा, तूं माझ्या बहिणीच्या घरीं वारंवार जातोस कीं नाहीं ? तिचें गोड संभाषण ऐकण्यांत वेळ किती चटकन् निघून जातो ! भोंवतालच्या गोष्टींबद्दलचे तिचे अभिप्राय किती मार्मिक असतात ! पण असें लिहिणें बरें नाही. कोण काय अर्थ काढील देव जाणें. किती अभागी हा हिंदुस्थान देश ! येथें आदरसुद्धां व्यक्त करतां येत नाहीं. उद्योगी पति व बुद्धिमती पत्नी असें तें आदर्श जोडपें आहे. ”

## वाङ्मयसेवा :

‘ रंगराव ’ ‘ पालखीचा गोंडा ’ या दोन कादंबऱ्या, डॉ. आनंदीबाई जोशी यांचें चरित्र व ‘ चांदण्यांतील गप्पा ’ हीं पुस्तकें काशीताईंनीं लिहिलीं. त्यांच्या कादंबऱ्यांतून महाराष्ट्रीय संस्कृतीचें उत्कृष्ट दर्शन घडतें. भाषा साधी व सुंदर, यथातथ्य वर्णनें, संयमित भावनांचा आविष्कार, संसारांतील सुख-दुःखांचा क्रम व त्यामुळें पालटणारा मानवी स्वभाव या सर्व गोष्टी त्यांच्या लेखनांत आढळतात. संसाराबद्दल बोलतांना आढळून येणारा गृहिणीचा डौल, नव्या जुन्या विचारांचा संघर्ष व संसारांतील तत्त्वज्ञान यांचे नमुने या कादंबऱ्यांत आहेत. ‘ रंगराव ’ कादंबरींतील पुढील उतारा वाचल्यावर त्यांच्या लेखनशैलीची कल्पना येते.

“ एकाएकी दुःखाचा प्रसंग कोसळल्यावर यादवरावांनीं आपल्या पत्नीचें सांत्वन केलें. ते म्हणाले, “ हें बघ, चांगलं वाईट सुखदुःख, दिवसरात्र,

जन्म-मरण हे एकामागून एक यायचेंच, असें मी तुला नव्हतें का सांगितलें ? देवानें सर्व पदार्थ जर समसमान ठेविले आहेत तर आपण नुसत्या सुखाची काय म्हणून आशा करावी ? आजपर्यंत जसा त्यानें सुखाचा भाग दिला तसा आतां दुःखाचाही दिला. सुख घेतेवेळीं तूं त्याला नाहीं कुठें म्हणालीस 'कीं हें काय केलेंस म्हणून ?' तें जसें तसेंच हें ! आजपर्यंत आपला मार्ग सुशोभित बागांतून होता, त्याजवर चंदनाचे सडे घातले होते, ठिकठिकाणीं सुंदर सरोवरें होतीं, पुष्पांचा मधुर सुवास सुटला होता. अशा सुंदर मार्गानें आपण गेलों. आतांचा रस्ता कांट्याकुट्यांनीं भरलेला, त्याला सावली नाहीं, भोंवतालीं कांटेरी झाडें पुष्कळ, उन्हाचा तडाका, पाण्याचा बिंदु नाहीं, अशी बिकट वाट आली. पहिली जशी आपण आनंदांत क्रमिली, तशी हीही शांतपणें क्रमिली पाहिजे."

'पालखीचा गोंडा' या कादंबरींत वैभवाच्या लोभानें मुलगी श्रीमंत पण वेड्या मुलाला दिल्यानंतर तिची जी दुर्दशा झाली व त्यांतून तिनें जो समाजसेवेचा मार्ग काढला त्याची कथा तिच्या धाकट्या बहिणीनें लिहिलेली आहे. या दोन्ही कादंबऱ्यांमुळें 'यशस्वी स्त्रीकादंबरीकार' ही कीर्ति काशी-ताईंना मिळाली.

हरिभाऊंच्या आग्रहामुळें डॉ. आनंदीबाई जोशी यांचें चरित्र काशी-ताईंनीं लिहिलें. आपल्या पत्रांत हरिभाऊ त्यांना वारंवार स्मरण करून देत असत, "चरित्र कुठवर आलें ? गृहिणीच्या कर्तव्यामुळें चरित्रकाराचें कर्तव्य विसरून कसें चालेल ?"

## त्रिवर्गांचा वाङ्मयीन सहकार :

नेवासें येथें असतांना काशीताईंच्या हातून बरीच वाङ्मयसेवा झाली. तेथें सुट्टींत हरिभाऊ येत असत. या तिघांच्या गप्पा रात्र संपली तरी संपत नसत. या गप्पांतून अनेक वाङ्मयीन कल्पना स्फुरण पावल्या. कानिटकर व हरिभाऊ यांनीं शेक्सपियरच्या नाटकाची भाषांतरें करतांना काशीताईंना

घरगुती भाषेसाठीं मत विचारावें. ' मनोरंजन व निबंधचंद्रिका ' या मासिकांतही या त्रिवर्गांचें सहकार्य होतें. विष्णुपंत व लक्ष्मीबाई ही हरिभाऊंच्या कादंबरींत रंगविलेली सत्प्रवृत्त पतिपत्नींची चित्रें हीं कानिटकर पतिपत्नींचीं आहेत. आपल्यापैकीं जो आधी दिवंगत होईल त्याचें चरित्र दुसऱ्यानें लिहावयाचें असें हरिभाऊ व काशीताई यांचें ठरलें होतें. हरिभाऊ मृत्यु पावल्यावर वार्धक्यामुळें काशीताईकडून विस्तृत चरित्र लिहून झालें नाहीं. पण त्यांनीं 'विविधज्ञानविस्तारां'त हरिभाऊंच्या आठवणी प्रसिद्ध करून आपल्या प्रेमळ भावाला श्रद्धांजलि अर्पण केली.

## सामाजिक कार्य :

संसार सांभाळून जें थोडेंफार सामाजिक कार्य करणें साधलें तेवढें काशीताईनीं केलें. कांहीं वर्षें सेवासदन संस्थेच्या त्या उपाध्यक्ष होत्या. पंडिता रमाबाईच्या शारदासदन या संस्थेबद्दल पहिल्यापासून त्यांना आपुलकी वाटत होती. या संस्थेचें उद्‌घाटन त्यांच्या हस्तें झालें होतें. इ. स. १८९६–९७ सालच्या दुष्काळांत स्वयंसेविका म्हणून त्यांनीं काम केलें होतें. नगरला एका पुनर्विवाहाला हजर राहून कन्यादान करण्याची जबाबदारी कानिटकर पति-पत्नींवर आली. काशीताई घराबाहेर पडणार तोंच मोठ्या भावानें त्यांना अडविलें. तो म्हणाला, " तूं ही जबाबदारी घेऊं नकोस. तुझ्या मुलांच्या मौंजी व्हावयाच्या आहेत. मुलींचें लग्न होणेंसुद्धां तुमच्या सुधारकी विचारांमुळें अशक्य होईल. तेव्हां तूं आतां जाऊं नकोस. " परंतु काशी-ताईनीं आपला विचार न बदलतां स्पष्टपणें सांगितलें कीं, " दादा यावेळीं तूं मला अडवूं नकोस. मुलगी आतां एक वर्षाची आहे. तिचें लग्न व्हायची वेळ येईपर्यंत जग पुष्कळ पुढें जाईल. " आणि खरोखरच त्याप्रमाणें जग पुढें गेलेंही.

## मिशनरी संस्थेंतील चहा :

खाण्यापिण्याच्या निर्बंधांतूनच पुढें पंचहौद मिशनचें चहाप्रकरण निर्माण झालें व चांगलेंच गाजलें. गोपाळराव जोशी यांनीं हा बेत घडवून आणला.

पंचहौद मिशनमध्यें सर्व प्रतिष्ठित मंडळींना आमंत्रण देऊन व्याख्यान व चर्चा झाल्यावर सर्वांपुढें चहा ठेवण्यात आला. आज या गोष्टींत आपल्याला क्रांतिकारक कांहींच वाटत नाहीं. समोर आलेला चहाचा पेला पाहून तो रिकामा कसा करावयाचा हा प्रश्न आज आपल्याला पडत नाहीं. पण त्यावेळीं तो सर्वांना पडला. मिशनऱ्यांच्या संस्थेंतला चहा कसा घ्यावयाचा असें म्हणून कांहींनीं चहाचा कप दूर सारला; कांहींनीं फक्त बिस्कीटें खाल्लीं; आणि कांहींनीं दोन्हीवरही ताव मारला. तोपर्यंत ही बातमी 'पुणें—वैभव' कचेरींत गेलीच होती. दुसऱ्या दिवशीं बेचाळीस लोकांचीं नांवें प्रसिद्ध झाली. त्यांच्यावर बहिष्कार घालण्यांत आला. हें ग्रामण्य प्रकरण महाराष्ट्रांत दोन वर्षें खूपच गाजलें. अनेकांना या क्षुल्लक गोष्टीमुळें उपद्रव झाला. संभाविक लोकांची अब्रू चव्हाट्यावर आणण्याची संधि कुचाळांना मिळाली. कर्कश सासवांनीं सुनेच्या माहेरच्या ४२ पिढ्यांचा उद्धार करून त्यांना हीनदीन करून टाकलें. लोकहितवादी या प्रकरणांत गोवले गेले होते. प्रायश्चित्त घ्यावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें. पण आपल्या मुलींना माहेरी पाठविलें जाणार नाहीं ही धमकी व्याह्यांकडून मिळाल्यानें कन्याप्रेमामुळें त्यांना तत्त्वनिष्ठा दाखवितां आली नाहीं.

## अखेर प्रायश्चित्त घेतल :

या प्रकारणांत काशीताई कानिटकरांचें नांव उगीचच येऊन गेलें. त्या सुशिक्षित मंडळींत वावरत असल्या तरी त्या दिवशीं त्यांना मिशन संस्थेंत जाणें शक्य नव्हतें. त्यांना प्रसूत होऊन दोन दिवस झाले होते. पण त्यांचेंही नांव प्रसिद्ध झालें. घरांत चोरट्यासारखें वावरतां वावरतां त्यांच्या नाकीं नऊ आले. 'लोणच्याकडे पहावयाचें नाहीं. व पापडाला हात लावावयाचा नाहीं. तान्हें मूल रडूं लागलें तर दूध मागतांना सर्वांची आर्जवें करावयाची. असा छळ काशीताईंनीं दोन वर्षें सहन केला. घरांत चुलते पुतणे विरुद्ध पक्षाचे होते. दहा जणांच्या घरांत लग्नकार्य निघालें कीं या नवमतवादी लोकांना

गाशा गुंडाळून जाण्याचा हुकूम मिळे. लग्नाच्या वेळीं मुलाकडची मंडळी कानिटकरांना घरांत बहिष्कृत मंडळी असल्यामुळें दोनशें रुपये दंड मागत असत. शेवटीं एकदां प्रायश्चित्त घेऊन भटजींच्या हातावर तीस रुपये दिल्यावर या त्रासांतून सर्वांची सुटका झाली.

काशीताईंना दीर्घायुष्य लाभलें. पण पतीच्या निधनानंतर त्यांच्या हातून वाङ्मयीन कामगिरी झाली नाहीं. 'सूर्यापाये न खलु कमलं पुष्यति स्वामिरव्याम्' या कालिदासवचनाप्रमाणें या कमलिनीची अवस्था झाली. परंतु स्त्रीशिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेंत वाङ्मयक्षेत्रांत त्यांच्या अव्याजमनोहर लेखणीनें जी स्फूर्ति निर्माण केली, ती अवर्णनीय आहे. ३० जानेवारी १९४८ रोजीं त्यांनीं ऐहिक जीवनाचे पाश तोडून परलोकीं प्रयाण केलें. त्यांच्या सुमधुर गृहजीवनाचें प्रतिबिंब त्यांच्या वाङ्मयांत आढळतें; म्हणूनच त्या वाङ्मयांतील कोणतेंही पान वाचतांना आजही या साहित्यसरोवरांतील कमलिनीच्या शांतोदात्त व्यक्तित्वाचा मंदमधुर सुगंध दरवळल्याचाच अनुभव रसिकांना आल्याशिवाय राहात नाहीं.

---

**अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :**

१. काशीबाईंची 'पालखीचा गोंडा' व 'रंगराव' हीं पुस्तकें वाचा.

२. चहाग्रामण्य प्रकरणावरून सामाजिक परिस्थितीबद्दल तुम्हांस काय निष्कर्ष काढतां येतील ?

३. हरिभाऊंना काशीताईंबद्दल विशेष आदर कोणत्या गुणांमुळें वाटत होता ?

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 25649
क्रमांक 1920
नों. दि. 3-8-5



# सौ. आनंदीबाई कर्वे



लोकक्षोभामुळें पंडिता रमाबाईंचें शारदासदन बंद पडलें आणि हिंदुसमाजांतील विधवांचा एक आधार नाहींसा झाला. महर्षि कर्वे यांनीं अनाथ विधवांच्या या प्रश्नाला हात घातला व तें कार्य अत्यंत चिकाटीनें पुन्हां आरंभिलें व तडीस नेलें. अरुंधती, अनसूया व लोपामुद्रा या प्राचीन ऋषीपत्नींप्रमाणें आधुनिक महाराष्ट्राचे महर्षि कर्वे यांच्या पत्नी सौ. आनंदीबाई याही वंदनीय आहेत. ]

इ. स. १८९३ सालांतील पुण्यांतील गोष्ट.

सगळीकडे मंगलवाद्यांचा सूर कानावर पडत होता. वाड्यावाड्यांतून लगीनघाई उडालेली दिसत होती. डॉ. भांडारकर यांच्या वाड्यांतही आज

एक विवाह होणार होता. पण इतरत्र आढळून येणारी धांदल गडबड तेथें मुळींच दिसत नव्हती. अगदीं निवडक मंडळी उपस्थित होती. त्यांच्या चेहेऱ्यावर प्रसन्नता व गांभीर्य विलसत होतें. कारण तेथें होणारा विवाह हा पुनर्विवाह होता. इ. स. १८५६ मध्यें पुनर्विवाहाला कायद्यानें जरी संमति देण्यांत आलेली होती तरी पुनर्विवाहाची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतपतच होती. लोकमत पुनर्विवाहाला अजून अनुकूल नव्हतें. त्यामुळें पुनर्विवाहाला उपस्थित राहाण्याचें मनोधैर्यही फार थोड्यांनीं दाखविलें. प्रो. धोंडो केशव कर्वे यांच्या तत्त्वनिष्ठेची प्रशंसा करणारी निवडक सुधारक मंडळी व वृत्तपत्रांचे बातमीदार यांखेरीज कुणी तेथें फिरकलेंही नाहीं. मुहूर्तवेळ जवळ आली. आणि तितक्यांत पंडिता रमाबाई व त्यांच्या पाठोपाठ शारदासदनांतील मुली तेथें आल्या. पंडिता रमाबाईंच्या चेहेऱ्यावर कृतार्थता ओसंडत होती. कारण आज त्यांच्या मानीव कन्येचा-गोदूबाईचा-पुनर्विवाह होणार होता. लग्नसमारंभ योग्य प्रकारें आटोपल्यावर पंडिता रमाबाईंनीं नवपरिणित वधूवरांना अहेर केला. आपल्या मानीव कन्येवर आशीर्वादाप्रमाणें त्यांनीं वस्त्रालंकाराचाही वर्षाव करून आपल्या उदार मातृहृदयाची साक्ष पटविली. संध्याकाळीं शारदासदनांत त्यांनीं सर्वांना थाटाची मेजवानी दिली. त्यावेळीं सकाळचें गांभीर्य जाऊन थट्टामस्करीला आरंभ झाला होता. शारदासदनांतील मुलींनीं—

“ आनंद झाला फार, आम्हांला आनंद झाला फार !
प्रिय भगिनी गे गोदूबाई करी सुखें संसार ”

हें समयोचित पद सुस्वरांत म्हटलें. नंतर वधूवरांना नांव घेण्याचा आग्रह सुरू झाला. प्रो. कर्वे यांनीं “ सदनाचे उपकार मजवर झाले फार। आनंदीनें फेडायला असावें तयार ।। ” हा उखाणा घेतला. त्यावेळीं कुणाला कल्पनाही नव्हती कीं खरोखर आनंदी हे उपकार फेडील. पण पंडिता रमाबाईचें हें ऋण तिनें शतशः फेडलें व महाराष्ट्रांतील असंख्य विधवांचे आशीर्वाद जोडले.

## पुर्वायुष्य :

मानवी जीवनांतील योगायोग किती अतर्क्य असतात ! देवरुखसारख्या खेड्यांतील बालविधवा गोदूबाई ही सुफलित जीवन जगून अनाथपरिपालनाचें कार्य करील असें कुणाला स्वप्नांतही खरें वाटलें नसतें. गोदूबाईचें लग्न वयाच्या आठव्या वर्षीं झालें आणि एका वर्षाच्या आंत त्यांच्यावर वैधव्याची आपत्ति आली. अल्लड वयांत गंभीर व्हावें लागलें. माखजन गांवीं त्यांचें सासर होतें. तेथें त्या अधूनमधून जात असत. गोदूबाईची सासू स्वभावानें सालस होती. तिनें गोदूबाईला जगांत राहाण्याबाबत अमोल उपदेश केला. ती म्हणाली, " बाई ग, पातिव्रत्य व कष्टाळूपणा या गुणांची जोड असली तर जगांत कुणाचा बोल सहन करण्याची वेळ येत नाहीं. तुका म्हणे पतिव्रता । तिची देवावर सत्ता. " या उपदेशानें लहान वयांतच आपल्या चारित्र्याची दक्षता घेण्याची जबाबदारी गोदूबाईच्या मनावर बिंबली. आपल्या आयुष्याचें फार मोठें नुकसान झालें आहे ही जाणीव त्यांना होऊं लागली, तरीही भोंवतालच्या जीवनांत कुठेंच आशेचा किरण दिसत नसल्यानें ' असेंच कष्ट करतां करतां एक दिवस मरून जायचे ' एवढें त्यांना माहीत झालें होतें. कधीं देवरूखला वडिलांकडे, कधीं माखजनला सासरीं तर कधींकधीं पुण्यास भावाकडे, जेथें कष्टाची वाण असेल तेथें त्या जाऊन राहात असत.

## अनपेक्षित भाग्ययोग :

इ. स. १८८९ सालीं पंडिता रमाबाईनीं पुण्याला विधवांसाठीं ' शारदासदन ' ही संस्था स्थापन केली. गोदूबाईचे भाऊ नरहरपंत जोशी यांनी त्यांना तेथें शिक्षणासाठीं ठेवलें. नरहरपंत स्वतः सुधारकी मताचे होते. त्यांचे जिवलग स्नेही प्रो. कर्वे व ते अनेकवेळां सामाजिक प्रश्नाबाबत चर्चा करीत असत. प्रथम पत्नी निवर्तल्यावर प्रो. कर्वे यांनीं पुनर्विवाहाचा विचार केला. परंतु आपल्या मित्राच्या बहिणीबद्दल विचार करावा ही कल्पनाही त्यांना

सुचली नाहीं. कारण तें घराणें फार जुन्या वळणाचें होतें. पुनर्विवाहाची जहाल सुधारणा मानवण्याइतपत सर्व मंडळींची वैचारिक सिद्धता झालेली नव्हती.

गोदूबाईनीं शारदासदनांत चार वर्षें राहून विद्या संपादन केली. पंडिता रमाबाईनीं पुनर्विवाह करण्याबद्दल सुचविल्यावर त्यांनीं नकारार्थी उत्तर दिलें. परंतु योगायोग वेगळाच होता ! सनातनी म्हणविल्या गेलेल्या पितृहृदयाला कळवळा आला. नवव्या वर्षी वैधव्य आलेल्या या कन्येचें भवितव्य काय ? हा प्रश्न मनाला पीळ पाडून व्याकुळ करून टाकीत असे. आपल्या कन्येचें मत अजमावण्यासाठीं त्यांनीं विचारलें, " करशील कां बाळ पुन्हां लग्न ? " त्यावर गोदूबाई म्हणत असत, " नको बाबा, दुसरं लग्न करून पुन्हां असंच झालं तर... ! " शेवटीं प्रो. कर्वे यांनीं व इतर मंडळींनीं मन वळविल्यावर त्यांनीं नव्या जीवनांत पदार्पण करण्याचें ठरविलें. प्रो. कर्वे यांच्यासारख्या ध्येयवादी सुधारकाचे अर्धांगीपद लाभल्यानें गोदूबाईंच्या जीवनाला नवें वळण लागलें. जीवनांतलें दैन्य लयाला जाऊन स्थैर्य आलें. संसाराची जबाबदारी उत्तम प्रकारें पार पाडीत असतांना समाजसेवाही करतां आली. महर्षि कर्वे यांच्याबरोबर आनंदीबाई कर्वे यांचेंही नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरस्मरणीय झालें.

## जीवितकार्याला प्रारंभ :

प्रो. धोंडो केशव कर्वे यांनीं २५ मे १८९६ च्या ' सुधारक ' वृत्तपत्रांत ' अनाथबालिकाश्रम ' स्थापन करण्याची कल्पना प्रथम जनतेसमोर मांडली. नंतर सतत व्याख्यानद्वारां त्यांनीं लोकमत अनुकूल करण्याचा प्रयत्न केला. १ जानेवारी १८९९ या शुभदिवशीं 'अनाथबालिकाश्रम' या संस्थेची मुहूर्तमेढ रोवण्यांत आली. प्रथम फक्त आठ मुली या संस्थेंत होत्या. समाजाला अशा प्रकारच्या संस्थेची अत्यंत आवश्यकता असूनही आर्थिक साहाय्य नसल्यानें संस्था चालविणें अतिशय कष्टप्रद होतें. पंडिता रमाबाईचें शारदासदन लोकक्षोभामुळें बंद पडलें होतें. तेंच कार्य कर्वे पति-पत्नींनीं नव्या जोमानें सुरू केलें. त्यासाठीं लागणारी चिकाटी व कष्टाळूपणा दोघांच्याही अंगांत

पुरेपूर बाणला होता. संसार व संस्था यांतील कर्तव्याबाबत मनांत झगडा सुरू झाला कीं प्रो. कर्वे यांचे ध्येयवादी मन नेहमीं संस्थेच्या बाजूनें कौल देत असे. आनंदीबाईनींही त्यांच्या या कर्तव्यप्रेमाच्या आड न येतां उलट संसाराची आघाडी सांभाळून त्यांना सर्वतोपरी साहाय्य केलें. हिंगण्याच्या जागेंत आश्रम सुरू झाल्यावर प्रो. कर्वे यांना संस्थेच्या कामकाजामुळें घरांत पाहायला वेळ सांपडत नसे. कित्येकदां घरांत आजारपण असतांनाही मन घट्ट करून हिंगण्याची वाट धरावी लागत असे. पण आनंदीबाईनीं या कौटुंबिक जबाबदाऱ्या सर्वस्वी आपल्या हिंमतीवर पार पाडल्या.

## बीजाचा वृक्ष :

हिंगण्याच्या माळरानावर झोंपडी बांधून प्रो. कर्वे यांनीं कार्याला सुरवांत केल्यावर हळूंहळूं या कार्याचें महत्त्व लोकांना पटूं लागलें. आर्थिक परिस्थिति सुधारूं लागली. झोंपडी ऐवजीं प्रशस्त इमारती बांधल्या गेल्या. संस्थेंतून बाहेर पडलेल्या विधवा स्त्रिया महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं अर्थार्जन करूं लागल्या. जीवनांतील परवशता नाहींशीं झाल्यानें केवळ अनुकंपनीय वाटणाऱ्या स्त्रिया आदरणीय वाटूं लागल्या. अनाथबालिकाश्रम या बीजाचें रुपांतर हां हां म्हणतां कर्वे विद्यापीठ या वृक्षांत झालें. हें भाग्य लाभण्यासाठीं कर्वे पतिपत्नींनीं अविश्रांत श्रम घेतलें.

संस्थेच्या कामाबरोबर आपल्या संसारांतही आनंदीबाई दक्ष होत्या. पुनर्विवाह झाल्यावर कोकणांत मुरबाड गांवीं गेल्यावर लोकांनीं बहिष्कार घातला तो त्या विसरल्या नाहींत. निकटच्या आप्तमंडळींनीं काढलेल्या शंका कुशंकांना आपल्या कृतीनेंच उत्तर द्यावयाचे त्यांनीं ठरविलें. पुनर्विवाही दांपत्याचीं अपत्यें संस्कारहीनच असणार, असा सूर कांहीं लोकांच्या बोलण्यांत येऊन गेला होता. आनंदीबाईनीं ज्या कष्टाळूपणानें आपला गृहिणीधर्म भूषविला त्याच तत्परतेनें त्यांनीं आपल्या मुलांना उत्तम वळण

लावण्याचें परिश्रम घेतले. आणि सुदैवानें एकापेक्षां एक अशा कर्तृत्ववान् पुत्रांचें मातृपद गौरविलें.

## अनाथांची माउली :

आश्रमाखेरीज प्रो. कर्वे यांच्या घरींही अनाथ विद्यार्थी आश्रयाला राहात असत. त्यांचें संगोपन आनंदीबाई ममत्वानें करीत असत. अशा अनाथ मुलांबद्दल त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत एका ठिकाणीं म्हटलें आहे कीं, " मी पुस्तकें फार थोडी वाचली आहेत; पण त्या कागदाच्या पुस्तकांपेक्षांही हीं जिवंत पुस्तकेंच फार महत्त्वाची आहेत, असें मला वाटतें. " आनंदीबाईबद्दल हिंगण्याचे एक अध्यापक श्री. महाबळेश्वरकर यांनीं आपल्या काव्यांत काढलेले उद्गार सार्थ आहेत. ते म्हणतात,

" दगडी देवा कधि न वाहिली हिनें फुलांची अंजली ।
पायदळीं परि धुळींत पडलीं फुलें अकालीं कोमेजलेलीं ॥
उचलुनि अलगद हृदयी धरलीं प्रेमजलें अन् पुन्हां फुलविली ।
म्हणुनि माझ्या मनास गमली धर्मशील ही खरी माउली ॥ "

## भगिनीचें सहकार्य :

अनाथबालिकाश्रमाच्या कार्याला अनेकांचे हात लागले. त्यांत प्रामुख्यानें आनंदीबाईच्या ज्येष्ठ भगिनी श्री. पार्वतीबाई आठवले यांचा उल्लेख करावा लागेल. एक मुलगा झाल्यावर त्यांचाही संसार अपूर्णच राहिला. पण या कार्याला वाहून घेऊन त्यांनीं स्वतःच्या जीवनाचें सार्थक करून घेतलें. लिहावाचायला न येणाऱ्या या स्त्रीनें मोठ्या वयांत थोडीफार विद्या शिकल्यानंतर अमेरिकेंत जाऊन आश्रमासाठीं पुष्कळ आर्थिक साहाय्य मिळविलें. आतांपर्यंत सुमारें लाख दीडलाख रुपये व एक मोटार त्यांनीं संस्थेला मिळवून दिली. परदेशांत त्यांना एका प्रसंगीं बद्दा विसळूनही स्वतःचा उदरनिर्वाह करावयाची वेळ आली होती.

**नमस्कार त्या थोर साध्वी सतीला!:**

आश्रमांत परिचित मंडळींत आनंदीबाई 'बाया' या नांवानें ओळखल्या जात असत. बायानें फार कष्ट केले होते, म्हणून मुलें मोठी झाल्यावर म्हणत, 'बाया, तूं आतां फक्त विश्रांति घेत जा. म्हातारपणीं कशाला उगीच त्रास घेतेस?' पण सारा जन्म अविश्रांत श्रम करण्यांत गेलेला असल्यानें बायाला कुणावर अवलंबून राहाणें बिलकुल आवडत नसे. 'अनायासेन मरणं, विना-दैन्येन जीवनम्' या दोन्ही गोष्टी त्यांना लाभल्या. दीर्घकाळ जगून जीवनाचें सार्थक झाल्यानंतर त्यांनीं जीवितयात्रा संपविली. त्यांची स्मृति म्हणून हिंगण्याला जें तुळशीवृंदावन बांधलें आहे, तें पाहतांना मनांत विचार येतो, 'खरोखर आनंदीबाई याही तुळशीप्रमाणें प्रातःस्मरणीय आहेत.' आणि मग त्यांच्या एका आश्रमकन्येप्रमाणें आपल्यालाही म्हणावेंसें वाटतें कीं,

खरी पुण्यभूमी असे हिंगण्याची।
सतीच्या पदस्पर्शनें धन्य साची॥
पतीच्या सवें देह हा कष्टविला।
नमस्कार त्या थोर साध्वी सतीला॥

---

**अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न:**

१. 'माझें पुराण' हें आनंदीबाईचें आत्मचरित्र वाचा.

२. महर्षि कर्वे यांच्या कामगिरीचें थोडक्यांत वर्णन करा.

३. 'धर्मशील माउली' हें विशेषण आनंदीबाईंना कोणत्या अर्थानें लावतां येईल?

रोगग्रस्त अबलांची देवता

# रेबेका सिमियन्स



( जन्म इ. स. १८५९; मृत्यु इ. स. १९०४ )

[ एकोणिसाव्या शतकांत वैद्यकविद्या शिकणाऱ्या स्त्रिया हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच होत्या. स्त्रीशिक्षणाकडे पाहण्याचा सार्वत्रिक अनुदार दृष्टिकोन ध्यानांत आल्यावर त्याबद्दल फारसें आश्चर्य वाटत नाहीं. या स्त्रियांपैकीं ज्या एकीनें महाराष्ट्रांत लोकोपयोगी कार्य करून आबालवृद्धांचा आदर संपादन केला ती स्त्री जन्मानें ज्यू होती. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनांत मोलाची भर घालणारें ज्यू समाजांतील सिमियन दांपत्य विद्याव्यासंगानें भूषणभूत झालें होतें, ही गोष्ट त्या काळच्या वृत्तपत्रांवरून स्पष्ट दिसून येते ]

बक्षिससमारंभाचा दिवस म्हणजे कोण धांदलीचा ! शाळेंतील विद्यार्थी व अध्यापक इकडून तिकडे येरझारा घालीत सर्व व्यवस्था समाधानकारक झाली कीं नाहीं ते पाहात होते. हेडमास्तर मुख्य पाहुण्यांच्या वाटेकडे डोळे

लावून बसले होते. कलेक्टर दारांत आल्यावर पद्धतशीरपणें कार्यक्रमाला सुरुवात झाली. बक्षिस देण्याची वेळ येऊन ठेपली. हेडमास्तरांनीं बक्षिसाला पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचीं नांवें उच्चारावयाची व कलेक्टरसाहेबांनीं तीं द्यावयाचीं असा क्रम सुरूं झाला. पण मध्येंच घोटाळा झाला ! कुणीतरी बक्षिसांची फिरवाफिरव केलेली होती. पहिल्या नंबरच्या मुलीला अगदींच मामुली वस्तु व दुसऱ्या नंबराला खण व पातळ अशीं बक्षिसें पाहातांना कलेक्टरसाहेबांनीं हेडमास्तरांना ' हें काय ? ' असें विचारलें. त्याबरोबर ती चूक त्यांच्या ध्यानांत आली व त्यांचा चेहरा घामानें डबडबला. घसा खाकरीत ते म्हणाले, " त्या मुलीला तेंच आवडतें " वेळ मारून नेली म्हणून हेडमास्तर सुटकेचा निःश्वास टाकणार होते. पण कलेक्टरसाहेब चांगलेच खमंग ! त्यांचा हुकूम सुटला. " बोलवा पाहूं त्या मुलीला ! " हेडमास्तरांनीं 'सीमा घोसाळकर, म्हणून हांक मारली. ती चुणचुणीत मुलगी समोर येतांच निमंत्रित पाहुण्यांनीं तिला विचारलें, " मुली, खरोखरच कां तुला हें बक्षिस आवडतें ? " मास्तरांच्या सत्वपरीक्षेचीच ती वेळ ! मास्तरांनीं सीमाकडे पाहिलें. सीमा आपल्या मंजुळ आवाजांत उत्तर देत होती, "मास्तरांची इच्छा असेल तेंच मला आवडते." या तिच्या शहाणपणाच्या उत्तरानें समारंभांतील तंग वातावरण एकदम कमी झालें. तिची समय-सूचकता पाहून मास्तरांना व निमंत्रित पाहुण्यांना फार संतोष वाटला. आणि पाहुण्यांकडून तिला बक्षिसादाखल दहा रुपये देण्यांत आले. पुढील आयुष्यांतही चाणाक्षपणा व निःस्पृहता या सद्‌गुणांनीं तिला उत्तम पदाप्रत नेलें. तिचें लोकोत्तर कार्य पाहून जुन्या मताचे पाध्येशास्त्री यांना देखील काव्य-स्फूर्ति होऊन त्यांनीं,

" उपकार फार केले वर्णन त्यांचें कदा न करवेल ।
निजजीवनयात्रेनें सौजन्याचाच लाविला वेल ॥ "

असे धन्योद्गार काढले.

## जन्म व बालपण :

धर्माच्या नांवाखालीं ज्यू जमातीचा भयंकर छळ झाल्यामुळें वादळी वाऱ्यानें एकाद्या वृक्षाचीं पानें भिरभिरत इतस्ततः फेकली जावी तसा हा समाज जगभर वेगवेगळ्या ठिकाणीं विखुरलेला आहे. संशोधकांच्या मतें सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी कांहीं ज्यू लोकांनीं पॅलेस्टाईन सोडलें. दोन गलबतांत सर्व माणसे भरून तीं अज्ञात प्रदेशाला जाण्यास निघाली. दुर्दैवानें त्यांतील एक गलबत मुंबईजवळ खांदेरी-उंदेरीच्या खडकावर आपटलें व भयंकर प्राणहानी झाली. उरलेले लोक कुलाबा जिल्ह्यांत स्थायिक झाले. पुढें उद्योगधंद्याच्या निमित्तानें ते देशावर आले. त्यांचा संबंध महाराष्ट्रीय समाजाशी आल्यानें या तीसचाळीस हजार लोकांनीं महाराष्ट्रीय संस्कृति आत्मसात् केली.

अलिबाग येथें असलेलें घोसाळकर घराणें या ज्यू समाजांत मानमान्यता पावलेलें होतें. या घराण्यांत सीमा घोसाळकर हिचा जन्म इ. स. १८५९ सालीं झाला. तिचें वडील सैनिकपेशांत होते. घोसाळकर सुभेदार मोठे रुबाबदार व चारित्र्यसंपन्न गृहस्थ होते. हें घराणें दीर्घायुत्वाबद्दल प्रसिद्ध होतें. घोसाळकरांची आजी तब्बल सव्वाशें वर्षें जगली व नव्वद वर्षें तिचे दांत देखील इतके मजबूत होते कीं ती चणे दातांनीं कडाकड फोडून खात असे. सीमाबाईला उत्कृष्ट आरोग्याची व उदार स्वभावाची देणगी बालपणांतच मिळाली होती. घरींदारीं प्रिय असलेली ही मुलगी अतिशय उद्योगी, सहनशील व मनमिळाऊ होती.

## बालमित्राशीं विवाह :

वयाच्या सोळाव्या वर्षी सीमा घोसाळकर हिचा विवाह तिच्या बालमित्राशीं—सिमियन बेंजामिन—यांच्याशीं झाला. या दोन्हीं घराण्यांचा दाट स्नेह होता. परंतु मध्यंतरी सिमियन बेंजामिन यांचे वडील मृत्यु पावल्यामुळें त्यांचें अलिबाग येथें असलेलें घर मोडण्यांत आलें. सिमियन बेंजामिन

शिक्षणासाठीं मुंबईस आले. त्यांच्या विवाहाचा प्रश्न उपस्थित होतांच त्यांना आपल्या बालपणच्या मैत्रिणीची आठवण झाली. शहरांत राहिल्यानें त्यांचे विचार प्रगल्भ झाले होते. ‘ विवाह म्हणजे खरी मित्रप्राप्ति ’ असा त्यांचा पुरोगामी दृष्टिकोन असल्यानें त्यांनीं सीमाबाईंना रीतसर मागणी घातली व १८७५ सालीं हा विवाह होऊन सीमा घोसाळकर या रेबेका सिमियन झाल्या.

## परिचारिकेचा व्यवसाय :

त्या काळांत शाळेंत हुशार म्हणून गाजलेल्या रेबेकाबाईंना गृहकृत्यें व शिवणकाम यांखेरीज दुसरें कोणतेंच कार्य करण्याची संधि मिळणें शक्य नव्हतें. घराबाहेर पडून स्वतंत्र व्यवसाय करणें ही गोष्ट स्त्रियांच्या बाबतींत अपवादात्मक व म्हणूनच निंदास्पद होती. स्वतः सिमियन बेंजाभिन यांचे विचार काळाच्या मानानें बरेच पुढारलेले होते. पण त्यांनाही कोणत्या प्रकारें रेबेकाबाईंना पुढें शिक्षण द्यावें हा प्रश्न पडला होता. पण एक दिवस हा प्रश्न अकल्पितपणें सुटला. वर्तमानपत्रांत ग्रँड मेडिकल कॉलेजमध्यें स्त्रियांसाठीं ‘ सुईणीचा वर्ग ’ काढला जाईल अशी बातमी प्रसिद्ध झाली. रेबेकाबाईंनीं ताबडतोब जाऊन नांव नोंदविलें. या वर्गांत शिकण्यासाठीं ज्या चार-पांच स्त्रिया प्रथम आल्या त्यांत फक्त रेबेकाबाईंनींच उत्तम यश मिळविलें व आयुष्यभर हा व्यवसाय करून परोपकाराचा धडा घालून दिला. ‘ ज्यांना आपल्या अभिरुचीचा व्यवसाय सांपडला ते खरे सुखी होत ’ या वचनाप्रमाणें रेबेकाबाईंना हा व्यवसाय अत्यंत सुखदायक झाला. संपत्ति, कीर्ति व जनसेवा या तिन्ही गोष्टी त्यांना या व्यवसायाच्या राजमार्गानें जातांना लाभल्या. अर्थात् त्यासाठीं लागणारी तपश्चर्या त्यांनीं मनोभावानें व अनन्य श्रद्धेनें केली.

## प्रतिकूल लोकमत :

एकंदर लोकमत स्त्रीशिक्षणाला प्रतिकूल होतें. आणि वैद्यकीचें शिक्षण

देण्याबाबत तर विशेष आक्षेप घेतले गेले. हंटर कमिशनपुढें साक्ष देतांना पंडिता रमाबाईनीं स्त्रियांना वैद्यकविद्या शिकविली जावी असें मत प्रतिपादन केलें. परंतु कित्येक सुधारकांनाही असें वाटे कीं, वैद्यक शिकल्यानें स्त्रियांचे उत्तम गुण लयाला जातील–व "जात्या नाजुक शरीराच्या व कमी बुद्धि असलेल्या" स्त्रियांना हें काम झेपणार नाहीं. बंगालचे पुढारी व समाज-कार्यकर्ते केशवचंद्र सेन यांचें देखील असें मत होतें. सरकारनें वेगवेगळ्या लोकांचीं मतें घेतली. पण कोणी अज्ञानानें तर कुणी दुराग्रहानें, आणि कुणी स्वार्थी वृत्तीनें प्रतिकूल मत दिलें. अर्थात् काळाच्या ओघांत हें अज्ञान व हा दुराग्रह गवताच्या काडीप्रमाणें कुठल्याकुठें वहात गेला. रेबेका सिमियन, डॉ. जिराड यांच्यासारख्या अनेक स्त्रियांनीं हा व्यवसायांत पदार्पण करून सिद्ध केलें कीं हा व्यवसाय स्त्रीचें स्त्रीत्व नष्ट करीत नाहीं. व तो स्वीकारल्या-नंतर स्त्रियांना त्यांत जास्तींत जास्त प्रगति करणेंही अशक्य नाहीं.

## शिक्षणास प्रारंभ :

ग्रँड मेडिकल कॉलेजमध्यें जो खास स्त्रियांसाठीं वर्ग उघडण्यांत आला होता, त्यांत गर्भविद्या व प्रसूतीकरणशास्त्र यांवर विशेष भर देण्यांत येऊन इतर विषय त्रोटक स्वरूपांत असत. रस्त्यानें जातांना लोकनिंदेचें भय व पुरुषशिक्षकांच्या हाताखालीं वरील विषय शिकतांना वाटणारा संकोच यामुळें विद्यार्थिनी प्रथम निरुत्साही बनल्या होत्या. पण हळूंहळूं या विषयाचें महत्त्व व उपयुक्तता त्यांच्या मनावर बिंबून त्या अभ्यासाला लागल्या. रेबेका-बाईंच्या नातेवाईकांनीं त्यांच्यावर बहिष्कार घातला. "प्रेताला शिवणें किती अमंगळ ! हें घाणेरडें काम सोडून द्या" असा आग्रह कांहीं वयस्क नातेवाईकांनीं केला. पण रेबेकाबाईंनीं या बहिष्काराला न भितां अभ्यासक्रम पुरा केला व स्वतंत्रपणें परिचारिकेच्या व्यवसायाला आरंभ केला.

## विलक्षण लोकप्रियता :

या धंद्यांतील कौशल्यामुळें रेबेकाबाईंचा जम बसावयास वेळ लागला नाहीं. स्त्रियांच्या रोगांबाबत अभ्यास करतांना रेबेकाबाईंनीं शिकविला

गेलेला विषय वाचनालयांत जाऊन पुन्हां वाचून काढावा. अशा प्रकारें स्वतंत्र अभ्यास केल्यानें त्यांना आत्मविश्वास आला. त्याखेरीज जुनीं घरगुती औषधें व प्रसूतीकरणशास्त्राबाबत जुन्या स्त्रियांचीं मतें यांचाही त्यांनीं परिचय करून घेतला. नळबाजारांत दोन्ही डोळ्यांनीं आंधळी असलेली एक वृद्ध स्त्री प्रसूतीकरणशास्त्रांत निष्णात आहे, असें कळल्यावर त्यांनीं तिच्याकडे जाऊन तिलाही गुरु केले. सारांश, जेथें जेथें ज्ञानाचे कण सांपडले ते घेऊन 'क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्' या वृत्तीनें त्यांचा संग्रह केला. याशिवाय दररोज जीं कामें केलीं असतील त्याच्यावरून स्वानुभवाचें टिपण करून ठेवण्याची त्यांनीं स्वतःला संवय लावली होती.

विषयाचें ज्ञान, परोपकारी वृत्ति व सुमधुर संभाषण यांमुळें त्यांच्याकडे सर्व जातींच्या स्त्रिया रोगचिकित्सेसाठीं येत असत. रेबेकाबाईंनीं मराठी-प्रमाणें गुजराती, उर्दू, हिंदी व कच्छी या भाषांवरही प्रभुत्व मिळविलें. त्यांची ज्ञानाभिलाषा व निरलस वृत्ति यांचा सुपरिणाम होऊन अनेक स्त्रिया त्यांच्याकडे ओढल्या गेल्या. "बाईचा हातगुण फार चांगला" अशी ख्याति होतांच लांबून लांबून रोगी स्त्रिया येऊं लागल्या.

अशा प्रकारें व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची अत्यंत गरज होती. लाजाळू स्त्रिया एक वेळ मरण पत्करावयास तयार होत्या पण पुरुषडॉक्टरचें नांव घेतलें कीं, त्या कानांवर हात ठेवीत. त्यामुळें त्यांना रेबेकाबाईंच्या रूपानें 'आपणांस देवता भेटली' असें वाटे.

## शास्त्रीय विषयावर लेखन :

हा व्यवसाय करीत असतांना रेबेकाबाईंना समाजाचें बारकाईनें निरीक्षण करतां आलें. त्यावरून जीवनांतील अनेक महत्त्वाच्या बाबतींत स्त्रियांचें दिसून येणारें अक्षम्य अज्ञान पाहून त्यांचें चित्त व्यथित होई. कारण या अज्ञानाची किंमत त्यांना आपल्या प्राणाच्या रूपानें देणें भाग पडत असे. म्हणून लेखन-व्याख्यानद्वारां स्त्रियांत या विषयाबद्दल जागृति करण्याचें काम

त्यांनीं हातांत घेतलें. त्या लिहीत तो विषय फार नाजुक व समाजांत विचारहीनता भयंकर ! त्यामुळें कांहीं स्त्रियांदेखील नाक मुरडून म्हणत, “ इश्श ! आतांच्या राज्यांत गुप्त कांहींदेखील राहिलें नाहीं. या बाईनें हें लिहिलें नसतें तर काय मुलें होण्याचीं राहिलीं असती कीं काय ? ” स्वतः रेबेकाबाई मात्र आपल्या भगिनींना विचारप्रवृत्त करण्यासाठीं प्रयत्न करीत असत. त्या म्हणत, “ काय बिचाऱ्या स्त्रियांचीं दुःखें असतात ! स्त्रिया सुंदर कपडे घालून पुढें आल्या कीं, दुसऱ्यास वाटतें कीं, “ वाहवा, ह्यांना कांहींच दुःख नाहीं ! ” परंतु त्यांचीं दुःखें खरोखर दुःसह व पुरुषास दुर्बोध आहेत. बिचाऱ्यांना स्वतःचें आरोग्य कसें कायम ठेवावें हें कळत नाहीं. कधीं हें अज्ञान दूर होईल, देव जाणें ! ”

शास्त्रीय विषयावर लिहितांना सदभिरुचि न सोडतां विषय सुस्पष्टपणें मांडणें जरूर होतें. रेबेकाबाईंचे ते लेख अनेकांना आवडले. सुधारकाग्रणी आगरकर यांनीं रेबेकाबाईंचें अभिनंदन केलें व त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. कविवर्य वि. कों. ओक यानींही त्यांच्या लेखनशैलीबद्दल गौरवाचे उद्गार काढले.

## परोपकाराय सतां विभूतयः । ः

अन्नदान, वस्त्रदान, ज्ञानदान व जीवदान या सर्व दानधर्मांच्या बाबतींत रेबेकांबाईंचा हात सढळ होता. गरीब स्त्रीचें दुःख पाहिलें कीं तिच्याकडून वैद्यकीय फी घेण्याऐवजी तिलाच त्या औषधपाण्याला पैसे देऊन टाकीत. अर्थात् या परोपकारी स्वभावानें आर्थिक दृष्टया त्यांचें नुकसान होई. कारण लोकांची वृत्ति ‘ ऊस गोड लागला कीं मुळासकट खायचा ’ अशी असे. परंतु अंतर्यामीं सात्त्विक समाधान लाभत असल्यानें त्या पैशाकडे लक्ष देत नसत. देवकृपेनें त्यांना जीवनाला आवश्यक तेवढें मिळत होतें. शिवाय साध्या रहाणीची संवय असल्यानें त्यांना पैशाची विशेष हांव नव्हती. आपल्या वडील मुलीला—एलिझाबेथ-हिला त्यांनीं एम्. डी. होण्यासाठीं

अमेरिकेंत पाठविलें. आपल्या प्रिय कन्येला त्यांनीं स्वतःच्या प्रकृतीची काळजी घेण्याबद्दल वारंवार लिहिलें. पण त्याचबरोबर "लिझी, इस्पितळांतील रोग्यांशीं असें वागावें कीं–क्षणभर मी तुझी आईच आजारी आहे. व ज्या प्रेमानें व स्वतःबद्दल बेफिकीर राहून तूं माझें करशील त्याप्रमाणें त्यांची सेवा करीत जा." असा उपदेश केला.

## आरोग्यमंदिर :

सार्वजनिक कार्य करण्याची हौस सिमियन पतिपत्नींना पहिल्यापासून होती. श्री. सिमियन बेंजामिन गांवोगांवीं जाऊन सामाजिक व वैद्यकीय विषयांवर व्याख्यानें देत असत. अशा प्रकारचीं व्याख्यानें मुंबईत देतां यावीत म्हणून इ. स. १८९९ सालीं त्यांनीं एक भव्य व्याख्यानगृह बांधलें. त्याच्याजवळ एक छापखानाही काढला. हें व्याख्यानगृह उत्तम प्रकारें सजविलेलें असून शास्त्रीय उपकरणें, नकाशे इत्यादिकांचें तेथें प्रदर्शनही ठेवण्यांत आलें होतें. लेडी नॉर्थकोट यांच्या हस्तें १६ नोव्हेंबर १८९९ रोजीं त्याचें उद्घाटन झालें. त्या प्रसंगीं 'हा तर राजवाडा आहे' असें उद्गार त्यांनीं काढले. या आरोग्यमंदिरांत विविध विषयांवरील व्याख्यानमाला त्या त्या विषयावरील विद्वानांनीं गुंफली. सर्व जातींचा समाज या ठिकाणीं येऊन ज्ञानलाभ करून घेई. न्यायमूर्ति रानडे, डॉ. भाटवडेकर, वि. कों. ओक वगैरे मंडळी तेथें येऊन हें दृश्य पाहिल्यावर प्रमुदित होत असत. त्याचें वर्णन एका समकालिनानें पुढीलप्रमाणें केलें आहे.

" सौजन्य ज्ञानमूर्ति प्रथित बहुजनीं साधुतुल्य प्रशांत ।
ऐसे ते रानडेही हृदय भरुनिया डोलले तैं नितांत ॥

तैसे श्रीभालचंद्रादिक विबुधवर ज्ञान यज्ञोत्सवाचे ।
आनंदें येऊनिया अहमहमिकया होती अध्वर्यु साचे ॥ "

अशा प्रकारें सिमियन दांपत्याचें एक स्वप्न साकार झालें होतें. पण

'दुरंत कालाची अतर्क्य लीला वेगळीच होती' असें त्यांनीं आपल्या चरित्रांत लिहिलें आहे. एका रात्रीं आग लागून हें आरोग्यमंदिर रक्षामय झालें. त्याला लागूनच असलेल्या घरांत सिमियन कुटुंब रहात असे. एवढ्या भयंकर आगींतून सर्वजण जिवानिशी वांचले, हीच परमेश्वराची कृपा म्हटली पाहिजे. आपल्यासमोर तें मंदिर भस्मसात् होत असतांना सिमियन पतिपत्नींना कमालीचें दुःख झालें. तेथें इतर सामानाबरोबर अनेक वर्षांपासून संग्रहित केलेलीं पुस्तकें व छापावयास जाणारे कित्येक लेख अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडल्यामुळें त्यांना विशेष वाईट वाटणें साहजिक होतें. कुटुंबावर आलेल्या या आपत्तींत त्यांच्यावर सर्व जनतेनें सहानुभूतीचा वर्षाव केला. आगीनें पोळलेलीं मनें या शीतल जलवर्षावानें शांत झालीं आणि विवेक करून त्यांनीं आपलें कार्य पुन्हां आरंभिलें.

रेबेकाबाईच्या चिकित्साकौशल्याबद्दल वेदशास्त्रसंपन्न अच्युत बाळकृष्ण पाध्ये-गुर्जरशास्त्रींनीं एका श्लोकांत म्हटलें,

" यस्याश्चिकित्साविषयेष्वमोघं, नैपुण्यमालोक्य जनः शशंके ।
निसर्गवात्सल्यगुणानुरोधात्, धन्वन्तरि स्त्रैणमुपागतः किम् ? ॥"

ज्याप्रमाणें संस्कृत कवि बाणभट्ट याबद्दल बोलतांना रसिकांनीं 'प्रागल्भ्यमधिकप्राप्तुं वाणी बाणो बभूव' म्हणजे, 'अधिक प्रगल्भता यावी म्हणून वाणी बाणभट्ट झाली' असें म्हटलें, तद्वत् प्रत्यक्ष धन्वंतरी निसर्गतः वात्सल्य अंगीं यावें म्हणून, स्त्रीजन्म घेऊन रेबेकाच्या रूपानें आला कीं काय अशी शंका रेबेकाच्या अचूक रोगनिदान करण्याच्या कौशल्यामुळें जनतेला आली असें वरील श्लोकांत म्हटलें आहे.

## मृत्यु :

अशा या परोपकारी जीवनाचा शेवट २६ जून १९०४ रोजीं झाला. रेबेकाबाईंना कॅन्सरचा विकार जडला आणि शक्ति क्षीण होत होत त्यांना

मृत्यु आला. त्यावेळीं त्यांचें वय पंचेचाळीस वर्षांचें होतें. सव्वीस वर्षे त्यांनीं आपला व्यवसाय उत्तम प्रकारें करून कृतार्थता मिळविली. त्यांच्या मृत्यूनें मुंबईत व जेथें जेथें त्यांच्या नैपुण्याची ख्याति पसरली होती व प्रत्यक्ष खात्रीही झाली होती त्या त्या सर्व ठिकाणीं लोक शोकानें हळहळले.

त्यांचें यथायोग्य वर्णन पुढील कवितेंत आहे. त्यावरून जनतेच्या हृदयांत त्यांना किती गौरवाचें स्थान होतें, याची कल्पना येते.

“ तें सौजन्य अनन्यलभ्य शुचिता शालीनता चारुता ।
ती लोकप्रियताहि दुर्लभ तसें दाक्षिण्य तेजस्विता ॥

लोकश्रेष्ठ गुणाश्रया श्रुतवती ऐशी तिला पाहतां ।
वाटे सर्वजनां न मर्त्यवनिता ही देवता तत्त्वता ॥ ”

आपल्या अक्षय कीर्तिरूपानें देवपदाला पोहोचलेल्या रेबेकाबाईंच्या पुण्यस्मृतीला शतशः वंदन असो !

---

**अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :**

१. ज्यू जमातीवर धर्माच्या नांवाखालीं कोणकोणतीं संकटें आलीं ? पॅलेस्टाईनमध्यें घडलेला ताजा इतिहास समजावून घ्या.
२. वैद्यकीय व्यवसायांत स्त्रियांना मज्जाव होता. त्यावरून त्याकाळच्या सामाजिक विचारसरणीबद्दल काय निष्कर्ष काढतां येईल ?
३. वैद्यकीय व्यवसायाला आवश्यक असणारे कोणते सद्गुण रेबेकाबाईंच्या ठिकाणीं होते ?

गृहलक्ष्मी आणि साहित्यलक्ष्मी

# लक्ष्मीबाई टिळक



[ लहान वयांतच लक्ष्मीबाईंवर संसाराची जबाबदारी पडली. दारिद्र्य हात धुऊन मागें लागलें होतें. संसारांत लहानमोठी वादळें येऊन गेलीं. त्या दुःखांतून लक्ष्मीबाईंच्या काव्याचा उद्भव झाला. शुद्धलेखनाचे साधे नियम माहीत नसलेल्या व नातवंडांबरोबर जिनें अक्षरें घटविलीं अशा या स्त्रीनें साहित्याला अलंकारभूत असें आत्मचरित्र लिहिलें; आणि ' अहो आश्चर्यम्! ' असें महाराष्ट्रीय रसिकता एकमुखानें उद्गारली. ]

" पुढें ठाकते जेधवां मूर्ति तुझी ।
वयाचा विरे कोश थोरांचिया ॥
मनें धाव घेती शिशूंच्या परि ती ।
असें स्निग्ध वात्सल्य ठायीं तुझ्या ॥ "

वरील चार ओळी लिहून ' साहित्यलक्ष्मीच्या पुण्यस्मृतीस ' ' अशोक ' कवीनें श्रद्धांजलि अर्पण केली. या ओळींत लक्ष्मीबाईंच्या विलोभनीय व्यक्तित्वाचा एक पैलू चमकतांना दिसतो. लहानथोर, सनातनीसुधारक, सुशिक्षित-अशिक्षित या सर्वांना लक्ष्मीबाई प्रिय होत्या. त्यांच्या ठिकाणीं वसत असलेलें स्निग्ध वात्सल्य सर्वांना आपलेसें करून घेत असे. साहित्यांतील रथीमहारथींचे साहित्यविषयक मूल्यांबाबत अनेक वादविवाद रंगले. पण साहित्यिकांच्या या मातृमूर्तीचा साहित्यांतील अधिकार कुणीही अमान्य केला नाहीं. खरोखर असें त्यांच्या साहित्यांत आहे तरी काय ?

## स्मृतिचित्रांची लोकप्रियता :

लक्ष्मीबाईंचे जीवन हें महाराष्ट्राला सुपरिचित आहे. त्यांच्या आत्मचरित्रानें त्यांच्या वाङ्मयीन संसारावर सुंदर कळस चढविला. या पुस्तकाला अभूतपूर्व लोकप्रियता लाभली. कारण हें आत्मचरित्र एखाद्या कादंबरीपेक्षांही चित्ताकर्षक झालें आहे. ' स्मृतिचित्रें ' वाचतां वाचतां हंसू येतें आणि हंसतां हंसतां डोळ्यांत अश्रू जमा होतात. जीवनांतील हास्य आणि कारुण्य यांच्या सीमारेषा इतक्या भिडलेल्या क्वचित्‌च दिसतात. शालेय शिक्षण अजिबात न घेतलेल्या या स्त्रीला जीवनाचा अर्थ समजलेला होता आणि आपल्या आत्मचरित्रद्वारां तो व्यापक जीवनाचा अर्थ त्यांनीं इतरांनाही शिकविला. लहानमोठ्या दुःखांकडे पाहाण्याचा जो दृष्टिकोन लक्ष्मीबाईंनीं स्वीकारला त्यामुळें त्या दुःखाची तीव्रता कमी होत नाहीं. उलट हे आघात सहन करूनहि त्याकडे त्या विनोदी वृत्तीनें याबद्दल विस्मय वाटतो. वाङ्मयांत दुःखेंहि सुंदर ठरतात ती अशी !

## मनोवेधक व्यक्तिरेखा :

एकदां कविवर्य टिळकांना लक्ष्मीबाईंना शिकविण्याची लहर आली. त्यांनीं शिकवावयास आरंभ केला. ' शब्द म्हणजे काय ? ' या वारंवार विचारलेल्या प्रश्नाला लक्ष्मीबाईंचे एकच उत्तर " शब्द म्हणजे शब्द ! "

आणि वर पोटभर हंसणें! त्या प्रकारानें संतापून टिळकांनीं सर्व पुस्तकें जाळून टाकली. शब्द म्हणजे काय हें जरी लक्ष्मीबाईंना समाधानकारक रीतीनें सांगतां आलें नाहीं तरी त्यांनीं शब्दाचें सामर्थ्य पुरेपूर ओळखलेलें दिसतें. त्यांच्या आत्मचरित्रांत ज्या ज्या वेगवेगळया व्यक्ति येऊन जातात त्या त्या व्यक्तींचीं स्वभावचित्रें रेखाटण्यांत लक्ष्मीबाईंनीं कमालीचें कौशल्य व्यक्त केलें आहे. सोंवळ्यांना वेडानें पछाडलेले नाना, कडक शिस्तीनें जीव हैराण करणारा सासरा, पैशापेक्षांही काव्यगुणांना मान देणारे नानासाहेब पेंडसे, मेव्हण्याच्या काव्याचें कौतुक करणारी पण त्याच्या व्यवहारशून्यतेमुळें खिन्न असलेली भिकूताई, मनीवर कन्येप्रमाणें प्रेम करणारे गोविंदमामा, जांवयावर नाखुश असलेल्या आत्याबाई या सर्व व्यक्तिचित्रांत कृत्रिमतेचा कुठेंही लवलेश नाहीं. बायकांची ठसकेबाज बोलणीं, नवराबायकोंत स्वभावभिन्नतेमुळें उडणारे खटके, नातेवाईकांच्या कुरबुरी, परंतु प्रसंग येतांच एकमेकाला ओढणारे मायेचे पाश या जीवनांतील वेगवेगळया प्रसंगांतील नाट्यमयता लक्ष्मीबाईंनीं आपल्या 'स्मृतिचित्रांत' उत्कृष्ट प्रकारें चित्रित केली आहे. या सर्वांतून त्यांच्या विनोदबुद्धीचें सूत्र खेळत राहिल्यानें या आठवणी रसाळ झाल्या आहेत.

## टिळकांचें स्वभावचित्र :

लक्ष्मीबाईंचे माहेरचें नांव मनू. त्यांचें माहेर जलालपूरचें. वडिलांचें नांव नारायणराव गोखले. सत्तावन सालच्या बंडांत लक्ष्मीबाईंचे आजोबा आईचे वडील—कुणीतरी चिथावणी दिल्यानें फांशी दिले गेले. आजोबांचे नारायणरावांवर पितृवत् प्रेम होतें. त्यांच्या मृत्यूचा नारायणरावांवर परिणाम झाला. तेव्हांपासून नारायणराव—नाना—यांना सोंवळ्याओंवळ्याची विकृति जडली. आई मृत्युशय्येवर असतांना नानांनीं तिला बजाविलें, "थांब, माझी स्नानसंध्या होईपर्यंत मरूं नकोस!" अशा थोड्याफार विक्षिप्त गृहस्थाच्या पोटीं लक्ष्मीबाईंचा जन्म झाला. पुढें अकराव्या वर्षी लग्न झाल्यावर जन्माचा

जोडीदार लाभला तोही पुष्कळशा बाबतींत विक्षिप्तच ! त्यांच्या सहवासांत प्रारंभीं अनेक वर्षें लक्ष्मीबाईंना स्वास्थ्य असें मिळालेंच नाहीं. 'मी आहे तसाच माझें चरित्र लिहिल्यास त्यांत रेखाटा' या टिळकांच्या सांगण्याप्रमाणें लक्ष्मीबाईंनीं त्यांच्या स्वभावांतील गुणदोषांवर पांघरुण न घालतां त्यांचें स्वभावचित्र रंगविलें आहे. त्यांच्या लिखाणांत कुठेंही आंधळी पतिभक्ति नाहीं किंवा टिळकांच्या स्वभावामुळें त्रास भोगावा लागला म्हणून कटुताही नाहीं. 'साहित्यिक पतीचें त्याच्या साहित्यिक पत्नीनें केलेलें स्वभावचित्रण' सर्व स्मृतिचित्रांत ठसठशीतपणें उमटून दिसतें. रागीट पण तितकेच शांत, उदार पण तितकेंच आग्रही, खर्चाबद्दल बेफिकीर पण दुसऱ्याच्या दुःखानें चटकन् द्रवणारे हे फुलामुलांचे कवि, फुलांप्रमाणें कोमल वृत्तीचे असले तरी मुलांप्रमाणें स्वच्छंदी वृत्तीचे होते. त्यांच्या पायाला नेहमीं चक्र लागलेलें असे. घरांत धनधान्याची सतत टंचाई, पतिविरहाचें दुःख व टिळक घरीं असले तर त्यांच्या अव्यवहारी वृत्तीनें येणारे पेचप्रसंग या गोष्टी पुढें पुढें लक्ष्मीबाईंच्या अंगवळणी पडल्या.

## मातृभक्त टिळक :

टिळकांना काव्याचें बाळकडू आईकडून मिळालें. टिळकांची आई कविता करून घरांतील माणसांच्या भीतीनें फाडून टाकीत असे. वडिलांचा स्वभाव उग्र असल्यानें टिळकांच्या मनांत त्यांच्याबद्दल अढी होती. तेव्हापासून घरांतून पळून जाऊन सहा सहा महिने बाहेर राहण्याची त्यांना संवय जडली.

आईचा मृत्यु झाला तोही किती दुःखद प्रकारानें ! वडिलांची आजारी असल्याची तार आली; म्हणून आई व मुलगा ताबडतोब निघाले. रात्र तुडवून कष्टप्रद प्रवासानंतर त्यांना वडील गप्पा मारतांना आढळले. तशा स्थितींत टिळकांच्या आईनें धुणें धुतलें. डोक्यावर पाण्याचा हंडा व

खांद्यावर धुण्याचें घेऊन उभ्या असलेल्या आईनें ‘ एवढा हंडा उतरावयाचा होता ’ अशी विनवणी करतांच ‘ मी कांहीं तुमचा चाकर नाहीं. ’ असें म्हणून टिळकांच्या वडिलांनीं नरसिंहावतार धारण केला व त्या माउलीला लाथ मारली. त्या आजारांतून टिळकांची आई उठलीच नाहीं. आठ दिवस ‘ राम राम ’ म्हणत तिनें या जगाचा निरोप घेतला. या घटनेचा टिळकांच्या बालमनावर फार परिणाम झाला. घराकडे ओढणारा मातृप्रेमाचा बंध तुटल्यावर ते फार उदासीन झाले. ही उदासीन वृत्ति पुढें संसारांतही अधूनमधून डोकें वर काढीत असे.

## सासुरवासाची चुणूक :

“ खबरदार आमच्या घरांत आलीस तर—तंगडी मोडीन ! ” अशी धमकी देणाऱ्या मैत्रीणीच्या परिचित भावापुढें वधू म्हणून उभें राहाण्याची वेळ लक्ष्मीबाईंवर आली. त्यामुळें वधूपरीक्षेचा फार्स जरी झाला नाहीं, तरी आजेसासूबाईंनीं आपला अधिकार गाजविण्याची संधि सोडली नाहीं. मुलीची सहनशक्ति पाहण्यासाठीं त्यांनीं मुलीचा कान गच्च दाबून पाहिला. लक्ष्मीबाईंनीं ‘ हूं कां चूं ’ केलें नाहीं. तेव्हां त्या परीक्षेंतून त्यांची मुक्तता झाली. सासऱ्याकडे चार दिवस कोंकणांत राहिल्यावर सासुरवास म्हणजे काय याची त्यांना चांगली कल्पना आली. आपल्या पत्नीला कडकपणें वागविणारा सासरा सुनेला—तीही वाईट पायगुणाची सून अशी समजूत झाल्यावर—स्वभावानुसार फारच छळूं लागला. त्यांतून देश व कोंकण यांतील स्वयंपाकाची पद्धत वेगवेगळी व लक्ष्मीबाईंचें वय बारा-तेरा वर्षांचें ! या सर्व प्रसंगावरून त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचें दर्शन घडतें.

## विक्षिप्त जांवई :

टिळक जुन्या जमान्यांत जन्माला आले असले तरी त्यांच्या जीवनांत नव्या श्रद्धा निर्माण झाल्या होत्या. बंडखोर वृत्तीमुळें आप्तमंडळींपेक्षां त्यांचा समानधर्मी स्नेहीजनांकडे साहजिकच जास्त ओढा होता. देवधर्मावर त्यांचा

मुळींच विश्वास नव्हता. आपला जांवई संध्या करीत नाहीं—पाणी ओतून देतो—व भस्म खाऊन टाकतो ही गोष्ट आत्याबाईंच्या सूक्ष्म दृष्टींतून सुटली नाहीं. टिळकांचें नाटकाचें वेड, बायकोला माहेरी टाकून सहासहा महिने कुठेंतरी दडी मारून बसण्याची त्यांची खोड या गोष्टी त्यांना कशा आवडणार? “ काय जांवई आहे ! कुठला खुंटीवरचा कावळा शोधला देव जाणें ” असा टोमणा त्या आपल्या पतिराजांना देण्यास चुकत नसत. लक्ष्मीबाईंनाही वारंवार माहेरच्या आतांकडे जाणें आवडत नसे. पण परिस्थितीपुढें नाइलाज होता. एकंदरींत माहेरच्या माणसांनीं त्यांच्यावर फार प्रेम केलें. पण केव्हां तरी एकादा उणा शब्द ऐकणें भाग पडत असे. लक्ष्मीबाईंनीं टिळकांच्या बाजूनें बोलल्यावर ती मंडळी म्हणत, “ तो करीत जाईल गाणीं, आणि तूं म्हणत जा मागें. भीक मागत रहा हिंडत.’ टिळकांची कवि म्हणून होणारी प्रसिद्धि, त्यांचें कीर्तन-कलेंतील कौशल्य यांचें सर्वांना कौतुक वाटून आज ना उद्यां सर्व व्यवस्थित होईल अशी आशा त्यांना वाटत राही.

## स्वतंत्र संसाराची हौस :

नाशिकला थोडे फार दिवस लक्ष्मीबाई घर मांडून राहिल्या होत्या. परंतु मुंबईला संसार थाटायचा विचार झाल्यावर त्यांचा आनंद गगनांत मावेना. हौसेनें त्यांनीं माहेरहून खूप सामान घेतलें. टिळकांच्या वादविवादाच्या हौसेमुळें दोनदां गाडी चुकली. तिसऱ्यांदा सामानाचा घोटाळा झाला. गाडींत बसल्यावर भाजीपाला व इतर सामान वाटून टाकायला टिळकांनीं आरंभ केला. ‘ हें विश्वचि माझें घर ’ अशी टिळकांची वृत्ति असल्यानें संसारांतील सर्व खस्ता खाण्याची संवय लक्ष्मीबाईंना करावी लागली. तांदूळ आणायला रुपया दिला तर टिळक सुंदर दौत घेऊन येत असत. “ आतां ही दौत शिजवूं कां ?” हा प्रश्न ऐकला कीं, लक्ष्मीबाईंवर अरसिकपणाचा शिक्का मारून ते त्या दौतीला खिडकीबाहेर वाट दाखवीत असत. अशा

२५६४० अनुक्रम दिनांक ३-७-९ ग्रंथालय

तन्द्रेचे खटके नेहमी उडत असत. ध्येयवादी पुरुषाबरोबर संसार करतांना त्याच्या पत्नीला ज्या दिव्यांतून जावें लागते त्याची कल्पना या अनुभवांवरून येते. डोक्यांत एकादी कल्पना आली कीं, त्यांतच गुंगून जावयाचें अशी टिळकांची वृत्ति होती. त्यांना कलानंदापुढें संसार तुच्छ वाटत असे. तरी कधीं कधीं त्यांचें संवेदनाक्षम मन पत्नीच्या हालअपेष्टा पाहून व्यथित होई व ते म्हणत—

"कांता मम ही प्रेमळ किती हें आज मला कळते।
व्यर्थ गांजितों ह्या अबलेला पश्चात्तापें मन्मन जळतें ॥"

अर्थात् हा पश्चात्तापही तात्पुरताच असे.

### विरहावस्थेंतील सखी :

इ. स. १८९४ मध्यें टिळक धर्मांतर करणार या बातमीनें लक्ष्मीबाईंची करुणास्पद अवस्था झाली. त्या भावनेच्या उर्मींत त्यांनीं काव्यनिर्मिती केली. टिळक दिसतांच तो कागद चोळामोळा करून त्यांनीं फेकून दिला. आपल्या विरुद्ध माहेरीं पत्र लिहिलेलें असावें या कल्पनेनें टिळकांनीं तो चुरगळलेला कागद उलगडला. त्यांत लक्ष्मीबाईचें चुरगळलेलें हृदय परमेश्वराची आळवणी करतांना त्यांना दिसलें. विस्मयानंदानें त्यांनीं ती कविता वाचली.

"म्हणे जातो सोडून नाथ माझा।
आतां कवणाला बाहुं देवराजा ॥
सर्वव्यापि सर्वज्ञ तूंचि आहे।
सांग कोणाचे धरूं आतां पाये ॥"

एका वर्षाच्या अवधींत टिळकांनीं धर्मांतर केलें. आप्तमंडळी आतां उघड उघड म्हणूं लागली कीं, 'ते आपल्याला अंतरले ! मुलांकडे पाहून हे दिवस काढ.' संसारांतला हा आघात जबरदस्त होता. या विरहावस्थेंत कविता-सखीनें त्यांना साथ दिली. तेंच एक त्यांच्या मनोविनोदनाचें साधन

होतें. टिळकांना वेड्यावाकड्या अक्षरांत जीं चोरून पत्रें पाठविलीं जात त्या पत्रांतील कविता अमोल होत्या. टिळकही कवितेनेंच प्रत्युत्तर पाठवीत असत. या काव्यमय पत्रव्यवहारानें आजपर्यंत सहवासानें निर्माण झालेली प्रीति दृढ झाली व मनोमीलनानें पुनर्मीलन शक्य झालें. त्या विरहावस्थेचें वर्णन व काव्योद्भवाची कथा 'पतिपत्नी' या कवितेंत लक्ष्मीबाईंनीं वर्णिली आहे. टिळकांनींही एका कवितेंत म्हटलें आहे—

"होती शंभर कोस दूर मजला सोडून मूर्ति प्रिया।
मध्यें डोंगर उंच उंच टपले दृष्टीस झांकावया॥

होतों पाहत मी तिला परि सदा आश्चर्य हें काय न।
नेत्रें इष्ट मला! परंतु नच हे नेत्रावलंबी मन॥"

इ. स. १९०० मध्यें लक्ष्मीबाईंनीं धर्मांतर केल्यावर पुन्हां टिळक-पतिपत्नींचा संसार सुरूं झाला. परंतु टिळकांच्या बंडखोर वृत्ति बऱ्याच निवळल्या असल्यानें व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊन ते शांत झाल्यानें त्यांचा नंतरचा संसार खरा सुखाचा झाला. त्या संसारांत पुष्कळ समाजसेवा दोघांच्या हातून घडली.

## कवयित्री लक्ष्मीबाई :

"करंज्यामध्यें मोदक कशाला?" या कवितेनें लक्ष्मीबाईचें नांव 'मनोरंजन' मासिकाच्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झालें. या कवितेनें कांहींना शंका आली कीं, स्वतः टिळकच कविता करून देत असावेत. या शंकेला उत्तर म्हणून 'पतिपत्नी' ही सुंदर कविता लक्ष्मीबाईंनीं लिहिली. त्यांत आपल्या काव्यकलेची कहाणी सांगून त्यांनीं आपल्या कविपतीचें ऋण मान्य केलें. टिळक फक्त कविता लिहून झाल्यावर त्याच्यावर आपला हात फिरवीत असत.

"कन्या माझी, माय मी तिची, संशय तिळही नाहीं।
पिता हिचा परि हिज सांभाळी वस्त्राभरणें देई॥"

आणि कवीचा सहवास व विरह काव्योद्भवाला कारणीभूत झाला हें सत्यच होतें. लक्ष्मीबाई म्हणतात :

“ श्वासोच्छ्वासासमान ज्याची अगाध काव्यस्फूर्ति ।
हृदयमंदिरीं सदैव ज्याच्या वाग्देवीची मूर्ति ॥
अशा कवीचा संग जडाला गायाला लावील ।
शुष्क तरूला मेघ असा हा क्षणामधें पालवील ॥
अचेतनांही कवी पदार्थां गायाला हांसाया ।
लावी ! मग मी सजीव आहे कविरायाची जाया ॥
सतार जड मी खरोखरी गे, परंतु कुशल कराचा ।
स्पर्श कवीचा होतां फुटते मलाहि मधु मृदु वाचा ॥ ”

इ. स. १९०७ च्या जळगांवच्या कविसंमेलनाला त्यांनीं असाच काव्यमय निरोप पाठविला. त्या प्रसंगानें टिळकांनीं आपल्या पत्नीवर कविता केली. ‘ तुम्ही कवि, मी भिकारीण हो दारीं असें म्हणणारीस.’ या कवितें‍त टिळकांनीं काव्याचें प्रशस्तिपत्रक दिलें.

“ प्रसाद आहे, प्रतिभाहि आहे ।
प्रेमौघ गानांतुन नित्य वाहे ॥
निगूढ सारें दिसतें परंतु ।
येईल बाहेर धरीं न किंतु ॥ ”

तसेंच,

“ भरी श्वसन वाग्वधू मुरलिमाजी जें तें जगा ।
क्षणांत भुलवील गे ! मम न बोल हा वाऊगा ॥
खरीच कवयित्री तूं हृदयीं गे तुझ्या गायनें ।
सदैव भरली सती जरी न आयकीलीं जनें ॥ ”

आणि शेवटीं ते म्हणतात,

“ कवीश म्हणती मला, म्हण खुशाल तूं कौतुकें ।
तुझी अनुरती पतिप्रति म्हणेल तें तें निकें ॥

असंस्कृत परंतु तूं अतुल रत्न मी जाणिलें ।
नको नवल मानु कीं तुज यथेच्छ वाखाणिलें ॥ "

लक्ष्मीबाईंची योग्यता टिळक जाणून होते. म्हणूनच धर्मांतरानंतर अनेकांनीं दुसऱ्या मुलीशीं लग्न करण्याची गळ घातली असतांनाही दीर्घ विरह सोसून त्यांनीं आपली एकनिष्ठता व्यक्त केली. 'माझें मला द्या' या कवितेंत 'मला ताऱ्यांची माला नको. कल्पलतेचें फूल हातीं आलें तरी तेंसुद्धां नको ! माझें साधें श्यामल फूलच मला पाहिजे. अरसिक म्हणत असाल तरी हरकत नाहीं. पण त्या फुलाखेरीज दुसरीकडे माझें मनच लागत नाहीं' असे विचार त्यांनीं व्यक्त केले आहेत.

लक्ष्मीबाईंची 'श्रीमती'; 'गाऊं कोणत्यापरी'; 'चिमुकलें बालक माझ्यापुढें' या सुंदर आत्मपर कविता आहेत. 'मी तुझी मावशी तुला न्यावया आलें ही एक अत्यंत नादमधुर व वत्सल्यरसानें ओथंबलेली कविता आहे.

" भिन्न शरीरीं एकच आत्मा नवल हें असें घडलें ।
म्हणजे त्याला लग्न म्हणावें, देवानें घडविलें ॥ "

अशी त्यांची विवाहाबद्दल उदात्त कल्पना आहे.

" गेली ! गेली ! गोड घडी ती बाळपणीची गेली "

अशा साध्या सुंदर ओळी त्यांच्या काव्यांत विखुरलेल्या आहेत. कन्यादान केल्यानंतर पितृहृदयाचें वर्णन लक्ष्मीबाईंनीं हृद्यपणें केलें आहे.

" म्हणे आपुला तात, वरा त्या सद्गदीत कंठानें ।
घ्या घ्या माझी मूल लाडकी सांभाळा प्रेमानें ॥
आजवरी ही होती माझ्या गृहीची प्रतिभा सारी ।
होवो आतां तुम्हां दाविती सत्पथ ही संसारीं ॥
नव्हे कन्यका, नव्हे प्रभा ही, काळिज काढुन अपुलें ।
तुम्हांस दिधलें ! कुणास कोणी दान असें नच केलें ॥ "

खिस्तायनाचे साडेदहा अध्याय होऊन टिळक खिस्तवासी झाल्यावर पासष्ट अध्याय लिहून लक्ष्मीबाईंनीं हें महत्कार्य पूर्ण केलें. ' स्मृतिचित्रां 'च्या रूपानें त्यांनीं आपलें अक्षय्य स्मारक करून ठेवलें. इ. स. १९३५ मध्यें स्मृतिचित्रांचा शेवटचा भाग प्रसिद्ध झाला. इ. स. १९३३ मध्यें नाशिकच्या कवि-संमेलनाच्या स्वागताध्यक्षाचा मान त्यांना मिळाला होता. त्यांचें भाषण आल्हाददायक झालें. स्मृतिचित्रें प्रसिद्ध झाल्यावर साहित्यिकांनीं त्यांचा सत्कारसमारंभ घडवून आणला. आपलें जीवनाचें कार्य संपलें अशी जाणीव होऊनच कीं काय इ. स. १९३६ च्या सत्कारानंतर त्यांनीं शांतपणें मृत्यूला बोलाविलें.

कविवर्य टिळकांनीं ' माझी भार्या ' या कवितेंत त्यांना भावांजलि अर्पण केली. त्यांत शेवटीं ते म्हणतात,

" अरे माझ्या मित्रा !, चतुर सचिवा !, हे गुरुवरा ।
प्रिये शिष्ये !, भार्ये !, मम सकल रे पुण्यनिकरा ॥
पहा हे प्रेमाश्रु तव चरणयुग्मीं वितरती ।
मनोवृत्ति माझ्या मधुसुमनवृष्टीच करिती ॥

---

## अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :

१. लक्ष्मीबाईंची ' स्मृतिचित्रें ' जरूर वाचा.
२. जीवनाकडे पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन कशा प्रकाराचा होता ?
३. टिळकांची ' माझी भार्या ' व लक्ष्मीबाईंची ' पतिपत्नी ' या कविता वाचा.
४. ' भरली घागर ' हा लक्ष्मीबाईंचा काव्यसंग्रह वाचून त्यांच्या काव्याचा परिचय करून घ्या.

---

चुकीची दुरुस्ती

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध |
|---|---|---|
| ७६ | [illegible] | सूर्यपाये |

BVBK-0404369